महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८ / आषाढ २६, १९४० (शके)

(१) मुख्यमंत्री **(२) गृहनिर्माण मंत्री** **(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ९९

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मौजे पडेगाव येथे अभियंत्यांनी संगनमत करुन डी.आर.सी. प्रमाणपत्र दिल्याबाबत

(१) * १२२३०४ श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मौजे पडेगाव येथे गट.नं.७१/पैकी २४ मीटर रूंद रस्त्याचे टी.डी.आर. प्रमाणपत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेची फसवणूक करून श्री.संजय सिक्ची व त्यांना टी.डी.आर. देण्यासाठी संगनमत करणारे महानगरपालिकेतील संबंधित अभियंते यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फौजदारी स्वरुपाचे गुन्हे करणारे अधिकारी व टी.डी.आर. धारक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) नाही.

श्री.संजय सिक्ची यांना दिलेली डि.आर.सी प्रमाणपत्र क्र. फोलीओ क्र.०२ /५२ /DRC /No.AMC /TP /DRC /११७/२०१३ हा नजर चुकीने दिला गेला असून औरंगाबाद महानगरपालिकेने पत्र क्र. जा.क्र. /मनपा /नरवि /ससंनर /१५३ /२०१७, दि.२५/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रमाणपत्र रद्द केलेले आहे. श्री.संजय सिक्ची यांनी रद्द केलेला डि.आर.सी प्रमाणपत्राबाबत त्यांची हरकत नसल्याबाबत लेखी दिलेले आहे. दि.२५/०१/२०१७ रोजी डि.आर.सी रद्द करेपर्यंत हा टी.डी.आर कोणत्याही भूखंडावर लोड करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्लोड (जि.औरंगाबद) येथील उपजिल्हा रुग्णालयातून नवजात बालिकेचे झालेले अपहरण

(२) * १२२५७८ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबद) येथील उपजिल्हा रुग्णालयातून नवजात बालिका पळविल्याची घटना दिनांक ३१ जानेवारी,२०१८ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घटनेनंतर या रुग्णालयातील सीसीटिव्ही कॅमेरे नादुरुस्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील गुन्ह्याचा तपास करुन नवजात बालिका पळविणा-या आरोपीवर कारवाई करण्याबाबत तसेच बंद असलेले सीसीटिव्ही कॅमेरे दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, सिल्लोड शहर येथे गुरनं १५/२०१८ भा.दं.वि.कलम ३६३ अन्वये दि.३१/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे दुरुस्त करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

तारापूर (ता.जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांनी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये अपहार केल्याबाबत

(३) * १२४६९८ श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (ता.जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्यानी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यात आलेल्या पैशांचा अपहार केला असून सुमारे दोन हजार कर्मचा-यांचा कोट्यवधी रुपयांचा निधी या कंपन्यांनी थकविला असल्याची माहिती भविष्य निर्वाह निधी विभागाच्या अधिका-यांनी दिल्याचे दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित तहसिलदारांनी चौकशीचे आदेश दिलेले असुन सदरहू चौकशी पुर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमधील ४० आस्थापनांपैकी काही आस्थापनांनी कामगारांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा केलेली नाही, तसेच, काही आस्थापनांनी सदर रक्कम विहित कालावधीत भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा न करता उशिराने जमा केलेली आहे.

(२) व (३) कामगारांची वेतनातून कपात केलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे न भरल्यामुळे मा.प्रादेशिक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी, मुंबई यांच्या मार्फत भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२ च्या कलम ७अे अंतर्गत ४० आस्थापनांविरूध्द कार्यवाही करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त ४० आस्थापनांपैकी सदर अधिनियमातील तरतुदीनुसार भा.दं.वि. कलम ४०५ अंतर्गत ४०६-४०९ अन्वये मा.प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्यामार्फत ५ आस्थापनेविरुध्द पालघर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. तसेच, मा.प्रादेशिक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी, मुंबई यांच्या मार्फत उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार सी.आर.पी.सी. कलम ११० अन्वये ४० आस्थापनांपैकी ५ आस्थापनांविरुध्द तहसीलदार, पालघर यांच्याकडे केसेस दाखल करण्यात आल्या असून त्यावर कार्यवाही सुरू आहे. तसेच ३ आस्थापनांविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने भविष्य निर्वाह निधी कार्यालयामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

निरुखे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील माजी सरपंच यांच्या घरावर टाकलेला दरोडा

(४) * ११६६०६ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओरोस (जि. सिंधुदुर्ग) स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या कार्यालयात दिनांक २२ एप्रिल, २०१८ रोजी रात्री ८ वाजता वा त्यासुमारास पुणे येथील ६ व्यक्ती दिल्ली येथून आलेले शासकीय अधिकारी असल्याचे भासवत पोलीसांच्या संगमताने व मदतीने निरुखे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील माजी सरपंच श्री.रामदास उर्फ गुड्डू करंदीकर यांच्या घरावर दरोडा घालून लाखो रुपयांच्या रोकडसह अन्य मालमत्तेची लुट केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दरोड्याप्रकरणी श्री.करंदीकर यांनी कुडाळ पोलीस स्थानकात रीतसर तक्रार दाखल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टोळक्या बरोबर आलेल्या पोलीसांसह संबंधित आरोपींना अद्यापपर्यंत अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनातर्फे सखोल चौकशी करण्यात आलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुणे येथीस ६ व्यक्ती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या कार्यालयात आलेले नव्हते तर त्यांनी कुडाळ येथील एका हॉटेलमध्ये राहून स्थानिक गुन्हे शाखेशी संपर्क साधला व पोलीस पथक बोलावून घेतले. उक्त ६ जणांनी आपण दिल्ली येथील विशेष पथकाचे अधिकारी असल्याचे व आपली ओळख कुणालाच देत नसल्याचे सांगून आपण सरकारी अधिकारी असल्याचे भासवून फसवणूक केली व बेकायदा पेट्रोल व डीझेलचा साठा, तसेच अवैध मालमत्तेचा शोध घेण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांच्या घरावर छापा टाकून घराची झडती घेवून सुमारे ५ ते ५.५ लाख रोख रक्कमेची लुट केलेली आहे, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरून कुडाळ पोलीस ठाणे येथे ९ आरोपींविरूद्ध गु.र.नं. १३४/२०१८ भांदवि कलम ३९५, ४१७, १७०, १२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर गुन्हयातील ४ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरीत आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदर गुन्हयातील आरोपींसोबत गेलेले स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग सिंधुदूर्ग येथील पोलीस उपनिरीक्षक यांना निलंबित करण्यात आले असून अन्य कर्मचाऱ्यांची चौकशी सुरु आहे. तसेच पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपायास निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

भिवंडीतील (जि.ठाणे) रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत

(५) * ११८०४१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडीतील (जि.ठाणे) साडेचार किलोमीटरच्या रस्त्यासाठी महानगरपालिकेने वर्षभरापूर्वीच सुमारे नऊ कोटी रुपये खर्च करुनही निकृष्ट कामामुळे १५ दिवसांत सदर रस्त्याची दुरवसथा झाली असून त्याच रस्त्याकरिता राष्ट्रीय महामार्गाने पुन्हा सुमारे ४८ कोटी रुपये मंजूर करुन कॉंक्रिटीकरणाचे काम माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तत्कालिन आयुक्त डॉ.म्हसे यांनी शासनाच्या आयआयटीकडे या मार्गाची तपासणीकरिता रुपये १६ लाखांची फी भरुन मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तपासणीचा अहवाल अद्यापही देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून सन २०१६ मध्ये अंजुर फाटा ते बागे फिरदोस मशिद रस्त्याच्या डांबरीकरणाकरीता रुपये ९,३१,४०,१३०/- इतका खर्च केला आहे.

सदरचा रस्ता भिवंडीतील मुख्य वर्दळीचा रस्ता असल्याने केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांनी भिवंडी तालूक्यातील रा.म.क्र. १६० भिवंडी मिसींग लिंकच्या महामार्गाच्या रस्त्याचे क्राँक्रिटीकरण व अनुषांगिक कामासाठी अंदाजे रुपये ४८.३१ कोटी मंजुर केले आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने उक्त रस्त्याच्या गुणवत्तेविषयी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने शहनिशा करण्याकरीता आय.आय.टी., मुंबई यांना विनंती केली होती.

आय.आय.टी.,मुंबई संस्थेस तपासणी फी करीता रुपये २१,३९,००० अदा करण्यात आले असून उक्त रकमेचे समायोजन ठेकेदाराच्या अनामत व इसारा रकमेतून करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस आय.आय.टी.,मुंबई संस्थेचा सदर अहवाल दिनांक ०७.०५.२०१८ रोजी प्राप्त झाला आहे.

आय.आय.टी.,मुंबई यांच्या अहवालात उक्त रस्त्याविषयीची कामे मानकांप्रमाणे झाले नसल्याचे नमुद केले आहे.

उक्त अहवालाच्या अनुषंगाने भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने संबंधिताविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई केली आहे:-

- महानगरपालिकेने उक्त रस्त्याच्या कामाशी संबंधित पर्यवेक्षण करणारे ४ कनिष्ठ अभियंता व १ उपअभियंता यांना निलंबित केले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.
- महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीबाबत आय.आय.टी.मुंबई यांच्याकडून मानकांनुसार कमी केलेल्या कामाच्या रकमेची परिगणना करुन त्यानुषंगाने संबंधित ठेकेदाराविरुध्द नोटीस बजावून रक्कम वसुल करण्याची कार्यवाही भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चेंबूर (मुंबई) येथील दिवलीबेन मोहनलाल मेहता रुग्णालयाच्या दुरवस्थेबाबत

(६) * ११६७९७ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील दिवलीबेन मोहनलाल मेहता रुग्णालयात डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, अपुरी यंत्र सामग्री आणि पायाभूत सुविधांचा

अभाव असल्यामुळे रुग्णालयाची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील "क्ष" किरण विभाग बंद असून एमआरआय मशीन आणि सिटी स्कॅन लॅब नसल्याने रुग्णांना खासगी रुग्णालयात जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयात बरीच औषधे उपलब्ध नसून त्यामुळे डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांपैकी काही औषधे बाहेरून घ्यावी लागतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चेंबूर परिसरातील महानगरपालिकेच्या रुग्णालयात कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरून रुग्णालयात अद्ययावत सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दिवालीबेन मोहनलाल मेहता (माँ) रुग्णालय या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ७४ रुग्णशय्येच्या रुग्णालयात खालील सेवा उपलब्ध आहेत :-
- २४ तास बाह्य / आंतररुग्ण सेवा
- वैद्यकीय चिकित्सा
- शल्य चिकित्सा
- स्त्रीरोग व बालरोग चिकित्सा
- कान, नाक, घसा व नेत्र विभाग
- त्वचारोग चिकित्सा
- क्षयरोग विभाग
- हृदय स्पंदन आलेख सुविधा
- क्ष-किरण विभाग, प्रयोगशाळा
- २४ तास रुग्णवाहिका

त्यामुळे अपुरी यंत्रसामुग्री व पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे रुग्णालयाची दुरावस्था झाली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर रुग्णालयामध्ये क्ष-किरण विभाग कार्यरत आहे. रुग्णांना सी.टी. स्कॅन, एम.आर.आय. या सुविधांची आवश्यकता भासल्यास त्यांना राजावाडी रुग्णालय व पंडीत मदनमोहन मालवीय रुग्णालय या रुग्णालयांकडे चाचणींकरीता पाठविण्यात येते.
(३) महानगरपालिकेच्या अनुसुचीवरील सर्व औषधे मॉ रुग्णालयात पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) मॉ रुग्णालयाच्या आस्थापनेवर १७५ डॉक्टर्स व कर्मचारी असून रिक्त असलेली ३२ पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील महानगरपालिकेच्या नालेसफाई व रस्ते कचरा वाहतुकीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(७) * ११६६१८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील महानगरपालिकेच्या नालेसफाई व रस्ते कचरा वाहतुकीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार सुरु असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेमध्ये गत पाच वर्षात कचरा वाहतूकीत सुमारे दीडशे कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या नालेसफाई व कचरा वाहतूक गैरव्यवहारामध्ये पुणे महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचा आणि ई ग्लोबल वेस्ट सह कंत्राटदाराचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) • माहे मे, २०१८ मध्ये पुणे शहरातील नालेसफाईची कामे अपूर्ण असल्याबाबतच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याची बाब खरी आहे.

• महानगरपालिका हद्दीत पावसाळ्यापूर्वी नाले, ड्रेनेज सफाईची कामे करण्यात येतात. सदर कामे क्षेत्रीय कार्यालयांमार्फत निविदा मागवून करण्यात येतात.

• या कामांची देयके अदा करण्यापूर्वी विहित पध्दतीने मोजमाप पुस्तकातील नोंदी, झालेल्या कामाचे फोटोग्राफ, प्रत्यक्ष परिमाणे याची तपासणी अर्थांन्विषक विभागामार्फत करण्यात येत असल्याचे नमूद करून नालेसफाई व कचरा वाहतूक या कामांमध्ये गैरव्यवहार झाला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

• पुणे महानगरपालिका हद्दीत निर्माण होणारा कचरा हा महानगरपालिकेच्या वाहनांमधून ७ कचरा हस्तांरण केंद्रावर संकलीत करून देवाची उरळी येथील कचरा डेपोवर जमा करण्यात येतो. सदर ७ कचरा हस्तांतरण केंद्रापैकी ३ कचरा हस्तांतरण केंद्रातील जमा होणारा कचरा निविदाप्रक्रियेनुसार निम्नतम दराच्या निविदाकार एजन्सी मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांच्या बी.आर.सी. वाहनांव्दारे कचरा डेपोवर पोहोचविण्यात येतो.

• संबंधीत निविदाकारांची निवड विहित पध्दतीने करण्यात आलेली आहे. तसेच या कामाची देयके वाहनांवरील जी.पी.एस. यंत्रणेचा अहवाल इलेक्ट्रॉनिक वजन काट्यावरील वजन व वाहतूक नोंद वहीतील नोंदी तपासून देण्यात येत असल्याने या कामामध्ये याबाबत कोणताही गैरव्यवहार झाले नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• याबाबत कामांचे स्वरूप व तपशिल, अवलंबलेली कार्यपध्दती, देयक अदायगीची पध्दत, नोंदी याचा स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

खोपोली (ता.खालापूर, जि.रायगड) नगरपालिका हद्दीत पाणी पुरवठा योजना व नाट्यगृहाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(८) * ११६७२९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (ता.खालापूर, जि.रायगड) नगरपालिका हद्दीत करोडो रुपये खर्च करुनही पाणी पुरवठा योजना व नाट्यगृह अपूर्ण अवस्थेत असून शासनाची फसवणूक करण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये ९ कोटींच्या पाणी पुरवठा योजनेस रूपये ३५ कोटी खर्च करूनसुध्दा अद्यापही सदर योजना अपूर्ण असून रूपये १५ कोटी खर्च करून उभारण्यात आलेले नाट्यगृह अपूर्ण अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाची फसवणूक करणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर योजना पूर्णत्वास नेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजनेंतर्गत रु.१४.८३ कोटी रक्कमेची खोपोली वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर होती.

• सदर योजनेतील मुळ अंदाजपत्रकातील कामे पूर्ण होऊन योजना कार्यान्वित झालेली आहे.

• खोपोली शहराचे वाढते नागरीकीकरण व प्रकल्पाच्या जागेची भौगोलीक परिस्थती लक्षात घेता योजनेत विस्तार करणे आवश्यक असल्याने नगरपरिषदेने सुधारीत योजनेस महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांच्या कडून तांत्रीक मान्यता घेतली आहे.

• त्यानुसार मुळ अंदाजपत्रकात व निविदेत समाविष्ट नसलेल्या सुधारीत अंदाजपत्रकातील कामांना कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

• सदर योजनेकरीता शासनाच्या सुलभ कर्ज योजनेंतर्गत खोपोली नगरपरिषदेस ८ कोटी कर्ज व २ कोटी अनुदान दिले आहे.
• सप्टेंबर, २०१६ मध्येच नाट्यगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून त्याठिकाणी नाट्यप्रयोग होत असल्याचे, नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे शिंगणापूर उपसा केंद्रातून उपसा होणाऱ्या पाण्याचा महानगरपालिकेकडे हिशोबच नसल्याबाबत

(९) * १२०१६३ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे शहरासाठी शिंगणापूर उपसा केंद्रातून सुमारे १५४ दशलक्ष लिटर पाण्याचा रोज उपसा करीत असतांना त्यातील ५८.४६ एमएलडी पाण्याचे बिलींग केले जात असून उर्वरित ६२ टक्के पाण्याचा महानगरपालिकेकडे हिशोबच नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) कोल्हापूर शहर पाणी पुरवठा योजनेच्या जल लेखापरिक्षण (वॉटर ऑडीट) अहवालानुसार विविध उद्भवातून शहरास पाणी पुरवठा करणेसाठी खालीलप्रमाणे उपसा होतो :

अ.क्र.	उद्भव	केंद्र	दशलक्ष लिटर्स
१	पंचगंगा नदी	शिंगणापूर उपसा केंद्र	११२.१५
२	भोगावती नदी	वालिंगा व नागदेव उपसाकेंद्र	७७.२३
३	कळंबा तलाव	कळंबा तलाव	३.४२
		एकूण दैनंदिन उपसा	१९२.८०

• शहरासाठी १९२.८० दशलक्ष लिटर्स दैनंदिन होणाऱ्या पाणी उपशापैकी ३०.२१ टक्के पाण्याचे बिलिंग होत असून हिशोबबाह्य पाण्याचे प्रमाण ६९.७९ टक्के असल्याचे अहवालात नमूद आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) कोल्हापूर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या दाब नलिका व गुरुत्ववाहिनीवर मोठ्या प्रमाणात गळती असल्याचे जल लेखापरिक्षण अहवालानुसार निदर्शनास आले आहे.
• सदर गळती काढण्याच्या दृष्टीने १०९.४९ लक्ष किंमतीची अंदाजपत्रके महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आली आहेत.
• त्यापैकी रु. ६३.२० लक्ष किंमतीच्या अंदापत्रकांना महानगरपालिकेने मंजूरी दिली आहे.
• सदर कामांची निविदा प्रक्रीया सुरु असून निविदा निश्चितीनंतर सदरची कामे तातडीने पूर्ण करुन घेण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
• सदर गळती काढण्याचे काम व कोल्हापूर शहराचा पाणी पुरवठा बळकटीकरण करण्याच्या अनुषंगाने सुरु असलेल्या “अमृत” पाणी पुरवठा योजनेंतर्गतची कामे तसेच काळम्मावाडी धरण थेट पाईपलाईन योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर गळती कमी होऊन गळतीचे प्रमाण अनुज्ञेय निकषाच्या मर्यादेत राहणार आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे.
• कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी गळतीचे सध्याचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा खुपच जास्त असून सुधारणात्मक उपाययोजना तात्काळ राबवून गळतीचे प्रमाण विहित मर्यादेत आणण्याची कार्यवाही डिसेंबर, २०१८ पुर्वी पूर्ण करण्याच्या सक्त सूचना महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तुरंबे कपिलेश्वर दरम्यानच्या रस्त्याची झालेली दुरवस्था

(१०) * १२३४६९ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुरंबे कपिलेश्वर (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) दरम्यान कोल्हापूर महानगरपालिकेची थेट पाईपलाईनची कामे सुरू असुन रस्ता खोदल्यामुळे माती साचून रस्त्याची दुरवस्था झाली असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेच्या थेट पाईपालाईन योजनेकरीता उत्खनन करण्यात आलेले सर्व रस्ते नादुरूस्त असून महानगरपालिकेने कोणतीही उपाययोजना केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हे सर्व रस्ते दुरूस्त करून संबंधित दोषी असलेल्या ठेकेदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) केंद्र शासनाच्या UIDSSMT कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर शहरासाठी काळम्मावाडी धरण जलाशयातून थेट पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करणे या योजनेचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

• महानगरपालिकेने तुरंबे कपिलेश्वर - मांगोली - अकनुर या रस्त्याच्या बाजूने पाईपलाईन टाकण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून परवानगी घेतलेली आहे.

• त्यानंतरच रस्त्याच्या कडेने व काही ठिकाणी रस्ता क्रॉसिंग करुन पाईपलाईन टाकण्याचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले आहे.

• काम करीत असताना व रस्ता क्रॉसिंगच्या ठिकाणी पाईपलाईनच्या खोदाईतील मातीमुळे माहे जून, २०१८ मध्ये पडलेल्या पावसानंतर तुरंबे - कपिलेश्वर दरम्यानच्या रस्त्यावर गाळ साचल्याचे निदर्शनास आले, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) पाईपलाईनचे काम सुरु असलेले सर्व रस्ते नादुरुस्त झालेले नाहीत.

• तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूचनेनुसार व प्रत्यक्ष जागेवरील परिस्थितीनुसार कंत्राटदाराने रस्त्यावरील साचलेला गाळ काढण्यात आला आहे.

• तसेच रस्ता क्रॉसिंगच्या ठिकाणी मुरुम घालुन वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने देखील कार्यवाही केलेली आहे.

• सदर रस्त्यावरील पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर निविदेत अंतर्भुत बाबींनुसार रस्त्याची पुर्नपृष्ठीकरण करण्याचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.ठाणे) पूर्व भागातील औद्योगिक परिसरातील रासायनिक सांडपाणी खाडीमध्ये सोडण्यात येत असल्याबाबत

(११) * १२२१६७ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई पूर्व (जि.ठाणे) भागातील औद्योगिक परिसरातील रासायनिक सांडपाणी खाडीमध्ये सोडण्यात येत असून त्याकडे वसई-विरार महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार सदरहू रासायनिक कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहर व परिसरात चोरींच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

(१२) * ११६६५३ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात घरफोड्या, वाटमारी, भुरटी चोरीसह गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन एकाच दिवसात डेक्कन मधील ३ सदनिका फोडून चोरट्यांनी लाखो रुपयांची चोरी केली तसेच गत महिन्यात एकाच दिवसात ८ घरफोड्या झाल्या असल्याचेही माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गोलेगाव (ता.शिरुर, जि.पुणे) येथे कानिफनाथ वस्ती येथे सुमारे रूपये ६ लाख ५०० इतक्या ऐवजाची चोरी केल्याची घटना दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शिरूर येथील मांडवगण फराटा गावामधील घाडगेतळई येथे भरदिवसा घरातून सुमारे रुपये ४ लाखांची चोरी केल्याची घटना दिनांक १० एप्रिल,२०१८ रोजी वा त्या सुमारास घडली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यामध्ये चोरीच्या/दरोड्याच्या अनेक घटना घडुनही अद्यापही कुठल्याही चोरीचा शोध लागला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संदर्भात गंभीर दखल घेऊन गुन्हेगारी रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) सन २०१६ व २०१७ अखेर पुणे शहर आयुक्तालयांतर्गत झालेल्या घरफोडी, जबरी चोरी व सर्व चोरीच्या घटनांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे. त्यावरुन सन २०१६ पेक्षा सन २०१७ मध्ये दाखल झालेल्या गुन्हयांत घट झाल्याचे दिसून येते.

अ.क्र.	शिर्षक	सन २०१६		सन २०१७	
		दाखल	उघड	दाखल	उघड
१	घरफोडी	११३२	५४२	१००४	५३९

२	जबरी चोरी	४८९	४१८	३९७	३४२
३	सर्व चोरी	५५२१	१७४५	५४६६	१७४९

डेक्कन पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. १८.१२.२०१७ रोजी चार सदनिका बंद असतांना अज्ञात चोरटयाने घरफोडी करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा गु.र.क्र. २९९/२०१७ भादवि कलम ४५७, ३८०, ५११ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हा तपासाधीन आहे.

दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी एकाच दिवशी ७ घरफोडीचे गुन्हे विश्रामबाग पोलीस ठाणे (गु.र.क्र. २७/२०१८, गु.र.क्र. २६/२०१८), बिबवेवाडी पोलीस ठाणे (गु.र.क्र. ३२/२०१८), कोंढवा पोलीस ठाणे (गु.र.क्र. ५९/२०१८), दत्तवाडी पोलीस ठाणे (गु.र.क्र. ४७/२०१८), वारजे माळीवाडी पोलीस ठाणे (गु.र.क्र. ४९/२०१८, गु.र.क्र. ५०/२०१८) च्या हद्दीत घडले आहेत.

(२) होय हे खरे आहे.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार शिरुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३२०/२०१८, भादंवि कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासावर आहे.

(३) सदर प्रकरणी शिरुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २८७/२०१८, भादंवि कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तथापि सदर गुन्हयातील फिर्यादीने दिलेली तक्रार ही बनाव करुन खोटी दिली असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदरचा गुन्हा ‘ब’ वर्गात समरी मंजूर होणेकामी मा. न्यायालयात सादर केला आहे.

(४) सन २०१८ मे अखेर दाखल झालेले गुन्हे व त्यापैकी उघड झालेल्या गुन्हयांचा तक्ता खालीलप्रमाणे.

	दरोडा		चोरी	
	दाखल	उघड	दाखल	उघड
पुणे शहर	२८	२६	२२२७	६०७
पुणे ग्रामीण	२८	२७	२२३२	२५७
शिरुर तालुका	१	१	३०३	४२

(५) गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याबाबत तसेच गुन्हयांना प्रतिबंध करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक १७.१२.२०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिक्षक यांना सविस्तर सूचना दिल्या आहेत.

मालमत्तेच्या गुन्हयांना आळा घालणेसाठी उघडकीस आलेल्या गुन्हयांतील आरोपींवर वेळीच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते. पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वेळोवेळी नाकाबंदी केली जाते तसेच रात्रगस्त नेमूण सराईत गुन्हेगारांची व वाहनांची तपासणी केली जाते. रात्रगस्ती करीता ग्रामसुरक्षा दल, स्थानिक नागरिक यांना रात्रगस्त फिरणेकामी प्रोत्साहित करण्यात येते. चोरीच्या गुन्हयासंदर्भात धोक्याची सूचना देणारी इलेक्ट्रीक यंत्र बसविणे, मुख्य दरवाजा बाहेर ग्रीलचा दरवाजा बसविणे, सोसायटयांमध्ये वॉचमन नेमणे, अनोळखी व्यक्तींबाबतची माहिती पोलीसांना देणे अशा विविध बाबींची माहिती नागरिकांना देवून त्यांना सतर्क राहणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रस्त्यांवरील अपघातांच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

(१३) * ११६८९८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य देशात अपघाती मृत्युबाबत तिस-या क्रमांकावर असुन गत वर्षात झालेल्या ३६ हजार रस्ते अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणा-यांची संख्या ही सुमारे १२,२६४ इतकी आहे तर माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या तीन महिन्याच्या कालावधीत राज्यात एकूण ९,२४३ अपघात झाले असून त्यात ३,३६१ व्यक्तींचा मृत्यु झाला तसेच शहरी भागात अपघातांचे प्रमाण ४० टक्के व अपघाती मृत्युचे प्रमाण २९ टक्के हेच ग्रामीण भागात प्रमाण ६० टक्के व अपघाती मृत्युचे प्रमाण ७१ टक्के आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील मुंबई - पुणे महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ वर गत पाच वर्षात झालेल्या अपघातात १५८९ जणांचा मृत्यू तसेच ४९८ जबर जखमी, १७४३ किरकोळ जखमी झाले तसेच पुणे शहरात तीन वर्षांत सुमारे १३३१ जणांना जीव गमवावा लागल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून पोलीसांच्या दुर्लक्षापणामुळेच नियमांचे उल्लंघन होत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपघातग्रस्त ठिकाणे निश्चीत करण्यासाठी केंद्र शासनाने जे निकष निश्चित करुन दिले आहेत त्यानुसार राज्यात १३२४ ठिकाणे अपघातग्रस्त आहेत, या अपघातग्रस्त ठिकाणी योग्य ती उपाययोजना करण्याबाबत तसेच रस्ते, महामार्ग, ग्रामीण व शहरी भागातील अपघात रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) राज्यात सन २०१७ मध्ये ३५,८५३ अपघात घडले असून त्यात १२,२६४ जणांचा मृत्यु तर २०,४६५ जण गंभीर जखमी झाले आहेत.

माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यात एकूण ९,२४३ अपघात झाले असून त्यात ३,३६१ व्यक्तींचा मृत्यु झाला आहे.

माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या कालावधीमधील शहरी भागातील अपघातांचे प्रमाण २७ टक्के असून मृत्युचे प्रमाण १७ टक्के आहे तर ग्रामीण भागातील अपघातांचे प्रमाण ७३ टक्के असून मृत्युचे प्रमाण ८३ टक्के आहे.

NCRB (National Crime Record Bureau) च्या अहवालावरुन देशभरात अपघातांच्या घटनांमध्ये महाराष्ट्र सन २०१५ मध्ये तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते.

(२) रायगड जिल्ह्यातील मुंबई - पुणे महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ वर सन २०१४ पासून माहे मे, २०१८ पर्यंतच्या कालावधीत झालेल्या अपघातात ९३८ जणांचा मृत्यू झाला असून २,३२२ जबर जखमी तर ९३२ जण किरकोळ जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर अपघात हे पोलीसांच्या दुर्लक्षपणामुळे झाले नसून वाहन चालकांनी निष्काळजीपणे, रस्त्याच्या दिसत्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन, धोकादायकरित्या ओव्हरटेक व अविचाराने, हयगयीने वाहन चालविल्यामुळे झालेले आहेत.

(३) अपघातग्रस्त ठिकाणे निश्चीत करण्यासाठी केंद्र शासनाने जे निकष निश्चित करुन दिले आहेत त्यानुसार राज्यात १,३२४ अपघातग्रस्त ठिकाणे आहेत.

राज्यातील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता रस्ते अपघातांवर उपाययोजना करण्यासाठी परिवहन विभागाने दिनांक १४.१०.२०१५ अन्वये महाराष्ट्र राज्य रस्ते सुरक्षा धोरण जारी केलेले आहे. सदर धोरणामध्ये रस्ते अपघातातील विविध मुद्यांवर संबंधीत विभागांनी करावयाच्या उपाययोजना / निर्देश नमूद आहेत. तसेच रस्ते सुरक्षा धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता मा.मंत्री (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली परिवहन विभागामार्फत दिनांक १३.०५.२०१५ च्या अधिसूचनेन्वये राज्य रस्ते सुरक्षा समितीचे पुनर्गठन करण्यांत आले आहे. महामार्ग पोलीसांतर्फे मोटार वाहन चालकांचे वाहन चालविण्याबाबत प्रबोधन करण्यांत येते. तसेच अशासकीय संस्था, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, परिवहन विभाग यांचेमार्फत वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत प्रबोधन केले जात आहे. दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते. महामार्गावर अपघाताच्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा स्पीडब्रेकर लावण्यांत आलेले असून पांढरे पटटे मारण्यात आलेले आहेत. तसेच आवश्यक ते सूचना फलक लावण्यांत आलेले आहेत. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कसूरदार वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील कर विभागात झालेला गैरव्यवहार

(१४) * १२३६२७ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील महानगरपालिकेच्या कर विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी संगनमताने कर निश्चितीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याच्या घटना वारंवार घडत असून तत्कालीन कर निर्धारक, कर निरीक्षक यांनी रुपये ७० लाख १४ हजाराचा कर केवळ रुपये ११ लाख केला असून कर निरीक्षक यांनी सदर कर कमी केल्याचे लेखी मान्य केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण १५ कर चोरींची प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी चौकशी आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक प्रशासनाला उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत मालमत्ता कर असून मात्र काही प्रकरणामध्ये नाममात्र कर लावलेले आहेत, काही मालमत्तांची नोंदच दप्तरी दाखल नाही त्यामुळे मालमत्तांची पुनर्पडताळणी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ डिसेंबर, २०१७ व २३ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये करूनही त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) “७० लाखांचा मालमत्ता कर आणला १० लाखांवर” अशा आशयाची वृत्त प्रसिध्द झाले होते ही वस्तुस्थिती आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील २ मालमत्तांवर वाढीव क्षेत्र व आर.सी.सी. बांधकाम निदर्शनास आल्याने त्याबाबत संबंधित मिळकतधारकास दिनांक २०.०६.२०१७ रोजी महानगरपालिकेमार्फत नोटीस बजावण्यात आली होती.

सदर नोटीशीवर मिळकतधारकाने आक्षेप घेतल्याने तत्कालीन आयुक्त यांचेकडे सुनावणी घेऊन मिळकतधारकाने सादर केलेल्या पुराव्यांच्या अनुषंगाने दिनांक १६.०९.२०१७ रोजी आदेश पारित करण्यात आले.

यानुसार सदर बांधकाम सन २००८ पूर्वीचे असल्याने अवैध बांधकाम शास्ती इ. बाबी लागू न करता रु. ११ लाख इतक्या रकमेची कर आकारणी करण्यात आली असून सदर रक्कमेचा भरणा मिळकतधारकाने दिनांक १८.०९.२०१७ रोजी भरणा केला आहे.

(२) कर निर्धारण करताना कमी आकारणी केली असल्याची शंका असलेल्या मिळकतींचा तपशिल सादर करण्याचे आदेश आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक १४.०६.२०१७ रोजी संबंधित कर निरीक्षकास दिले होते. त्यानुसार १६ मिळकतीची पुन:पडताळणी केली असता त्यापैकी ५ मिळकतींवर पूर्वीच्या रुपये ८,०६,५८१ /- इतक्या कर आकारणी ऐवजी रुपये २,७०,८७,५३१ /- इतकी सुधारीत कर आकारणी करण्यात आली आहे. उर्वरित ११ मिळकतीमध्ये काही बदल झाल्याचे दिसून आले नाही.

(३), (४) व (५) मालमत्तांची पुन:पडताळणी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार केला असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

संशयास्पद मालमत्तांची पडताळणी करुन सुधारीत करनिर्धारण करण्याची कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असून सदर सुधारणेमुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली याबाबतचा अहवाल ३ महिन्यात शासनास सादर करण्याच्या सूचना उल्हासनगर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

कल्याण, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ येथील पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी नेमलेल्या सल्लागाराच्या नियुक्तीवरील खर्च वाया गेल्याबाबत

(१५) * ११९६४२ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) कल्याण, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ येथील पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी नेमलेल्या सल्लागारावर शुल्कापोटी रुपये ४ कोटी १५ लाखांचा खर्च वाया गेल्याचे निष्कर्ष भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी (कॅग) आपल्या अहवालात काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सल्लागाराची नियुक्ती कोणत्या प्रकल्पाच्या कामासाठी करण्यात आली होती तसेच सल्लागाराच्या नियुक्तीसाठी कोणत्या अटी व शर्थी निश्चित करण्यात आल्या होत्या,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामास एमएमआरडीएच्या नियोजन विभागाची संमती घेण्यात आली होती काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) विस्तारीत पायाभूत सुविधा प्रकल्प अंतर्गत कल्याण शहर वळण रस्ता बांधणे, राज्यमार्ग ४० वरील शिरगाव फाटा ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ पडघा ते टिटवाळा राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ ते कल्याण कर्जत राज्यमार्ग ३५ वरील बदलापूर पर्यंत चौपदरी रस्त्याचे बांधकाम व भूसंपादन करणे, टक्का कॉलनी - पळस्पे फाटा आणि कळंबोली ते खांदा कॉलनी, खोपोली शहर वळण रस्ता, रेवस कारंजा रस्त्यावर रेवस खाडीवर पुलाचे बांधकाम, भिवंडी वळण रस्त्याचे बांधकाम, नेरळ ते दस्तुरी रस्त्याची सुधारणा, दस्तुरी माथेरान या पथमार्गाचे सुशोभिकरण करणे अशा कामांकरीता निविदापूर्व कामे व भूसंपादन

करण्याबाबत प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने दि. २८ जानेवारी २०१३ रोजीच्या २३७ व्या बैठकीत सल्लागार नियुक्तीस मंजूरी दिली होती. तसेच, प्राधिकरणाच्या दिनांक २७.०६.२०१४ च्या १३४ व्या बैठकीमध्ये उक्त प्रकल्पाच्या बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे.

दि.१३.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मा.प्रधान महालेखाकार यांना सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने सल्लागाराच्या शुल्कापोटी रु. ४.१५ कोटी वाया गेल्याच्या निष्कर्षाबाबतचा मुद्दा निरीक्षण अहवालातून लोकलेखा समितीपुढील चर्चेच्या अधिन राहून मा.प्रधान महालेखाकार यांनी निकाली काढलेला आहे.

रामदास पेठ (जि.अकोला) येथील फायनान्स कंपनीच्या व्यवस्थापकाने बचत गटांना देय असलेली रक्कम वाटप न केल्याबाबत

(१६) * १२१४७२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामदास पेठ (जि.अकोला) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फायनान्स कंपनीला बचत गटांना अर्थसहाय्य पुरविण्याचे काम देण्यात आले होते, परंतु या कंपनीच्या व्यवस्थापकाने ५८ बचत गटांना देय असलेली सुमारे रुयये ११ लाख ५८ हजार ऐवढी रक्कम वाटप केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर बचत गटांना देय असलेली रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) फिनो फायनान्स कंपनी लि. ही महिला बचत गटांना आरबीआय च्या नियमानुसार कर्जपुरवठा करीत होते. परंतू तत्कालीन शाखाधिकारी याने ५८ बचत गटातील खातेधारकांना एकूण रक्कम रुपये ११,१८,७७९/- वाटप केली नाही. सदर प्रकरणी एरिया मॅनेजर, फिनो फायनान्स कंपनी लिमीटेड, अकोला यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तत्कालीन शाखाधिकाऱ्याविरूद्ध पोलीस स्टेशन, रामदास पेठ अकोला येथे अप.क्र. १५८/२०१८ भादंवि कलम ४२०, ४०६, ४०९, ३८१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील जलवाहिन्याच्या लगतच्या झोपडीधारकांच्या पूनर्वसनाबाबत

(१७) * १२०९३० श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जलवाहिन्यालगतच्या जागांवर अतिक्रमण केलेल्या पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करताना एस.आर.ए.ने आपल्याच नियमाचे उल्लंघन

केल्याचा ठपका कॅगने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर ठेवला असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर तसेच उपनगरांना पाणीपुरवठा करणा-या तानसा पाईपलाईनलगत असलेल्या झोपडपट्टीवासियांचा प्रश्न अद्यापही मार्गी लागला नसुन या प्रकल्पग्रस्तांचे माहूल येथील पुनर्वसनास रहिवाशांचा विरोध असून मरोळ, दिंडोशी येथील भूखंडावरही तानसा पाईपलाईनग्रस्तांचे पुनर्वसन करता येणार नसल्याने मा.उच्च न्यायालयाने उक्त प्रकरणी नाराजी व्यक्त केली असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जागांवर अतिक्रमण करून वसलेल्या ८५४२ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे उद्दिष्ट नायायालयाच्या निर्देशानंतरही साध्य झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाईपलाईनलगतचे अतिक्रमण धोकादायक असून हे अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) केंद्र शासनाच्या संस्थांनी नोंदविलेल्या सुरक्षाविषयक बाबींकडे दुर्लक्ष करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी अतिक्रमण धारकांना चुकीच्या पद्धतीने पुनर्वसन करण्याची योजना राबवून खाजगी विकासकास अनुचितप्रकारे मदत केल्याबाबत कॅग ने आक्षेप घेतला आहे.

(२), (३), (४) व (५) तानसा पाईपलाईन परिसरातील एकूण १६,५८८ झोपड्यांपैकी ११,६९६ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे. पात्र ९,२३१ प्रकल्पग्रस्तांपैकी ७,२४९ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले असून १,९८२ पात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

माहुल येथील एव्हरस्माईल प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

• माहुल येथील प्रकल्पाला भेट देऊन तेथील सोयीसुविधांचा आढावा घेऊन, त्याबाबतची निरीक्षणे नोंदवून आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यासाठी सचिवस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

• तसेच, याबाबत शासनास शिफारस करणे व त्यासाठी कालबध्द कृती आराखडा तयार करण्यासाठी कृती आराखडा समितीची स्थापना करण्यात आली आहे.

• प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने त्रयस्थ संस्थेमार्फत सर्वसमावेशक अहवाल तयार करण्याकरिता इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे, पवई या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबईतील सन २००० ते २०११ पर्यंतच्या पुरावे असलेल्या झोपडपट्टीधारकांना हक्काचे पक्के घर देण्याबाबत

(१८) * १२३८१९ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सन २०११ पर्यंतच्या अपात्र असलेल्या झोपडपट्टीधारकांना हक्काचे पक्के घर देण्याबाबत शासनाने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ पर्यंतच्या झोपडपट्टीधारकांना कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात येऊन शहरात कोणत्या ठिकाणी घरे उपलब्ध करून देणार आहेत याबाबतचे स्पष्ट धोरण अद्याप शासनाने घोषित केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरातील मिठी नदी, तानसा जलवाहिनी येथील प्रकल्पग्रस्त व महानगरपालिकेच्यावतीने विविध रस्ता रुंदीकरणात सन २००० नंतरचे पुरावे असलेले झोपड्पट्टीधारक हे अपात्र झाले असून त्यांचे निष्कासन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सन २००० ते २०११ पर्यंतचे पुरावे असलेले प्रकल्पबाधित झोपडपट्टीधारकांना शासनाच्या धोरणाप्रमाणे हक्काचे पक्के घर देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) व (२) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ मध्ये सुधारणा करणारे विधेयक हिवाळी अधिवेशन २०१७ मध्ये पारित करण्यात आले. त्याअनुषंगाने मा.राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेने सदर अधिनियमान्वये सुधारणा करण्यासंबधीची अधिसूचना दि. २६.०४.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार दि. ०१.०१.२०११ अथवा त्यापूर्वी पासूनची झोपडी सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासीयांचा निवारा निश्चित करण्याबाबत अटी व शर्ती नमूद करणारा शासन निर्णय दि. १६.०५.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमामधील सुधारणा व शासन निर्णयाच्या अनुषंगाने सन २०११ पर्यंतच्या झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसनाची कार्यपध्दती निश्चित करण्याचे काम शासन स्तरावर सुरु आहे.
(३) मे, २०१८ पर्यंत मुंबई शहरातील तानसा जलवाहिनी आणि महापालिकेच्या वतीने विविध रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या दि.१.१.२००० पूर्वीपासून राहत असलेल्या झोपडीधारकांना दि.१६.५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या कागदोपत्री पुराव्यानुसार पात्रता निश्चित करुन पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. सदरबाबत सन २००० नंतरचे पुरावे असलेल्यांना अपात्र ठरविले आहे. दि.१६.०५.२०१८ च्या शासन निर्णयाचे पालन, या पुढील कार्यवाही करताना केले जाईल असा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अहवाल आहे.
(४) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ अधिनियमामधील सुधारणा व शासन निर्णयाच्या अनुषंगाने सन २०११ पर्यंतच्या झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसनाची कार्यपध्दती निश्चित करण्याचे काम शासन स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) शहर व परिसरात झालेल्या ३४ घडफोड्यांच्या तपासाबाबत

(१९) * ११७२३० श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहर व परिसरात एकाच आठवड्यात ३४ ठिकाणी घरफोड्या होवून लाखो रुपयांचा ऐवज चोरट्यांनी पळविल्याच्या घटना माहे मे, २०१८ च्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात घडल्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरफोड्यांतील गुन्हेगारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच तपासाची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहर व परिसरात माहे मे च्या पहिल्या व दुसऱ्या सप्ताहात एकूण ३० ठिकाणी घरफोड्या होऊन त्यामध्ये ३,३०,१७६/- रूपये किमतीचा मुद्देमाल चोरीस गेला आहे.

(२) सदर प्रकरणी चिपळूण पोलीस ठाणे येथे खालिलप्रमाणे एकूण ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(अ) अज्ञात आरोपीविरोधात गु.र.नं. ८६/२०१८ भादंवि कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ अन्वये गुन्हा दाखल.

(ब) अज्ञात आरोपीविरोधात गु.र.नं. ९१/२०१८ भादंवि कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ अन्वये गुन्हा दाखल.

(क) अज्ञात आरोपीविरोधात गु.र.नं. ९३/२०१८ भादंवि कलम ४५४, ४५७, ३८०,५११ अन्वये गुन्हा दाखल.

वरील सर्व गुन्हे तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

अहमदनगर महानगरपालिका येथील उद्यान विभागाकडून प्रशासकिय मान्यता न घेता तयार करण्यात आलेल्या देयकांबाबत

(२०) * ११७५६० श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिका येथील उद्यान विभागाकडून सादर करण्यात आलेल्या रुपये ४७.५० लाखांच्या किरकोळ देयकांसह रुपये ८ लाखांच्या बुके खरेदीला प्रशासकीय मान्यता न घेताच काम करुन देयके तयार करण्यात आल्या प्रकरणी उद्यान विभाग प्रमुखांना आयुक्तांनी नोटीस बजावल्याचे दिनांक १२ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या देयकांच्या नस्त्याही महानगरपालिकेतून गहाळ झाल्या असून ठेकेदारांनी या नस्त्या पळविल्याचे उद्यान विभागाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानूसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रशासकीय मान्यता न घेता सादर केलेल्या देयकांच्या सर्व फाईल्स उद्यान विभाग प्रमुख यांच्याकडे उपलब्ध आहेत.

(३) प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेमार्फत उद्यान विभाग प्रमुख यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या भत्त्यांमध्ये वाढ करण्याबाबत

(२१) * १२०५५७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस शिपाई, नाईक, हवालदार, साहाय्यक फौजदार इत्यादी पदावर काम करणा-ऱ्या पोलीसांना आहार भत्ता, धुलाई भत्ता, वाहन भत्ता व अतिकालीन (ओव्हरटाईम) भत्ता दिला जात असून, अनेक वर्षांपासून या भत्यांमध्ये वाढ करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृह विभागाने दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास काढलेल्या लेखी आदेशाद्वारे पोलीस कर्मचाऱ्यांना केवळ दरमहा २० रूपये विशेष कर्तव्य भत्ता वेतनामधून देण्याचा आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८ तासाहून जास्त काम करून विशेष कर्तव्य भत्ता म्हणून २० रूपये जाहीर केल्याने पोलीसांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या विशेष कर्तव्य भत्यासह इतर भत्त्यामध्ये वाढ करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शासन निर्णय,गृह विभाग दि. ०७/११/२०१७ अन्वये पोलीस उपनिरीक्षक / सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना प्रतिमाह रू. १५००/- व पोलीस हवालदार / पोलीस नाईक / पोलीस शिपाई यांना प्रतिमाह रू. १३५०/ इतका मासिक वेतनातुन अतिकालीक भत्ता (आहार भत्ता) देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. इतर भत्यामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव वेतन पुनर्रचना समितीकडे सादर केला आहे.

(५) पश्न उद्‌भवत नाही.

परळ (मुंबई) भागातील रघुवंशी मिलमध्ये अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याबाबत

(२२) * ११८८५८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमला मिल मध्ये लागलेल्या आगीच्या घटनेनंतर महानगरपालिकेने केलेल्या पहाणीत परळ भागातील रघुवंशी मिलमध्ये गत वर्षामध्ये शासकीय यंत्रणांना अंधारात ठेवून सुमारे १५ हजार ९८० चौरस मी. इतक्या क्षेत्रात अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरण्याच्या जमिनीबाबतच्या नियमात केलेल्या सुधारणांचा आधार घेऊन ही अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून जमिनी वापराबाबतचा फेरबदलासाठी महानगरपालिकेकडून परवानगीच घेण्यात आलेली नाही तसेच मुळ मालकाकडून भाडेपट्टयाने घेतलेली ही जागा नंतर अनेकांना पोटभाड्याने देण्यात आल्याचेही या पहाणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) “अनधिकृत बांधकामांची रघुवंशी मिल” अशा आशयाची बातमी दिनांक १९.०५.२०१८ रोजीच्या लोकसत्ता या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) रघुवंशी मिल परिसरातील मोकळया तसेच, मिलच्या मूळ बांधकामांमध्ये फेरबदल करुन झालेल्या वापरातील बदलांवर/वाढीव बांधकामांवर तसेच पोटमाळयांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ व ३५४अ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

(३) व (४) रघुवंशी मिलमधील अनधिकृत बांधकामांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

• मा.शहर दिवाणी न्यायालयात प्रलंबित जुन्या नोटीसांमधील अनधिकृत बांधकामांचे क्षेत्रफळ ७७७०.५० चौ.मी. इतके आहे.

• मा.शहरी दिवाणी न्यायालयाने खारीज केलेल्या व मा. उच्च न्यायालयात दाद मागण्याची प्रक्रिया सुरु असलेल्या प्रकरणांमधील अनधिकृत बांधकामांचे क्षेत्रफळ १०,५८९ चौ.मी. इतके आहे.

• एप्रिल, २०१८ पासून सदर मिलमधील ५२ बांधकामे/आस्थापने यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या असून, सदर अनधिकृत बांधकामांचे क्षेत्रफळ ६७०४.०२ चौ.मी. इतके आहे.

• सदर ५२ बांधकामांपैकी ४० अनधिकृत बांधकामधारकांनी कारणे दाखवा नोटीशीस मा.शहर दिवाणी न्यायालयात आव्हान दिले असून, उर्वरित १२ नोटीशींबाबत अंतिम आदेश पारित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

रघुवंशी मिलमधील अनधिकृत बांधकामांच्या अनुषंगाने मा.शहर दिवाणी न्यायालय व मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांत मा.न्यायालयांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

ज्या प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाची स्थगिती नाही अशा प्रकरणी नियमानुसार कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल शासनास ३ महिन्यात सादर करण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

बुलढाणा शहरातील प्रभाग क्र. ११ अंतर्गत सुरु असलेली रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याबाबत

(२३) * ११९२७१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील प्रभाग क्र. ११ अंतर्गत सुरु असलेले रस्त्याची कामे अंदाजपत्रकानुसार होत नसून निकृष्ट दर्जाची असल्याची बाब दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याची कामे अंदाजपत्रकानूसार व दर्जेदार करून निकृष्ट कामे रोखणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास नगरपरिषद प्रशासनाला दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार बुलढाणा शहरात सुरू असलेल्या रस्त्यांची कामे दर्जेदार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय.

यासंदर्भात दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजीचे स्थानिक सन्माननीय विधानसभा सदस्य यांचे निवेदन दिनांक ८/५/२०१८ रोजी नगरपरिषदेस प्राप्त झालेले आहे.

(३) • नागरी दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रभाग क्र.११ मध्ये रस्त्यांची एकूण ५ कामे प्रगतीपथावर आहेत.

• ही कामे अंदाजपत्रकानुसार व योग्य त्या दर्जाची होत नसल्याची सन्माननीय लोकप्रतिनिधींची तक्रार असल्याने या कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण त्रयस्थ यंत्रणेकडून करुन घेण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे.

• या पाचही कामांचे तांत्रिक लेखापरीक्षण करण्याचे काम प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

• सदर त्रयस्थ यंत्रणेकडून तांत्रिक लेखापरीक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेने बीएसयुपी योजनेअंतर्गत बांधलेली घरे प्रकल्पबाधितांना देण्याबाबत

(२४) * ११९६१४ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेने बीएसयुपी योजनेअंतर्गत बांधलेली घरे प्रकल्पबाधितांना देण्याचा निर्णय दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणाला शासनाची मान्यता असून याबाबत शासन एका महिन्यात निर्णय घेणार होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला आहे व अद्यापपर्यंत किती घरे प्रकल्पग्रस्तांना देण्यात आली आहेत व किती घरे अद्यापही रिक्त आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील धोकादायक इमारतीमधील ७२ कुटुंबांना केवळ तात्पुरत्या स्वरूपात बी.एस.यु.पी. च्या घरात राहण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

• यासंदर्भात धोरण ठरविण्याचे अनुषंगाने गृहनिर्माण विभागामार्फत केंद्र शासनाकडून दिनांक ३.०२.२०१८ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविले आहे तसेच दिनांक ३०.०६.२०१८ च्या स्मरणपत्रान्वये गृहनिर्माण विभागामार्फत केंद्र शासनास सत्वर कार्यवाहीसाठी विनंती करण्यात आलेली आहे.

• केंद्र शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

राज्यातील दलित व आदिवासी समाजातील व्यक्तींवर झालेल्या जातीय अत्याचारासंदर्भात ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करण्याबाबत

(२५) * ११८४६२ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत सन २०१७ या वर्षात अडीच हजार गुन्हे दाखल झाले असून, त्यामधील १ हजार ५६ गुन्ह्यांचा तपास पोलीसांच्या स्तरावर प्रलंबित असल्याबाबतचा अहवाल पोलीस महासंचालकांनी गृह विभागाला माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षभरात (२०१७) राज्यातील नऊ पोलीस परिक्षेत्रात अनुसूचित जाती व जमातीबाबत २०५३ गुन्हे दाखल झाले असून, त्यातील सर्वाधिक ४६७ गुन्हे कोल्हापूर परिक्षेत्रातील असल्याचे सदर अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील दलित व आदिवासी समाजातील व्यक्तींवर झालेल्या जातीय अत्याचारासंदर्भात दिनांक १ एप्रिल, २०१७ ते ३१ मे, २०१८ पर्यंत किती ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करण्यांत आले आहेत, किती गुन्ह्यांचा तपास लागला आहे व किती गुन्हे प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तींवरील अत्याचार प्रकरणात दाखल गुन्ह्यांचा वेगाने तपास होऊन ते न्यायप्रविष्ट होणे अपेक्षित असताना सदर गुन्हे हेतूपूरस्सर पणे पोलीस स्तरावर प्रलंबित ठेवण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अनुसूचित जाती व जमातीवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने तपास करून न्यायालयात दाखल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

राज्यात अनुसुचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत सन २०१७ मध्ये एकुण २१५३ गुन्हे दाखल आहेत

जानेवारी २०१७ च्या सुरूवातीस अनुसुचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत ८४१ गुन्हे प्रलंबित होते. जानेवारी ते डिसेंबर २०१७ पर्यंत २१५३ गुन्हे दाखल झाले आहेत. एकुण २९९४ गुन्हयांपैकी ३३७ गुन्हे तपासावर बंद करण्यात आले असून १६३७ गुन्हयांमध्ये न्यायालयामध्ये दोषारोप पत्र पाठविण्यात आले आहे. डिसेंबर २०१७ अखेर एकुण १०२० गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) एप्रिल २०१७ च्या सुरूवातीस अनुसुचित जाती/ जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातंर्गत ६२४ गुन्हे प्रलंबित होते. एप्रिल २०१७ ते मे २०१८ पर्यंत २६४१ गुन्हे दाखल झाले आहे. एकुण ३५६५ गुन्हयांपैकी ४०८ गुन्हे तपासावर बंद करण्यात आले आहेत. २०८१ गुन्हयांमध्ये न्यायालयामध्ये दोषारोपपत्र पाठविण्यात आले असून मे २०१८ अखेर एकुण १०७६ गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रलंबित प्रकरणांचा निपटारा प्रमाण वाढविण्यासाठी नागरी हक्क संरक्षण विभागामार्फत राज्य आणि परिक्षेत्र स्तरावर अधिकाऱ्यांच्या आढावा बैठका व कार्यशाळा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सर्व घटक प्रमुखांना विहित वेळेत प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

पवई (मुंबई) येथील भूखंड म्हाडा अधिका-यांनी पॉपकॉर्न इंडस्ट्रिजला देऊन केलेला गैरव्यवहार

(२६) * १२०३०४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई (मुंबई) येथील १० हजार चौ. मीटर क्षेत्रफळाचा भूखंड सन २०१५ मध्ये मा.न्यायालयात खोटे शपथ पत्र सादर करुन म्हाडा अधिका-यांनी 'पॉपकॉर्न इंडस्ट्रिज'ला देऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने दखल घेऊन चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार शासनाने म्हाडाच्या बेकायदा भूखंड हस्तांतरण प्रकरणास स्थगिती देऊन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) व (२) हे खरे नाही.
उपमुख्य अधिकारी (पणन), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा यांनी सदर भूखंडावर म्हाडामार्फत स्वत: गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत दि.१६.०४.२०१५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. सदर भूखंड म्हाडाच्या ताब्यात असून पॉपकॉर्न इंडस्ट्रिजला वितरीत करण्यात आलेला नाही. सदरहू भूखंडावर म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्याबाबतची कार्यवाही म्हाडा स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अजनी परिसरातील (नागपूर) अल्पवयीन मुलीची आंतरराज्य टोळीने विक्री केल्याबाबत

(२७) * ११७२०४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात अजनी परिसरातील १६ वर्षे अल्पवयीन मुलीला रुपये १ लाख १५ हजारात आंतरराज्य टोळीने विकल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत अजनी पोलीस स्टेशन, नागपूर येथे प्रथमखबरी दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंतरराज्य टोळी गत अनेकवर्षापासून नागपूर शहरामध्ये कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

सदर घटना दि. १६/११/२०१७ रोजी घडलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दि. २४/११/२०१७ रोजी अजनी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३२३/१७ भा.दं.वि. कलम ३६३, ३६५,३६६ (अ), ३६८, ३७०, ३७६(ड), १२० (ब), ३२३, ३४१, ५०६, ३४ भादंविसह कलम ४, ५ (जी), ६ पोक्सो कायदा अन्वये नऊ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नमुद गुन्हयातील सहा आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित तीन आरोपी फरार आहेत. सद्यस्थितीत अटकेतील आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. सद्यस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील पोलीस निवासस्थानाची दुरवस्था झाल्याबाबत

(२८) * १२४३०५ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली - माले (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) फाटा येथे पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना राहण्यासाठी १५ वर्षापूर्वी पोलीस निवासी इमारत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची पूर्णपणे दुरवस्था झाली असून सांडपाण्याची व्यवस्था नसल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारतीच्या झालेल्या दुरवस्थेमुळे पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना दुसऱ्या ठिकाणी आसरा घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार शासनाने कोडोली येथे पोलीस निवासस्थानाची नवीन इमारत उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी १ पोलीस निरीक्षक, १ उपनिरीक्षक, २ सहायक फौजदार,८ पोलीस हवालदार, ६ पोलीस नाईक व १२ पोलीस शिपाई यांचेकरिता एकूण ३० निवासस्थाने बांधकामासाठी नकाशे व अंदाजपत्रक मिळणेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प, कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

एचडीएल व गुड आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीकडून गोरेगांव (मुंबई) येथील प्रकल्पामध्ये सदनिका खरेदी करणाऱ्या लोकांची झालेली फसवणूक

(२९) * १२२९१५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एचडीएल व गुड आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीच्या संचालकाकडून ४६५ लोकांकडून सदनिकांसाठी घेतलेल्या सुमारे रुपये १३१ कोटींचा अपहार करुन फसवणूक केल्याप्रकरणी श्री.अमर अजवेकर व अन्य अनेक ग्राहकांनी गोरेगाव पोलीस स्टेशनमध्ये माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.अमर अजवेकर व अन्य ४६५ जणांकडून रुपये १३१ कोटी जमा केलेले असतानाही माहे मार्च २०१० ते मे २०१८ या कालावधीत कोणालाही सदनिकांचा ताबा देण्यात आला नव्हता असेही त्यांनी सदरहू तक्रारीत नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी गोरेगाव येथील 'द मिडोज' या गृहप्रकल्पात सदनिका खरेदी करणारे तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गोरेगाव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २९१/२०१७ भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, १२०(ब) सह कलम ३, ४, ५, ८, १३ मोफा अधिनियम, १९६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तद्नंतर, नमुद गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ५०/२०१८ अन्वये वर्ग करुन तपास सुरु आहे.

आतापर्यंत एकूण १४ सदनिका धारकांकडुन आरोपी कंपनीने २० टक्के पेक्षा जास्त रक्कम स्विकारुन अद्यापपर्यंत प्रकल्पाचे बांधकाम अर्धवट करुन तसेच, विहीत वेळेत सदनिकेचा ताबा न देता अथवा त्याप्रमाणे काही सदनिका धारकांशी करार न करता त्यांचेकडुन एकूण रु. ४,९१,९७,१४०/- प्राप्त करुन त्यांची आर्थिक फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भामरागड-एटापल्ली तालुक्यांच्या (जि.गडचिरोली) सीमावर्ती भागातील बोरिया जंगलात पोलीस चकमकीत नक्षलवाद्यांचा झालेला मृत्यू

(३०) * ११८२९२ डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामरागड-एटापल्ली तालुक्यांच्या (जि.गडचिरोली) सीमावर्ती भागातील बोरिया जंगलात गडचिरोली पोलसांच्या सी-६० पथकाने दिनांक २१ एप्रिल,

२०१८ रोजी पासून केलेल्या शोध मोहिमेमध्ये दिनांक २२ एप्रिल, २०१८ रोजीपर्यंत एकुण ३९ नक्षलवादी ठार मारले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नक्षलवादी विरोधी कारवाईत नक्षलवाद्यांच्या विभागीय समितीचा सदस्य व जलाल कमांडर तसेच पेरिमिली दलमचे बहुतांश सदस्य ठार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिरोंचा तालुक्याप्रमाणे नक्षलविरोधी कारवाई करुन भामरागड-एटापल्ली तालुका नक्षलमुक्त करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

तथापी, दि.२२.०४.२०१८ रोजी भामरागड तालूक्यातील मौजे बोरीया येथे झालेल्या चकमकीत ३४ नक्षलवादी तसेच दि.२३.०४.२०१८ रोजी अहेरी तालूक्यातील मौजे नैनेर जंगल परिसरात झालेल्या चकमकीत ६ नक्षलवादी असे एकूण ४० नक्षलवादी ठार झाले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भामरागड व एटापल्ली तालूका नक्षलमुक्त करण्याच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

i) अती नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयातील नक्षली कारवायांना प्रतिबंध घालण्याकरीता राज्य व केंद्र शासनाच्या वतीने संयुक्त कारवाई करण्यात येत आहे.

ii) शासनाने जाहिर केलेल्या योजना कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत.

iii) नक्षलग्रस्त क्षेत्रात सिक्युरिटी व्यवस्थापणाचे जाळे पसरविण्यासाठी पोलीस ठाणे, उप पोलीस ठाणे सशस्त्र पोलीस दुरक्षेत्र स्थापन करण्यात आले आहे.

iv) जिल्हा पोलीस, राज्य राखीव पोलीस, केंद्रिय अर्धसैनिक बलाच्या तूकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

v) नक्षलशोध अभियान, पेट्रोलिंग, नाकाबंदी, इत्यादी राबवून नक्षलवाद्यांच्या स्वैर हालचालींवर प्रतिबंध घालण्यात येत आहे.

vi) एटापल्ली तालूक्यात ४ दुरक्षेत्राची स्थापना करुन हेडरी हा स्वतंत्र उपविभाग तयार करण्यात आला असून तेथे उप अधिक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

vii) भामरागड ते लाहेरी दरम्यान पोलीस मध्यवर्ती केंद्र धोडराज येथे स्थापन करण्यात आले आहे. सदर परिसरात उपविभाग व पोलीस स्टेशन नुसार शेकडो गुप्त बातमीदार व एस.पी.ओ. च्या माध्यमातून गुप्त वार्ता संकलनाची कामे होत आहेत.

viii) जिल्हाअंतर्गत राज्यगुप्तवार्ता विभागाचे युनिट व केंद्रीय अधिसूचना ब्युरो यांचे मोठे जाळे गुप्तवार्ता संकलनाचे काम करुन मदत करीत आहेत.

ix) नक्षल आत्मसमर्पण योजनेमुळे नक्षलवादी नक्षली चळवळीपासून परावृत्त झाले आहेत.

वरील कृतीमुळे भामरागड व एटापल्ली तालूक्याअंतर्गत नक्षलांची संख्या कमी झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुसद (जि.यवतमाळ) येथील युवकाचा पोलीसांच्या अमानुष मारहाणीत झालेला मृत्यु

(३१) * १२१४१४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील रहिवाशी श्री.भिमा हाटे या युवकाला पुसद पोलीस ठाण्याचे पोलीसांनी विनयभंगाचे आरोपाखाली दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांच्या अटकेत असलेल्या श्री.भिमा हाटे यास पोलीसांनी केलेल्या अमानुष मारहाणीत त्यांचे मुत्राशयास जबर दुखापत झाल्याने दिनांक १८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुसद पोलीसांच्या अमानुष मारहाणीमुळे श्री. हाटेंच्या झालेल्या मृत्यूबाबत संबंधित पोलीस ठाणेदाराविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी तेथील नागरिकांनी व विविध आंबेडकरी संघटनांनी दिनांक १८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास यवतमाळ जिल्हयाचे पालकमंत्री यांचे कार्यालयासमोर त्याच दिवसापासून उपोषण सुरु केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर व सदर ठाणे अंमलदार यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे,

श्री.भिमा तुकाराम हाटे, यास पोलीस स्टेशन पुसद शहर येथे नोंद गु.र.क्र.१२१/१८ कलम ३५४,३५४(अ), ३५४ (ड), ५०९, २१४, ५०६, ३४ भा.दं.वि. गुन्हयात दिनांक २९/०४/२०१८ रोजी अटक करण्यात आली होती.
(२) भिमा तुकाराम हाटे, यास दिनांक २९/०४/२०१८ रोजी अटक केल्यानंतर दुसरे दिवशी दिनांक ३०/०४/२०१८ रोजी मा.न्यायदंडाधिकारी पुसद यांचे समक्ष हजर करण्यात आले असता त्याने पोलीसांनी मारहाण केल्याबाबत कोर्टा समक्ष काहीही सांगीतले नाही.

दिनांक ३०/०४/२०१८ रोजी सदर आरोपीस जामीन मंजूर करण्यात आला होता. दिनांक ०२/०५/२०१८ रोजी तब्येत बिघडल्याने मयत आरोपीवर आचार्य विनोबा भावे, ग्रामीण रुग्णालय, सावंगी मेघे जिल्हा वर्धा येथे उपचार सुरु असताना आरोपीचा दिनांक १७/०५/२०१८ रोजी उपचारा दरम्यान मृत्यु झाला. शवविच्छेदन अहवालात आरोपीच्या मृत्युचे कारण डेथ इज डयु टू रेनल टयुब्युलर डॅमेज व्हीथ फिचर्स ऑफ न्युमोनिया असे नमुद केले आहे.
(३) हे खरे नाही.

दिनांक १८/०५/२०१८ रोजी यवतमाळ जिल्हयाचे पालकमंत्री यांचे कार्यालया समोर नागरीकांनी वा आंबेडकरी संघटनांनी उपोषण केलेले नाही. परंतु दिनांक १८/०५/२०१८ रोजी शवविच्छेदनानंतर मृतकाचे नातेवाईक यांनी मृतक भिमा हाटेचे शव पोलीस स्टेशन, पुसद शहर चे गेट समोर ठेवून

ठाणेदार अनिलसिंह गौतम यांना निलंबित करुन त्यांचेवर खुनाचा गुन्हा नोंद करुन अटक करावी अशी मागणी केली. या प्रसंगी नातेवाईकांसोबत इतर १५० ते २०० लोक त्या ठिकाणी उपस्थित होते.

(४) भिमा हाटे यांचे मृत्यु प्रकरणी पोलीस स्टेशन पुसद शहर येथे नोंद अकस्मात मृत्यु क्रमांक १३/१८ क्र १७४ सी.आर.पी.सी. प्रकरणाचा तपास सहायक पोलीस अधीक्षक ,उपविभाग पुसद यांचे नेतृत्वाखालील विशेष तपास पथकाकडून सुरु आहे. पोलीस स्टेशन, पुसद शहर चे ठाणेदार पोलीस निरिक्षक श्री.अनिलसिंह गौतम यांचेवर मृतकाचे नातेवाईकांनी मारहाण करुन शिवीगाळ केल्याचे आरोप केल्याने त्यांची दिनांक १८/०५/२०१८ रोजी पोलीस नियत्रंण कक्ष, यवतमाळ येथे बदली करण्यात आली होती. तद्नंतर दिनांक १९/०५/२०१८ रोजी त्यांना निलंबित करण्यात आले होते. सदर निलबंन आदेश दिनांक २९/०६/२०१८ रोजी रद्द करण्यात येऊन दिनांक २९/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये त्यांची प्राथमिक चौकशी आदेशित करण्यात आली आहे.

(५) विलंब झालेला नसुन वेळीच आवश्यक कारवाई करुन अकस्मात मृत्यु क्रमांक १३/१८ कलम १७४ सी.आर.पी.सी. प्रकरणाचा सखोल तपास सुरु आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा विभागाचे रिमॉडलिंग करण्याचा घेतलेला निर्णय

(३२) * ११८२९६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कळवा-मुंब्रा परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी येथील पाणीपुरवठा विभागाचे रिमॉडलिंग करण्याचा निर्णय माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, परिसरातील रहिवाशांच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय.

ठाणे महानगरपालिकेने पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी रिमॉडलिंग करण्याच्या प्रस्तावाचे घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे:-
* कळवा प्रभाग समिती अंतर्गत रिमॉडलिंग प्रकल्पाअंतर्गत ५ जलकुंभ बांधणे व या जलकुंभासाठी वहन वाहिन्या अंथरणेचे काम सुरु आहे.
* मुंब्रा व दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडलिंग करणेसाठी सन २०१८-२०१९ मध्ये ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पासाठी ५०.०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.
(३) ठाणे महानगरपालिकेने कळवा-मुंब्रा परिसरातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत:-
* मुंब्रा प्रभाग समितीमधील पाणी पुरवठयात सुधारणा करणेसाठी मुंब्रा विभागात ७ ठिकाणी संप-पंप हाऊसची उभारणी करणे व पंम्पींग मशिनरी बसविणेसाठी निविदा प्रक्रिया ठाणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे.
* मुंब्रा व दिवा प्रभाग समितीमधील सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत ठाणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगरपालिकेमार्फत नागपूर शहराला करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्याबाबत

(३३) * ११७१५२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा),

श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेमार्फत नागपूर शहराला करण्यात येत असलेला पाणी पुरवठा दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास पासून विस्कळीत झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभाग ३१ मध्ये गेल्या दीड महिन्यापासून पाणीटंचाई असणे, प्रभाग क्र.२० मध्ये दूषित पाण्याचा पुरवठा होणे, प्रभाग क्र.५ मध्ये नळाद्वारे होणारा पाणी पुरवठा सुरळीतपणे होत नसणे, अनेक वस्त्यांमध्ये दूषित पाणीपुरवठा व पाणीटंचाई असणे, बाळाभाऊ पेठ, रामेश्वरी, नारा, नारी, हसनबाग, सुदामपुरी, मोमीनपुरा,दर्शन कॉलनी यासह अनेक वस्त्यांमध्ये दूषित व अपुऱ्या अनियमित होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या संदर्भात नगरसेवक व नागरिकांनी मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना वेळोवेळी निवेदने दिली आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, नागपूर शहराला शुध्द पुरेसा व नियमित पाणीपुरवठा करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

नागपूर शहराच्या कांही भागात दिनांक १२/०४/२०१८ ते दिनांक १५/०४/२०१८ या कालावधीत पाणीपुरवठा विस्कळीत झालेला होता.

(२) व (३) प्रभाग क्रमांक-३१ मधील कांही भागामध्ये कमी दाबाने पाणीपुरवठ्या तक्रारी होत्या, परंतु नालंदा नगर पाण्याच्या टाकीवरुन पाणीपुरवठा सुरु केल्यानंतर या भागात सुरळीत पाणीपुरवठा सुरु झालेला

आहे. सद्य:स्थितीत चार जलकुंभावरुन सुरळीत पाणीपुरवठा होत असून, या प्रभागात पाणीपुरवठा सुरळीत सुरु झालेला आहे.

प्रभाग क्रमांक-२० या प्रभागात असलेल्या १४ वसाहतीपैकी ०४ वसाहतीमध्ये असलेल्या जुन्या व जिर्ण जलवाहिन्यामुळे दूषीत पाण्याच्या तक्रारी येत आहेत. तथापि, महापालिकेच्या २४X७ योजनेतंर्गत या भागात नवीन जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या असून, या भागातील रहिवाशांचे घरगुती नळ कनेक्शन नवीन जलवाहिनीवर स्थलांतरित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रभाग क्रमांक-०५ मध्ये १६ वसाहतीपैकी ०६ भागात कमी दाबाने पाणीपुरवठ्याच्या तक्रारी असुन, या भागात महापालिकेच्या २४X७ योजनेतंर्गत सुरु असलेली कामे पूर्ण झाल्यानंतर, पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.

बाळापेठ- मधील बहुतांश भागात नव्याने बदलण्यात आलेल्या जलवाहिन्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत सुरु झाला असून, काही भागात पाईपलाईन बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

रामेश्वरी- या भागात दिनांक १८/०४/२०१८ रोजी सायंकाळी झालेल्या पाणीपुरवठ्याचेवेळी पाण्याला विशिष्ट कुबट वास होता त्याचे निराकरण दुसऱ्याच दिवशी करण्यात आले आहे. त्यावेळी नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून या भागात टँकरने त्वरीत पाणीपुरवठा केला होता.

नारा- सद्य:स्थितीत महापालिकेच्या २४X७ योजनेतंर्गत महापालिकेच्या हद्दीमध्ये सुरुळीत पाणीपुरवठा सुरु असून, या भागातील नासुप्रच्या हद्दीमध्ये जलवाहिन्यांचे जाळे नसल्यामुळे या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

नारी- या भागात महापालिकेच्या २४X७ योजनेतंर्गत मुख्य जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर असुन, ३० जून, २०१८ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षीत आहे. त्यानंतर या भागाचा पाणीपुरवठा सुरळीत होईल.

हसनबाग- सद्य:स्थितीत या भागात महापालिकेकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे दूषीत पाण्याच्या तक्रारी कमी झालेल्या आहेत.

सुदामपुरी-सद्य:स्थितीत या भागात महापालिकेकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे बहुतांश समस्या दूर झालेल्या आहेत.

मोमीनपुरा- महापालिकेच्या २४X७ योजनेतंर्गत या भागातील जुन्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

दर्शनकॉलनी- महापालिकेच्या २४X७ योजनेतंर्गत या भागातील जलवाहिन्या बदलल्यामुळे, या भागातील दूषीत पाण्याच्या तसेच कमी पाण्याच्या तक्रारीचे निवारण झालेले आहे.

(४) व (५) नागपूर महानगरपालिकेकडून शहरास सम प्रमाणात योग्य दाबाने व शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या हेतूने नागपूर शहर २४X७ योजना राबविण्यात येत असून, योजनेची भौतीक प्रगती ७५.९२% इतकी असून, प्रकल्प पूर्ण होण्याचा अपेक्षीत दिनांक ३१ मार्च, २०१९ असा आहे.

गिरीज (ता.वसई, जि.पालघर) येथील रस्ता दुरुस्तीचे काम न करता संगमताने केलेला गैरव्यवहार

(३४) * ११९५८१ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरीज (ता.वसई, जि.पालघर) येथील रस्ता दुरुस्तीचे काम प्रत्यक्ष न करता कागदोपत्री केल्याचे दाखवून महापालिकेच्या सहाय्यक अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील गिरीज ढोरकाई पाडा येथे बिलकाई देवी मंदिर ते मुख्य रस्त्यापर्यंत पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाला दिनांक २४.११.२०१५ रोजी प्रशासकिय मंजुरी देण्यात आली.

सदर कामासाठी ई-निविदा पध्दतीने दिनांक १५.०५.२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आले.

सदर कामास स्थानिक जमिन मालकांनी विरोध केल्याने उपरोक्त मंजुर ठिकाणा ऐवजी ढोरकाई पाडयातील छोट्या गल्ल्यांमध्ये पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामास फेरमंजुरी देण्यात आल्याचे तसेच उक्त काम पुर्ण करण्यात आल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, दिनांक ०८.०६.२०१८ च्या शासन परिपत्रकातील अटीचे उल्लंघन झाले असल्याने या प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या २७४ पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे काम अतिशय संथ गतीने सुरु असल्याबाबत

(३५) * १२१३२२ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या २७४ पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे काम अतिशय संथ गतीने सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त २७४ पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे काम करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने तीन कन्सल्टन्ट कंपन्या नियुक्त्या केल्या होत्या त्यांचा अहवाल वेळेवर तयार करण्यास विलंब होत असल्याने पुलांची दुरुस्ती, धोकादायक पुलांचे नव्याने करण्यात येणारे बांधकाम रखडले आहे हे लक्षात घेता सदरहू अहवाल वेळेत प्राप्त होऊन पुढील योग्य कार्यवाही करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या ३०४ पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार अस्तित्वात असलेल्या पुलांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे:-

सुस्थितीत असलेले	११४
किरकोळ दुरुस्ती आवश्यक असलेले	१११
मोठ्या दुरुस्त्या आवश्यक असलेले	६१
पुनर्बांधणी आवश्यक असलेले	१८
एकूण	३०४

पुलांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीच्या कामाकरिता निविदा प्रक्रियेची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्याच्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करुन देणेबाबत

(३६) * ११९१११ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यामध्ये गत वर्षी सुमारे ११ ठिकाणी आग लागून अनेक नागरिकांच्या घरांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.किरण गित्ते यांनी नगरपंचायतीला अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करुन देण्याचे अश्वासन देवून यासंबंधीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मागील वर्षी दिले असल्याचे निदर्शनास आले असून सदर प्रस्ताव नगरपंचायत प्रशासनाने सादर केला असून एक वर्ष होवूनही अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शानस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार अग्निशमन यंत्रणा उपलब्ध होण्याकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांना लेखी कळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित अग्निशमन यंत्रणा उपलब्ध होण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) शहरामध्ये तसेच तालुक्यातील इतर ग्रामीण भागात मागील वर्षभरात नागरिकांच्या घरांना आग लागण्याचे प्रकार घडले आहेत, हे खरे आहे.
(२), (३) व (४) • नांदगाव खंडेश्वर नगरपंचायत हद्दीसह तालुक्यात कोठेही आग लागल्यास आजमितीस पोलीस यंत्रणा व तहसिलदारांच्या नियंत्रणाखालील आपत्ती व्यवस्थापन कक्षाला सूचना दिली जाते. सदर कक्षाकडून उपलब्धतेनुसार शेजारील चांदुर रेल्वे, नेर, कारंजा या नगरपरिषदा व अमरावती महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध अग्निशमन यंत्रणेला बोलावून आगीवर नियंत्रण मिळविले जाते.
• नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीने जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०१६-१७ मध्ये अग्निशामक वाहनासह अन्य आवश्यक उपकरणे खरेदीसाठी रुपये १.८५ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती यांना सादर केला होता.
• नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीच्या सदर प्रस्तावानुसार जिल्हा वार्षिक योजनेतून तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती सन्माननीय लोकप्रतिनिधी यांच्याकडून जिल्हाधिकारी, अमरावती यांना करण्यात आली असून त्याबाबत त्यांच्याकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.
• नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीने सदर प्रस्तावास सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेऊन प्रस्ताव सादर केल्यास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या तरतूदीतून त्यांना यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे, असे जिल्हाधिकारी, अमरावती यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात २ व्यक्तींचा झालेला मृत्यु

(३७) * ११७९६८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी मालेगाव रोडवर व सावळदे गावालगत असलेल्या फाट्यावर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघातात दोन ठार व काहीजण जखमी झाल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अपघातांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

दि. १७.०४.२०१८ रोजी दोन अपघात झाले असून त्यामध्ये दोन व्यक्ति मयत झाल्या आहेत.

(२) धुळे जिल्हयात मालेगाव रोडवर झालेल्या अपघातात १ स्त्री मयत झालेली आहे. त्यानुषंगाने चाळीसगांव रोड पोलीस ठाणे, गु.र.नं. ४८/२०१८, भा.द.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, सह मो.वा.का. कलम १८४, १३४/१७७ प्रमाणे दोन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल आहे. एका आरोपीस अटक केली आहे.

सावळदे फाटा, चाळीसगांव रोड, येथे झालेल्या अपघातात रिक्षा चालक मयत झाले आहेत. या संदर्भात मोहाडी नगर पोलीस ठाणे गु.र.न. ५१/२०१८ भा.द.वि. ३०४(अ), २७९, ३३८, ४२७ सह मो.वा.का. कलम १८४, १३४/१७७ प्रमाणे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल आहे. गुन्हा तपासावर आहे.

अपघातग्रस्त व्यक्तींच्या कुटूंबियांना मोटार अपघात दावा दाखल करणेकामी मयत व्यक्तींचे आवश्यक ते कागदपत्र पुरविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वडारपाडा, नरसीपाडा, हनुमान नगर, कांदिवली (पूर्व) मुंबई येथील झोपडपट्टी पूनर्वसन योजनेबाबत

(३८) * ११८१५४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडारपाडा, नरसीपाडा, हनुमान नगर, कांदिवली (पूर्व) मुंबई येथील झोपडपट्टी पूनर्वसनाचे काम मे .किरण हेमाणी या विकासकामार्फत करण्यात येत असून विकासकांनी ४ इमारतींचे बांधकाम नियमबाह्य शासनाच्या आरक्षित जागेवर केले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी निदर्शनास आले असुनही अद्याप सदर बांधकामावर कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,विकासकांनी ९ वर्षात झोपडीधारकांसाठी एकही इमारत बांधली नसुन, झोपडीधारकांना भाडे दिले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असून शासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन पाधिकरण, मुंबई यांच्याकडे केली आहे ,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व पुढे संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) न.भू.क्र. १६३ अे (पै) व १६६ मौ. आकुर्ली, हनुमान नगर या क्षेत्रासाठी मे. रुचिप्रीया डेव्हलपर्स यांना महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ मधील कलम ३ के अंतर्गत दि. २६.०८.२००९ रोजी विशेष टाऊनशिप प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे सदर योजनेस देण्यात आलेले आशयपत्र/तात्पुरते आशयपत्र किंवा आय.ओ.ए./सी.सी. रद्द करण्याबाबत व मोकळ्या जागेवर विकासकामार्फत बांधकाम सुरु असल्यास ते तात्काळ थांबविण्यासाठी Stop Work Notice देण्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने दि. १४.०८.२०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सदर मिळकतीमध्ये रिकाम्या असलेल्या भूखंडावरील सुरु असलेले बांधकाम थांबविण्यासाठी नोटीस दिली. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी विकासकास कारणे दाखवा नोटीस देऊन दि. २५.०४.२०१६ रोजी सुनावणी घेतली व मोकळा भूखंड / जागा ताब्यात घेण्याचे आदेश दिले. सदर आदेशाविरुध्द मे. रुचिप्रीया डेव्हलपर्स यांनी मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले असून मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत उप विभागीय अधिकारी यांना जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांच्याद्वारे कळविण्यात आले आहे.

(२), (३) व (४) सदर योजनेतील झोपडीधारकांना भाडे न मिळाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे. तथापि, मे. रुचिप्रीया डेव्हलपर्स यांच्या मार्फत राबविण्यात येत असलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला दि. ११.१२.२००९ रोजी तात्पुरते आशयपत्र देऊन देखील अद्यापपर्यंत एकाही संस्थेचे पुनर्वसन केलेले नसल्याने मे. रुचिप्रीया डेव्हलपर्स यांना महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ मधील कलम ३ के अंतर्गत न.भू.क्र. १६३ अे (पै) व १६६ मौ. आकुर्ली, हनुमान नगर या क्षेत्रासाठी देण्यात आलेले विशेष निर्देश मागे घेण्यात आले असून सदरहू योजनेस देण्यात आलेले तात्पुरते आशयपत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे दि. २७.०६.२०१८ रोजी रद्द करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे महानगरपालिका शहरातील क्रीडा संकुले ठराविक संस्थांना निविदा प्रक्रियेशिवाय भाडेपट्टयावर देत असल्याबाबत

(३९) * ११८१२९ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध भागात क्रीडा संकुलांची उभारणी करण्यात आली असून त्यापैकी शरदचंद्र पवार क्रीडा संकुल, ठाणे क्लब आणि शहीद ओंबळे बॅडमिंटन कोर्ट ही क्रीडासंकुले ठराविक संस्थांना कोणत्याही निविदा प्रकियेशिवाय भाडेपट्ट्यावर देण्यात आली असल्याचे माहे मे, च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय भूखंडावर बांधलेली क्रीडा संकुले कोणत्याही स्वारस्य अभिव्यक्ती करारांशिवाय ठराविक संस्थांना भाड्याने दिल्याने नियमांचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त क्रीडा संकुलातील सुविधांच्या वापरासाठी खाजगी संस्थांनी अत्यंत जास्त दरपत्रक ठेवल्यामुळे सामान्य नागरिकांना प्रवेश मिळत नसल्याच्या तक्रारी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेच्या अखत्यारीतील क्रीडासंकुले भाड्याने देताना निविदा प्रक्रिया राबविणे आणि नागरिकांना वाजवी किंमतीत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

या प्रकरणी शरदचंद्र पवार क्रिडा संकुल व शहिद तुकाराम ओंबळे बॅडमिटंन कोर्ट या करीता मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशान्वये विहित प्रक्रिया (Standard Operating Procedure) निश्चित करून ठाणे महानगरपालिकेमार्फत स्वारस्य अभिव्यक्ती देकारची प्रक्रिया ठाणे महानगरपालिका स्तरावर राबविण्यात येत आहे.

परंतु शरदचंद्र पवार क्रिडा संकुल दिनांक ०५.१२.२०१५ पासून तर शहिद तुकाराम ओंबळे बॅडमिटंन कोर्ट दिनांक १६.०४.२०१८ पासून कोणतीही निविदा प्रक्रिया न करता खाजगी संस्थांना ठाणे महानगरपालिकेने आपसातील करारान्वये उपलब्ध केल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(३) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

परंतु शरदचंद्र पवार क्रिडा संकुल सभासद सदस्य फी अधिक असल्याचे तसेच सामान्य नागरीकांना उक्त क्रिडा संकुलाचा वापर करण्यास अडचण निर्माण होत असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते.

(४) या प्रकरणी ठाणे महानगरपालिकेने शासनाच्या धोरणाशी सुसंगत कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास येत असल्याने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना या प्रकरणी तीन महिन्यात चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारीतील क्रीडासंकुले भाड्याने देताना शासनाच्या धोरणानुसार तीन महिन्यांत निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याची तसेच नागरिकांना वाजवी किमंतीत क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यासंदर्भात आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर (ता.जि.सोलापूर) महानगरपालिकेच्या भंगार विक्रीत व सार्वजनिक शौचालय दुरुस्तीत कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

(४०) * १२३८१८ श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर (ता.जि.सोलापूर) महानगरपालिकेच्या भंगार विक्रीत व सार्वजनिक शौचालय दुरुस्तीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर महानगरपालिकेकडून भंगाराचे मुल्यांकन केल्यास रुपये ३.५० कोटी होत असताना प्रत्यक्षात त्याचे मुल्यांकन रुपये १.५० कोटी दाखविण्यात आले आहे तसेच शौचालय दुरुस्तीसाठी शासनाकडून रुपये ३.५० कोटी निधीतून प्रशासनाने कोणतीही सक्षम मान्यता न घेता रुपये १ कोटी ८० लाख खर्च केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, अशा आशयाचे वृत्त दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते.
(२) असे आढळून आले नसल्याचे सोलापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) • सोलापूर महानगरपालिकेतील भंगार व जुनी वाहने या दोन बाबींच्या विक्रीसाठी कंडमनेशन बोर्डाने ठरविलेल्या किंमतीस सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन, ई-निविदा पद्धती अनुसरण्यात आली आहे.
• सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेले व निविदेत प्रसिद्ध झालेले भंगाराचे मुल्यांकन रुपये १,१४,१६,५००/- एवढे होते. याबाबत सर्वात जास्त किंमतीची रुपये १,३०,७१,८९२/- एवढ्या किंमतीची निविदा प्राप्त झाली. सदर निविदा मंजूर करण्यात आली.
• सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेले व निविदेत प्रसिद्ध झालेले विक्री करावयाच्या जुन्या वाहनांचे मुल्यांकन रुपये १४,८३,०००/- एवढे होते. तथापि, ३ पात्र निविदा प्राप्त न झाल्याने सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही.
• स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सार्वजनिक शौचालयातील ४९२५ सीट्स दुरुस्त करण्याचा जुलै, २०१७ मध्ये निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक ५/७/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर दुरुस्तीच्या रुपये ३.१३ कोटी एवढ्या रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

• शहरातील सार्वजनिक शौचालयातील ४९२५ सीट्स पैकी २४०० सीट्सची सोलापूर महानगरपालिकेच्या वार्षिक मंजूर मक्तेदारांकडून आतापर्यंत दुरुस्ती करण्यात आली आहे. या दुरुस्ती कामांबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने सदर कामांची स्थायी समितीने नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत (अतिरिक्त आयुक्त, विधि सल्लागार व मुख्य लेखापरीक्षक) चौकशी करण्यात आली आहे. चौकशी दरम्यान दुरुस्तीत काही किरकोळ दोष आढळले असून ते कंत्राटदाराकडून दुरुस्ती करुन घेऊन दूर करण्यात आलेले आहेत. स्थायी समितीने रुपये १,८०,९८,७३०/- एवढी रक्कम कंत्राटदारांना प्रदान करण्यास मंजूरी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी बेसिकमध्ये वाढीव एफ.एस.आय. देण्याबाबत

(४१) * ११६७२५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांना घरे उपलब्ध होण्यासाठी शासनाने फंजीबल एफ.एस.आय. देवूनही गिरणी मालक घरे बांधण्यास तयार होत नसल्याने बेसिकमध्ये वाढीव एफ.एस.आय. देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) शासनाने दि. ०५/०८/२०१७ रोजीचे अधिसूचनेद्वारे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील विनियम ३५(४) मध्ये फेरबदल करुन कापड गिरण्यांमधील रहिवास इमारती/चाळींचे पुनर्विकासासाठी

फंजीबल चटई क्षेत्र निर्देशांक कोणतेही अधिमूल्य न आकारता अनुज्ञेय केले आहे. तथापि, त्यानुसार अंमलबजावणी होत नसल्यावे निदर्शनास आल्याने प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मंजूर करताना मंजूरीतून वगळलेल्या भागात (ई.पी.मध्ये) पुनर्वसनासाठी ३०० चौ. फूट ऐवजी ४०५ चौ.फूट कार्पेट क्षेत्राच्या सदनिका देवून पुनर्वसन करण्याबाबत तरतूद प्रस्तावित आहे. तसेच अशा रहिवास इमारती/ चाळींचे त्यालगतचे समासिक अंतरे धरुन येणारे काल्पनिक क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रावरील चटई क्षेत्र निर्देशांक हा ४.० पेक्षा जास्त अनुज्ञेय राहणार नाही, अशी तरतूद सुध्दा प्रस्तावित आहे.

(२) प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील सदर प्रस्तावित तरतूदीबाबत दि.०८/०५/२०१८ रोजीचे सूचनेद्वारे नागरीकांकडून हरकती / सूचना मागविल्या आहेत.

(३) सदर प्रस्तावित तरतूदींवर प्राप्त होणाऱ्या हरकती /सूचनांवर नियुक्त अधिकारी व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर विकास योजना मंजूरीमधून वगळलेल्या भागास (ई.पी.) शासनस्तरावरुन मंजूरी दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी सुरु होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील १३३ अतिधोकादायक इमारतींवर कारवाई करण्याबाबत

(४२) * १२२४५३ श्री.राज पुरोहित (कुलाबा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एकूण ५५५ धोकादायक इमारतींपैकी महानगरपालिकेने आतापर्यंत १२१ इमारती पाडल्या असून ११२ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजूनही १३३ अतिधोकादायक इमारतींमध्ये रहिवासी राहत असून त्यांना इमारत रिकामी करण्याचे आदेश देण्यात आले परंतु रहिवाशांना पर्याय नसल्यामुळे या इमारतींमध्येच राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने याची गंभीर दखल घेत मे अखेरपर्यंत या १३३ अतिधोकादायक इमारतींवर कारवाई पूर्ण करणार असल्याचा दावा केल्याचे दिनांक १० मे, २०१८ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती इमारतींवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात एप्रिल, २०१८ अखेरीस ६० शासकीय, ७३ महानगरपालिका व ५५५ खाजगी अशा एकूण ६८८ इमारती अतिधोकादायक व मोडकळीस (सी-१ प्रवर्ग) आलेल्या आढळून आल्या होत्या.

सदर ६८८ इमारतींवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ अन्वये खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे:-

- १२१ इमारती निष्कासित करण्यात आल्या.
- ११२ इमारती रिकाम्या करण्यात आल्या.
- १६७ इमारतींची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.
- ३७ इमारतींची प्रकरणे तांत्रिक सल्लागार समितीकडे आहेत.
- ११८ इमारतींची जलजोडणी व विद्युतजोडणी खंडीत केली आहे.
- १३३ इमारतींची जलजोडणी, विद्युतजोडणी खंडीत करणे व इमारत रिकामी करणे याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) सदर १३३ इमारतींमधील रहिवाशांच्या ताब्यातील चटईक्षेत्र मोजून प्रमाणपत्र देणे, इमारत मालकाकडून पर्यायी जागा देणे व इमारतींची जल जोडणी व विद्युत जोडणी खंडीत करणे इत्यादी बाबींची पुर्तता करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) त्यानुसार आतापर्यंत २ रिकाम्या करण्यात आलेल्या इमारती निष्कासित करण्यात आल्या असून, २ इमारतींची जल जोडणी व विद्युत जोडणी खंडीत करण्यात आली आहे.

तसेच, इमारत रिकामी करणे, जल जोडणी/विद्युत जोडणी खंडीत करणे, निष्कासनासाठी निविदा मागणे इत्यादी अनुषंगिक कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.

कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई व शास्त्रीनगर रुग्णालयात रिक्त पदांसह यंत्रसामुग्रीचा अभाव असल्याबाबत

(४३) * १२१८६७ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई व शास्त्रीनगर रुग्णालयात डॉक्टर,नर्स, वॉर्ड बॉय,आया तसेच यंत्रसामुग्रीचा अभाव असून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्त्रीरोग चिकित्सेकरिता व प्रसुतीकरिता सर्वसाधारण व गोरगरीब नागरिक येथे येत असून दरमहा ३०० हून जास्त प्रसुती शस्त्रक्रिया होत असून डॉक्टरांची संख्या अपुरी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयांसाठी विविध ७० नवीन पदे मंजूर असून ती भरली जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेचे रूक्मिणी बाई रूग्णालय, कल्याण (प.) व शास्त्रीनगर सामान्य रूग्णालय, डोंबिवली (प.) ही प्रत्येकी १२० खाटांची दोन मोठी रूग्णालये तसेच ४ लहान दवाखाने व १३ नागरी आरोग्य केंद्र कार्यरत आहेत.

• महानगरपालिकेच्या आस्थापना सूचीवर डॉक्टर, नर्स, वॉर्ड बॉय व आया यांची एकूण ३०८ पदे मंजूर आहेत.

• त्यापैकी सद्या १९८ पदे कार्यरत असून ११० पदे रिक्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

• महानगरपालिकेच्या दोन्ही रूग्णालयात दैनंदिन वापराकरीता आवश्यक असलेली सर्व प्रकारची यंत्रसामुग्री उपलब्ध असून तिचा नियमित वापर सुरू आहे.

(२), (३) व (४) • सदर रूग्णालयात दरमहा ३०० हून जास्त प्रसुती व १३० हून जास्त सिझेरिंग व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया होतात, ही वस्तुस्थिती आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर आस्थापना सूचीवर ३०८ पदांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकुण ११५ पदे मंजूर आहेत.

• सदर ११५ पदांपैकी ४९ पदी वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून ६६ पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत.

• वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भांडूप (मुंबई उपनगर) या विभागात गत काही महिन्यात गुन्हेगारित वाढ झाल्याबाबत

(४४) * १२३०४६ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील भांडूप (प.) या विभागात माहे मार्च ते मे, २०१८ या कालावधीत १० ते १२ खूनाच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाकडुन चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार वाढत्या खुनांच्या प्रकाराला प्रतिबंध घालण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) उपनगरातील भांडूप (प.) या विभागात माहे मार्च ते मे, २०१८ या कालावधीत ६ खुनाच्या घटना घडल्या आहेत.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांच्या अध्यक्षतेखाली मा. लोकप्रतिनिधीं व सर्व संबंधीत अधिकाऱ्यांसह दिनांक ८.५.२०१८ रोजी बैठक घेण्यात आली.

भांडूप पोलीस ठाणे हद्दीत जेल मधून शिक्षा भोगून/जामीनावर सुटलेल्या आरोपींवर तसेच अभिलेखावरील आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, वारंवार तडीपार आरोपी, फरारी आरोपी, संशयित इसम यांची तपासणी करण्यात येत आहे. पोलीस ठाणे हद्दीत पोलीस वाहनांची गस्त वाढविण्यात आली असून कोंबिंग ऑपरेशन दरम्यान सराईत आरोपींची तपासणी करुन त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ग्लोबल इंजिनिअरिंग सर्व्हीसेस या कंपनीने बनावट प्रमाणपत्राच्या आधारे विविध विभागात सल्लागाराची कामे मिळविल्याबाबत

(४५) * १२४२०५ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्लोबल इंजिनिअरींग सर्व्हीसेस या सल्लागार कंपनीने बांधकाम विभाग लुधियाना येथील कार्यालयाची ३२८ कोटी रुपयांची कामे केल्याचे बनावट प्रमाणपत्र व पुणे महानगरपालिकेचे रस्त्याचे ७० कोटी रुपयांचे काम सल्लागार म्हणून केल्याचे बनावट प्रमाणपत्र ई-निविदेव्दारे सादर करुन एमएमआरडीए, महानगरपालिका, नगरपालिका विभागात सल्लागारांची कामे घेतल्याची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी मुख्य अभियंता (रस्ते) पुणे महानगर पालिका यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे व त्यानूसार संबंधीत सल्लागार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) • ग्लोबल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस या सल्लागार कंपनीस पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडून ७० कोटी रुपयांचे काम सल्लागार म्हणुन केलेबाबतचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

• तसेच अशा प्रमाणपत्राच्या आधारे पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडे कोणतेही सल्लागाराचे काम संस्थेला मिळालेले नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) • होय, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र यांचे कार्यालयाकडून महापालिकेकडे एप्रिल, २०१८ मध्ये पत्राव्दारे विचारणा करण्यात आली आहे.

• बनावट प्रमाणपत्राच्या आधारे पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडे सदर संस्थेने कोणेतेही सल्लागाराचे काम घेतले नसल्याने त्यांचेविरुध्द पुणे महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आलेली नाही.

• तथापि, याबाबतची तक्रार विचारात घेऊन आवश्यक दक्षता घेण्याबाबत एम.एम.आर.डी.ए., महानगरपालिका, नगरपालिकांना, सूचना देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

युएलसीच्या तरतुदीनुसार अतिरिक्त ठरलेल्या जमिनीवरील निवासी सदनिकांबाबत

(४६) * १२५७०१ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युएलसीच्या तरतुदीनुसार अतिरिक्त ठरलेल्या जमिनीवरील निवासी सदनिका बांधण्यास परवानगी देतांना एकूण बांधकामापैकी ठराविक टक्केवारीचे बांधकाम शासन नामनिर्देशित व्यक्तींना पूर्व निर्धारीत दराने वाटप करण्याची अट शासनातर्फे विकासकर्त्यांवर/जमिनधारकांवर टाकण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकर्त्यांकडून/जमिनधारकांकडून शासन नामनिर्देशित व्यक्तींना पूर्व निर्धारीत दराने वाटप करण्यासाठी अशा किती सदनिका शासन जमा करण्यात आलेल्या नाहीत,

(३) असल्यास, ज्या विकासकर्त्यांकडून/जमिनधारकांकडून शासन नामनिर्देशित व्यक्तींना पूर्व निर्धारीत दराने वाटप करण्यासाठी सदनिका शासन जमा करण्यात आल्या नाहीत अशा किती सदनिका आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी विकासकर्त्यांविरुद्ध/जमिनधारकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम २० अन्वये गृहबांधणी प्रयोजनार्थ सुट देण्यात आलेल्या योजनांमधून सदर योजनेच्या अटी व शर्तीनुसार एकूण बांधीव क्षेत्रामधील ५ टक्के बांधीव क्षेत्र सदनिकांच्या स्वरूपात शासनास हस्तांतरीत करणे आवश्यक आहे.

(२) व (३) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ हा राज्य शासनाने दि.२९.११.२००७ पासून लागु केला आहे. सदर नाजकधा निरसन अधिनियम लागु झाल्यानंतर राज्यातील ९ नागरी समुहांमध्ये गृहबांधणीसाठी परवानगी दिलेल्या एकूण योजनांपैकी १४०५ अपूर्ण योजनांमधून साधारणपणे ८८६८ सदनिका शासनाकडे सुपुर्द करणे बाकी आहेत.

(४) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २० अन्वये मंजूर करण्यात आलेल्या योजनांच्या वैधतेबाबत मा. उच्च न्यायालयासमोर दाखल केलेली याचिका क्र. ९८७२/२०१० व इतर संलग्न याचिकांवर मा.उच्च न्यायालयाने दि.०३.०९.२०१७ रोजी निर्णय दिलेला असून, त्यानुसार कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या सुटीच्या आदेशामधील अटी व शर्ती योजनाधारकावर बंधनकारक आहेत. सदरचा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका क्र.२९००६/२०१४ व इतर याचिकांअन्वये आव्हानित करण्यात आलेला असून मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०१.१२.२०१४ च्या अंतरिम आदेशानुसार मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती देऊन योजनाधारकांवर प्रतिकूल परिणाम होईल अशी कारवाई (Coercive action) करु नये,असे आदेश दिलेले आहेत.

तसेच सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनानुसार नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदी तपासून कलम २० खालील प्रलंबित योजना पूर्ण करणे वा अशा जमिनी विकसनासाठी उपलब्ध होण्याकरिता आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी शासन निर्णय दि.१६.०६.२०१७ अन्वये मा. श्री. बी.एन.श्रीकृष्ण, सेवानिवृत्त न्यायमुर्ती, मा. सर्वोच्च न्यायालय व श्री. बी.एन.मखिजा, सेवानिवृत्त सचिव, आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची द्विसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल अद्याप शासनास अप्राप्त आहे.सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर मधील विनसम समूहाच्या श्री.जतीन मेहता याने बँकांची फसवणुक केल्याबाबत

(४७) * १२३४५६ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील विनसम समूहाच्या श्री.जतीन मेहता याने १५ बँकांची ६८०० कोटी रुपयांनी फसवणुक केल्याचा प्रकार माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) आरोपी जतीन मेहता, माजी अध्यक्ष व इतर संचालक, मे. विन्सम डायमंडस् अँड ज्वेलरी लि. यांनी स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेकडून प्राप्त केलेल्या रु. ४१४ कोटी रकमेच्या कर्ज सुविधेचा गैरवापर करुन बँकेची फसवणूक केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी बी.के.सी. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १९५/२०१६ भा. दं.वि. कलम १२० (ब), ४२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपासाकरीता आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांचेकडे सदर प्रकरण वर्ग करण्यात आले आहे.

मे. विन्सम डायमंडस् अँड ज्वेलरी लि. या कंपनीच्या गैरव्यवहाराबाबत पंजाब नॅशनल बँकेने दाखल केलेल्या तक्रारीवरुन सीबीआय, मुंबई येथे देखील गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे अंमलबजावणी संचलनालय मार्फत चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चिखली (जि.बुलढाणा) नगरपरिषदेंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत मागणी केलेल्या निधीपेक्षा कमी निधी मिळाल्याबाबत

(४८) * १२४४२२ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) नगरपरिषदेंतर्गत एकत्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये मागणी केलेल्या निधी पेक्षा कमी निधी मिळाल्यामुळे मुख्याधिकारी, चिखली नगरपरिषद यांनी मा.कार्यक्रारी अभियंता - २ (प्रा) म्हाडा, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई यांच्याकडे दिनांक २२ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये निधीची मागणी केलेली आहे, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, एक वर्ष उलटूनही निधी न मिळाल्यामुळे घरकुलांचे काम अपूर्णावस्थेत असल्याने लाभार्थी घरकुलापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपूर्णावस्थेत असलेल्या घरकुलांचे काम पुर्ण होण्यासाठी शासनाकडून मागणी केलेला निधी चिखली नगरपरिषद यांना देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुळ योजना १९२४ घरकुलाची होती व प्रत्यक्षात योजना सिमीत करुन चिखली नगरपरिषदेमार्फत १२७१ घरकुले बांधण्यात आली त्या अनुषंगाने योजना सिमीत झाल्यामुळे निधी प्रमाणानुसार चिखली नगरपरिषदेस एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत पूर्ण वितरीत केला आहे. सदरची योजना दि.३१.०३.२०१७ रोजी बंद करण्यात आलेली आहे. सदर योजनेची अपूर्ण कामे संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने स्वखर्चाने पूर्ण करावयाची असून, अखर्चित निधी व्याजासह तसेच खर्च केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्रासह केंद्र शासनास सादर करावयाचे आहे. त्यामुळे चिखली नगरपरिषदेस अतिरिक्त निधी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

देवीचा पाडा (डोंबिवली (पश्चिम) ता.कल्याण, जि.ठाणे) भागात गुरचरण असलेल्या शासकीय जमीनीच्या गैरव्यवहाराबाबत

(४९) * ११७५७० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील डोंबिवली पश्चिम येथील देवीचा पाडा भागात गुरचरण असलेली शासकीय जमीन खाजगी जमीन असल्याचे भासवून सुमारे साडेआठ एकर जमिनीवर असलेल्या आरक्षित जमिनीचा टी.डी.आर.घेऊन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार सातबारा उताऱ्यामध्ये फेरफार करुन टी.डी.आर चे गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) मौजे गावदेवी येथील स.नं. ३५० अ (जुना), ३२ (नविन) या जमिनीवरील आरक्षित जमिनीचा नियमबाहय हस्तांतरणीय विकास हक्क कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने प्रदान केला असुन, यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची तक्रार मा. उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांचेकडे प्राप्त झाली होती. सदर प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीच्या ॲपेंडिक्स-डब्ल्यु मधील तरतूदींचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून आल्याने या प्रकरणामध्ये समाविष्ट कर्मचारी/अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरु करण्यापुर्वी त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याबाबतची कार्यवाही करण्याच्या सुचना संबंधितांना दिल्या आहेत. त्यानुसार नगर रचना संचालनालयाच्या संबंधित अधिकारी यांचेवर कार्यवाही होऊन त्यांचेवर दोषारोप बजावण्यात

आले आहे व प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग यांची चौकशी अधिकारी म्हणुन दि.२४/८/२०१७ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय प्रशासन सेवेमधील अधिकारी यांचेसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे कार्यवाही सुरु असुन, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कर्मचारी/अधिकारी यांचेसंदर्भात आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे. महसुल अभिलेखात फेरफार करणे ही बाब महसुल विभागाशी संबंधित असल्याने, त्या संबंधितावर कार्यवाहीबाबत महसुल विभागास विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड रुंदीकरणातील बाधित आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

(५०) * ११६८७४ श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी -विक्रोळी लिंक रोड रुंदीकरणाच्यावेळी पवई आयआयटीची काही जागा संपादन करतांना त्यावरील आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन एमएमआरडीए ने दिले होते परंतु त्यांची पुर्तता अद्यापपर्यंत झाली नसल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुंदीकरणावेळी जागा संपादन केल्यामुळे जवळपास ४३३ कुटुंबे बाधित झाली असून अद्यापी सदर कुटुंबे पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाधित कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३), (४) व (५) आय.आय.टी. पवईच्या जमिनीवरील मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या पुनर्वसन धोरणानुसार पायाभूत सर्वेक्षणात आढळून आलेल्या बांधकामधारकांना पुनर्वसनासाठी पात्र समजण्यात आले आहे.

सदर ठिकाणी मूळत: २००९-१० मध्ये अशासकीय संस्थेमार्फत सर्वेक्षण केले असता सर्व बांधकामधारकांपैकी सर्वेक्षणास सहकार्य केलेल्या केवळ १२७ बांधकामधारकांचे सर्वेक्षण झाले. त्यानंतर उर्वरीत बांधकामधारकांचे शासकीय यंत्रणेद्वारे २०१३ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात बांधकामधारकांची संख्या ४३३ आढळून आली. यासंबंधी झालेल्या निर्णयानुसार सदर सर्वेक्षणात नमूद तपशीलाची प्रत्यक्ष जागेवर आय.आय.टी. प्रशासन आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिका-यांद्वारे तपासणी करुन जागेवर बांधकाम आणि त्यामध्ये सर्वेक्षणात नमूद व्यक्तींचे वास्तव्य याच्या तपासणीच्या आधारे पुनर्वसन करण्याचे निश्चित करण्यात आले असून त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

बोदवड (जि.जळगांव) नगरपंचायतीकरीता महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(५१) * १२४०७२ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी नवनिर्मित बोदवड (जि.जळगांव) नगरपंचायतीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ मार्च, २०१८ व २८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव (नविवि) यांना निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याची पाणी पुरवठा योजना अपुरी पडत असल्यामुळे बोदवड नगरपंचायतीला हतनूर धरणातुन पाणीपुरवठा करणे शक्य असल्यामुळे सदरची योजना राबविण्यासाठी किती निधी देण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) • बोदवड नगरपंचायतीमार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यासाठी योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी प्रकल्प सल्लागाराची (पीएमसी) ची नेमणूक बोदवड नगरपंचायतीमार्फत करण्यात आलेली आहे.

• सदर प्रकल्प आराखडा तयार करण्याचे काम नगरपंचायत स्तरावर प्रगतीपथावर आहे.

• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार सदर प्रकल्प प्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेऊन नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत प्रस्ताव शासनास सादर करणे अपेक्षित आहे.

• प्रस्ताव प्राप्त होताच प्रकल्पास मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

मौजे थोरांदळे (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील जमिनीच्या वादातून दोन गटात झालेला वाद

(५२) * १२०४१४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे थोरांदळे (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील जमिनीच्या वादावरुन दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास दोन गटांमध्ये हाणामारी होऊन ६ जण गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत हाणामारीची फिर्याद गंभीर जखमी झालेल्या कुटुंबियांनी तसेच गावातील ग्रामस्थांनी मंचर पोलीस स्टेशनला दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास करुनसुध्दा कोणतीच कारवाई संबंधित दोषींवर मंचर पोलीसांनी केली नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मौजे थोरांदळे (ता.आंबेगांव, जि.पुणे) येथील जमिनीच्या वादावरुन दिनांक २९ मार्च २०१८ रोजी दोन गटांमध्ये हाणामारी होऊन एकूण ११ जण गंभीर जखमी झाले आहेत.
(२) स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक ३१.३.२०१८ रोजी निवेदन दिले आहे.
(३) सदर प्रकरणी दोन्ही गटातील लोकांनी परस्परांविरोधात दिलेल्या फिर्यादीवरून खालीलप्रमाणे २ गुन्हे मंचर पोलीस ठाणे येथे दाखल केली आहेत.

१. गु.र.नं. ११९/२०१८ भादंवि कलम ३२६, ३२५, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८, १४९, ५०६, ५०४, मुं. पो.का. ३७(१)(३), १३५ भारतीय अधिनियम कायदा कलम ४, २५ प्रमाणे एकूण १२ आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदर गुन्ह्यातील ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

२. गु.र.नं. १२०/२०१८ भादंवि कलम ४५२, ३०७, ३२६, ३२५, ३२४, १४३, १४७, १४८, १४९, ४२७, म.पो.का. कलम ३७(१) (३), १३५ अन्वये एकूण १३ आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.

उक्त दोन्ही गुन्हे तपासावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एचएससी व्होकेशनलच्या विविध अभ्यासक्रमांचे आयटीआय व व्हीटीआय या सारख्या अभ्यासक्रमांत रुपांतर करण्यात येत असल्याबाबत

(५३) * ११६५९१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर

शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एचएससी व्होकेशनलच्या विविध अभ्यासक्रमांचे आयटीआय व व्हीटीआय या सारख्या अभ्यासक्रमांत रुपांतर करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ११ वी पासुन सुरु होणारे किमान कौशल्यधारित अभ्यासक्रम हा बारावीशी समकक्ष असून (एमसीव्हीसी) येत्या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्यात येणार असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात येऊ

नये अशा आशयाच्या सूचना कौशल्य विकास विभागाकडून कनिष्ठ महाविद्यालयांना माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वास्तविक या व्होकेशनलचे विविध अभ्यासक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगार, स्वंयरोजगार मिळविण्यासाठी उपयुक्त असूनही कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाचे अधिकाधिक पर्याय उपलब्ध करुन देण्याऐवजी अभ्यासक्रम बंद करुन प्रत्यक्षात विभागाकडूनच पर्याय कमी करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात सदरहू अभ्यासक्रमाची ५३ कनिष्ठ महाविद्यालये असून दरवर्षी साधारणत: ५० ते ६० हजार विद्यार्थी तांत्रिक शिक्षण घेत असुन कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमात ७ हजार ५०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गुंतले असून, अभ्यासक्रम बंद झाल्यास बेकार होणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तसेच सदरहू अभ्यासक्रम बंद पडल्याने बेरोजगारी वाढणार असल्याने शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे व तद्नुसार शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

उच्च माध्यमिक व्यवसाय (एचएससी व्होकेशनल) अभ्यासकम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र (NCVT) मिळत नाहीत. त्यामुळे उच्च माध्यमिक व्यवसाय (एचएससी व्होकेशनल) अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक बरोबर राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र (NCVT) देता यावे या दृष्टिकोनातून सदर अभ्यासक्रमाचे उन्नतीकरण करुन त्यांचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) किंवा व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTI) मध्ये रुपांतरण करणेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासकीय ५३ कनिष्ठ महाविद्यालय (एमसीव्हीसी) बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नसल्यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांवर बेकार होण्याची वेळ येणार नसल्याने याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्रीवर्धन (जि.रायगड) नगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातंर्गत जमा होणा-या कच-यापासून खतनिर्मिती करण्याबाबत

(५४) * १२४५९३ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन नगरपालिकेतील (जि.रायगड) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातंर्गत जमा होणा-या कच-यापासून खतनिर्मिती करण्यासाठी सद्‌गुरु बहुउद्देशीय संस्थेला सुमारे रुपये ६४ लाख ८० हजारांचा ठेका मंजूर करण्यात आला असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पातून खतनिर्मिती केलेली नसतांनाही ठेकेदारांनी सद्‌गुरु बहुउद्देशीय संस्थेला रुपये १३ लाखांचे देयके अदा केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अन्यथा जनआंदोलन करण्याचा इशारा श्रीवर्धन नगरपालिकेचे विरोधी पक्षनेते यांनी जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनाद्‌वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) श्रीवर्धन नगरपरिषदेने बंद असलेला खतनिर्मिती प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करणे, चालविणे व इतर अनुषंगिक कामे करणे

यासाठी रु. ७०.८० लक्ष इतक्या रक्कमेस सद्गुरु बहुद्देशिय संस्था, सोलापूर यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये कंत्राट दिले आहे, हे खरे आहे.

(२) • प्रकल्पाची आवश्यक दुरुस्ती करणे व प्रकल्प वापरण्यायोग्य करणे यासाठी रु.६.०० लक्ष.

• घंटागाड्यांद्वारे घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, त्याची खतनिर्मिती प्रकल्पापर्यंत वाहतुक करणे, कचऱ्याचे विलगीकरण करणे, कचऱ्यावर कल्चर फवारणी करणे इत्यादी कामांसाठी रु.१२.६० लक्ष.

• अशी एकूण रु.१८.६० लक्ष इतकी रक्कम सदर संस्थेस नगरपरिषदेमार्फत अदा करण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

• सद्यस्थितीत खतनिर्मिती प्रकल्पावर प्रत्यक्षात ७२ टन इतकी खताची निर्मिती करण्यात आली आहे, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, रायगड यांना प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

• प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांनी मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद यांच्याकडून अहवाल मागविला आहे.

(४) तथापि, प्रस्तुत प्रकरणी वस्तुस्थितीदर्शक अहवाल तत्काळ सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील अवैध बांधकामे निष्कासित करण्याबाबत

(५५) * ११९६२८ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील स.नं. २७८ पैकी १८००.०० चौ.मी. क्षेत्रावर नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग पुणे शाखा, पुणे कार्यालयाने पत्र क्र. ४०१३, दिनांक २३/०६/२०११ अन्वये जागेच्या पूर्व हद्दीवरील अंतर्गत मार्गाचे रस्ता पड हद्दीपासून २२.५० मी. अंतरावर वाहनतळ + ३ व भागश: ४ था मजला इमारतीस परवानगीची शिफारस केली असून या

शिफारस केलेल्या इमारतीत २६ सदनिका प्रस्तावित केलेल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेची पाहणी प्र.सहायक संचालक, नगर रचना पुणे शाखा, पुणे केली असता उक्त जागेवर इमारतीचे दोन विंग असून या इमारतींच्या तळमजल्यावर चार सदनिका व त्यावरील चार मजल्यावर प्रत्येकी ८ सदनिका अशाप्रकारे दोन्ही इमारतीत एकूण ६८ सदनिकांचे नियमबाह्य बांधकाम करुन त्याचा वापर सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अवैध बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग पुणे शाखा, पुणे यांनी दिनांक ८ जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, जुन्नर-आंबेगाव उपविभाग मंचर, जि.पुणे यांना कळवूनही याबाबत अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी पत्राद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध बांधकाम करणाऱ्या विकासकावर गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याबाबत तसेच अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) होय.

(३), (४), (५) व (६) सहायक संचालक, नगर रचना, पुणे यांनी दि. ८ जून, २०१७ रोजीच्या पत्रान्वये इमारतीचे जागेवरील बांधकाम मंजूरीची शिफारस केलेल्या बांधकामापेक्षा पूर्णपणे वेगळे असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे तरतूदीनुसार कार्यवाही करण्यास कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव,

उपविभाग मंचर यांनी तक्रारदार श्री. दिलीप बाजीराव घोरपडे व इतर व विकसक श्री.शरद गंगाधर फापाळे व इतर यांना सुनावणी देऊन त्यांना त्यांचे म्हणणे मांडणेची संधी दिलेली आहे.

विकासक श्री.शरद गंगाधर फापाळे व त्यांच्या पत्नी सौ. अनिता शरद फापाळे यांचे विरूध्द नारायणगाव पोलीस स्टेशन येथे दि. १०.०१.२०१७ रोजी तक्रारदार श्री.दिलीप बाजीराव घोरपडे यांनी फिर्याद नोंदविलेली आहे. सदरबाबतचा दावा हा ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट वर्ग १ (फौजदारी खटला) जुन्नर यांचे न्यायालयात R.C.C.HO १२२/१७ या नंबरने दाखल असून बाब न्यायप्रविष्ट आहे.

वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेने नियमबाह्यरित्या केलेली करवाढ

(५६) * १२४८५६ श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेने यावर्षी ५० टक्के ते २०० टक्के इतक्या प्रचंड प्रमाणात करवाढ केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करधान नियमावलीतील तरतूदींचे पालन न करता तसेच महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांचे अभिप्राय वा सूचना-हरकती न मागविता मालमत्तेच्या रेटेबल व्हॅल्युनुसार कराचा दर निश्चित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत तेथील नागरिकांनी संबंधित महानगरपालिका आयुक्त, मा.महापौर वसई-विरार महानगरपालिका, प्रधान सचिव (२) नगरविकास मंत्रालय यांना तक्रार-निवेदने देऊन सदरची नियमबाह्य करवाढ रद्द करावी अशी मागणी तक्रार निवेदनाद्वारे केल्याचे दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) * ४ नगरपालिका व ५३ महसूली गावाचा अंर्तभाव करून वसई- विरार महानगरपालिकेची स्थापना दिनांक ३ जुलै, २००९ रोजी झाली.

* उपरोक्त महानगरपालिकेमध्ये समावेश झालेल्या ग्रामपंचायत व नगरपालिका यांची कर प्रणाली व कराचे दर वेगवेगळे होते.

* या दरामध्ये समानीकरण करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ च्या कलम १२९-अ अन्वये कर आकारणी करणे आवश्यक आहे.

* त्यानुसार कर आकारणी करण्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक २०.०२.२०१७ च्या ठरावान्वये मान्यता दिली आहे.

* महानगरपालिका हद्दीत अंर्तभूत झालेल्या महसुली भागातील दर इतर भागांतील कर दरांशी समान करण्यासाठी वसई-विरार महानगरपालिकेने सन २०१७-१८ पासुन दरवर्षी २० टक्के या प्रमाणे मालमत्ता करात वाढ केली आहे.

* सद्यस्थितीमध्ये महानगरपालिका स्तरावर कर प्रणालीमध्ये समानीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) या प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ च्या कलम १२९-अ अन्वये नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर बांधकाम कल्याण मंडळात होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत

(५७) * १२३३३० श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नियमांवलीचे उल्लंघन करून महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर बांधकाम कल्याण मंडळात दोन महिन्यात ७ टेंडर काढण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळाचे अध्यक्ष श्री.ओमप्रकाश यादव यांच्या अनुपस्थित प्रतिनियुक्तीवर असणारे मंडळाचे सी.ई.ओ श्री.एस. श्रीरंगम आणि आयुक्त श्री.नरेंद्र पोयम यांच्या स्वाक्षरीने बांधकाम कामगारांच्या खात्यात योजनांचा लाभ न देता ठेकेदारांचे हिताकरीता निविदा काढण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये प्रामुख्याने बांधकाम कामगारांना सुरक्षा साधन पुरविणे, अत्यावश्यक साहित्य पुरविणे, बांधकाम कामगारांचे सर्वेक्षण करणे, राज्यात ४० व मुंबईत १ अद्ययावत कामगार सुविधा केंद्र उभारणे, यासह राज्यातील कामगारांना मध्यान्ह भोजन पुरविण्यासाठी ३ निविदा काढण्यात येणे, आदी कामांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काढण्यात आलेल्या निविदांमध्ये अंदाजित रक्कम नमूद नसणे हे केंद्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन असून यामध्ये सुमारे रुपये १००० कोटींचा गैरव्यवहार होत असल्याचा आरोप लोकप्रतिनिधींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर निविदा रद्द करून बांधकाम कामगारांच्या खात्यावर निधी जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) दिनांक २८ नोव्हेंबर, २०१६ ते २० जून, २०१८ या कालावधीत ७ ई-निविदा काढण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही. मंडळाचे अध्यक्ष दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ पासून उपलब्ध होऊ न शकल्याने बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी मंडळाच्या बैठकीतील मंजूर ठरावानुसार ई-निविदा काढण्यात आल्या आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

१) सुरक्षा संच पुरविणे २) अत्यावश्यक संचपुरविणे ३) एकात्मिक संगणकीय प्रणाली राबविणे ४) कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे ५) मध्यान्ह भोजन योजना राबविणे (३ विभागाचे विभाग निहाय प्रत्येकी एक निविदा अशा ३ निविदा) अशा एकूण ७ निविदांचा समावेश आहे.

(४) ई-निविदा मध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शकीचे पालन झालेले असून वस्तु दर निविदा पध्दतीचा स्विकार केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरातील काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेत झालेला गैरव्यवहार

(५८) * १२५६९५ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरासाठी शुध्द व मुबलक पिण्याच्या पाण्यासाठी सन २०१४ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या काळम्मावाडी थेट पाईप लाईन योजनेचे काम ठेकेदाराची मुदत दिनांक ३१ मे, २०१८ रोजी संपुष्टात आली असताना देखील पूर्ण झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या योजनेसाठी कोल्हापूर शहरवासीयांनी सन १९९२ पासून सतत पाठपुरवठा तसेच विविध आंदोलने केली असतानासुध्दा सदर योजना ही कालावधीत पूर्ण झाली नसून सदरचे काम देखील निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेचे तयार केलेले अंदाजपत्रक हे संशयास्पद असून महत्वाच्या नस्ती देखील गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असून कोल्हापूरच्या जनतेमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त योजनेमध्ये दोषी असलेले सर्व संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजना ही मुळ व वाढीव मुदतीपर्यंत पूर्ण होऊ शकली नाही, हे खरे आहे.

(२) विविध विभागाच्या परवानग्या वेळेत प्राप्त न झाल्याने, पाईपलाईन मार्गामधील ग्रामपंचायत हद्दीतील अडचणी व विरोध तसेच विजचे खांब व डी.पी. शिफ्टींगच्या कामास झालेला विलंब यामुळे योजनेचे काम वाढीव मुदतीत पुर्ण होऊ शकले नाही.

• तसेच सदर योजनेंतर्गत झालेल्या कामाचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या त्रयस्त संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरिक्षण केले असून त्यांच्या अहवालानुसार निकृष्ट दर्जाच्या कामाची बाब निदर्शनास आली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या UIDSSMT या कार्यक्रमांतर्गत रु.४२५.४१ कोटी रक्कमेच्या या योजनेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांच्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त असून केंद्र शासनाच्या नागरी विकास मंत्रालयाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

• सदर योजनेसंबंधित कोणतीही नस्ती गहाळ झालेली नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) सदर योजनेतील ठिकपुर्ली येथील कॅनॉल क्रॉसिंगसाठी बांधण्यात आलेल्या एम.एस. पुलाची देयके निविदेनुसार ठोक स्वरुपात महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात आली होती.

• परंतु, सदर पुलाच्या करण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने बाबनिहाय दर घेऊन देयक तयार केले असता सदर रक्कम ही ठोक रक्कमेपेक्षा खुप कमी येत असल्याची बाब लक्षात येताच प्रत्यक्ष झालेल्या कामांनुसार सविस्तर मोजमापे घेऊन कंत्राटदारास अदा केलेली जादा रक्कम त्यांच्या पुढील चालू देयकातून वसुल करण्यात आली आहे.

• प्रस्तुत प्रकरणी जबाबदार असलेल्या महानगरपालिकेच्या जल अभियंत्यावर दोन वार्षीक वेतनवाढी रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे.

• तसेच सदर योजनेकरीता नेमलेले सल्लागार यांच्या चालू देयकातून जादा अदा झालेल्या रक्कमेवरील व्याजाची वजावटसुध्दा करण्यात येत आहे, असे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील बेस्ट उपक्रम सेवेमध्ये सुधारणा करण्याबाबत

(५९) * १२२७२१ श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रवाशांच्या सोयीसाठी चालविण्यात येणाऱ्या बेस्टच्या ४७०० बसेस चालत होत्या व सद्य:स्थितीत त्यांची संख्या ३३०० झाली आहे तसेच याआधी बेस्टला दररोज रुपये ३ कोटी १० लाख एवढा महसूल मिळत होता आता त्यात घट होऊन रुपये २ कोटी ९५ लाख एवढा महसूल मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टमधून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागी नवीन भरती केली जात नाही व त्यामुळे कर्मचाऱ्यांची संख्याही कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्ट कर्मचाऱ्यांचे भत्ते, निवृत्ती वेतन, फंड अश्या वेगवेगळ्या स्वरूपातील देणी सुमारे रुपये ५०० कोटी असून शासनाची देणीसुद्धा रुपये ५०० कोटी रुपये आहेत तसेच बेस्टवर रुपये २००० कोटींचे कर्ज सुद्धा आहे तसेच बेस्ट बसच्या तिकीट वितरणाची ट्रायमॅक्स कंपनीची यंत्रे नादुरुस्त झाली असल्याचेही दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेस्ट उपक्रम सेवा ही मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली सेवा असल्यामुळे बेस्टमध्ये सुधारणा करण्याबाबतचे शासनाचे धोरण काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) प्रवासी प्रतिसादाचा आढावा घेऊन, बेस्ट उपक्रमाचा बसताफा ३३३७ इतका निश्चित करण्यात आला आहे. बेस्टच्या महसूलात घट झाली असून सद्य:स्थितीत प्रतिदिन सरासरी उत्पन्न रु. २ कोटी ९० लाख इतके आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) बसगाड्यांची संख्या कमी झाल्यामुळे निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागी नवीन भरती करण्याची आवश्यकता नसल्याचे बेस्ट प्रशासनाने कळविले आहे.

(३) बेस्ट उपक्रमाची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्यामुळे निवृत्त बेस्ट कर्मचाऱ्यांचे रु. २९५.७० कोटी, प्रवासी कर व पोषण अधिभारापोटी शासनाला रु. ५०० कोटीचे देणे थकीत आहे. तसेच बेस्ट उपक्रमावर रु. १८९० कोटी इतके कर्ज आहे ही वस्तुस्थिती आहे.

तिकिट वितरणाकरिता वापरण्यात येणाऱ्या ETIM यंत्रांमध्ये काही प्रमाणात बिघाड झाले असून, सदर यंत्रे दुरुस्त करण्याकरिता तसेच नवीन प्रणाली विकसित करण्याकरिता बेस्ट प्रशासनामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) बेस्ट उपक्रमामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

• वाहतूकीच्या साधानांमध्ये होणारे बदल विचारात घेऊन बेस्ट प्रवर्तनामध्ये लवचिकता आणण्याचे बेस्ट प्रशासनाचे धोरण आहे.

• मुंबईतील पर्यायी वाहतुकीच्या साधनांची स्थिती व प्रवाशांच्या बदलत्या आवडी, प्राधान्यक्रम विचारात घेऊन भविष्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने मिनी आणि मिडी तसेच वातानुकूलित बसगाड्यांचा समावेश उपक्रमाच्या बसताफ्यात भाडे तत्वावर करण्याचे नियोजित आहे.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रवाशांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता बेस्ट प्रशासन प्रयत्नशील आहे.

नायर रुग्णालयातील (मुंबई) समस्यांबाबत

(६०) * ११८१२५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड),

श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील डॉ.बी.वाय.एल. नायर रुग्णालयात सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेल्या आरोग्याच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्याचे तसेच रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात उपचारावरील खर्चात १० टक्क्यांनी वाढ करण्यात आल्याने रुग्णांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी नायर रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभागात वर्षाला हजारहून अधिक शस्त्रक्रिया केल्या जात होत्या परंतू सद्यस्थितीत या विभागातील शस्त्रक्रियांकरिता जुने, नादुरुस्त ऑपरेशन टेबल, अपुरे इनफ्युजन पंप असून ऑपरेशन थिएटरमधील दिवे, हेडलाईट, मॉनिटर्स इ.अत्याधुनिक यंत्रणा नसल्याने या विभागात काम करणारे डॉक्टर त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, रुग्णालयात व्हेंटिलेटर पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे आपात्कालीन स्थितीत रुग्णांना परत जावे लागत असून गरीब व गरजू रुग्णांना, वृध्द नागरिक, टीबी तसेच एचआयव्ही बाधित रुग्णांवर मोफत उपचारही बंद करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रुग्णालयातील वैद्यकीय उपकरणांची वेळेवर देखभाल होत नाही, तंत्रज्ञ, वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल कर्मचारी, सफाई कामगार पुरेशा प्रमाणात नेमणूक करण्यात आले नसल्याने गरीब व गरजू रुग्णांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे रुग्णांचे होणारे हाल तसेच उपचार खर्चात करण्यात आलेली वाढ थांबविण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अशा आशयाची बातमी दिनांक १४.०४.२०१८ रोजीच्या मुंबई मिरर या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

तथापि, नायर रुग्णालयात सन २०१७ मध्ये ३६० ओपनहार्ट व १०० इतर ह्दयरोग शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, दिनांक जानेवारी २०१८ ते जून २०१८ या कालावधीत १७९ ओपनहार्ट व ६० इतर ह्दयरोग शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

त्यामुळे नायर रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग बंद होण्याच्या मार्गावर आहे हे खरे नाही.
(२) नायर रुग्णालयातील रुग्णांना आवश्यक असलेले उपचार व सुविधा तसेच शस्त्रक्रियेसाठी आवश्यक चाचण्या याकरीता महानगरपालिकेच्या धोरणानुसार अनुज्ञेय असलेल्या शुल्कानुसार आकारण्यात येतात. त्यामध्ये वाढ करण्यात आली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) नायर रुग्णालयातील ह्दयरोग शस्त्रक्रिया विभागात ३ ऑपरेशन टेबल, २ ऑपरेशन लाईट्स, १ हेडलाईट, ३ हार्टलंग मशीन्स, १२ इनफ्युजन पंप व ६ मॉनिटर्स इत्यादी सर्व आवश्यक उपकरणे सुस्थितीत असून त्यांचा वापर नियमितपणे केला जात असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) नायर रुग्णालयात एकूण ६२ व्हेंटीलेटर्स उपलब्ध आहेत. या तुलनेत रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे, रुग्णांना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात येते व व्हेंटीलेटरच्या उपलब्धतेप्रमाणे रुग्णास कळविण्यात येते.

नायर रुग्णालयातील एच.आय.व्ही, बाधित रुग्णांना देण्यात येणारी एआरटी (Anti Retro Viral Therapy) उपचाराची औषधे नॅको संस्थेमार्फत मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण समिती (एमडीएसीएस) मार्फत मोफत दिली जातात.

क्षयरोगावरील अँटी कॉक्स् थेरपी (AKT) उपचाराची औषधे सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (RNTCP) च्या अंतर्गत नायर रुग्णालयात मोफत उपलब्ध आहेत.

(५), (६) व (७) • नायर रुग्णालयातील वैद्यकीय उपकरणांची नियमितपणे देखभाल दुरुस्ती करण्यात येते.

• सर्व यंत्रसामुग्री खरेदी करताना २ ते ३ वर्षांच्या हमीसह खरेदी केली जाते व हमीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढे नियमित स्वरुपात वार्षिक परिरक्षण करार करण्यात येतो.

• तंत्रज्ञ, वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल कर्मचारी व सफाई कामगार यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

वांद्रे-कुर्ला संकुलातील (मुंबई) रिलाएन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला भाडेतत्वावर दिलेल्या जी-ब्लॉकमधील भूखंडाबाबत

(६१) * ११६७७७ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला संकुलातील (मुंबई) जी-ब्लॉकमधील भूखंड रिलाएन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला भाडेतत्वावर दिला असतांनाच संबंधिताने भाडेपट्टा करार आणि अधिमूल्य शर्तीचे उल्लंघन करीत बांधकामास विलंब केल्यामुळे एमएमआरडीएने रिलाएन्सकडून विलंबाप्रकरणी रुपये ४२८ कोटींचे अतिरिक्त अधिमूल्य आणि त्यावरील व्याज वसूल करणे अपेक्षित असतानाही वसूल न केल्याने खाजगी विकासकाला फायदा होवून एमएमआरडीएचा महसुल बुडाला असल्याचे ताशेरे कॅगच्या अहवालात ओढले असल्याची बाब दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडेपट्टा करार आणि अधिमूल्य शर्तीचे उल्लंघन करणा-या रिलाएन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीवर आणि सदर कंपनीस पाठीशी घालून महसुल वसुलीबाबत दुर्लक्ष करणा-या संबधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जी-ब्लॉकमधील सी-६६ या वाटप केलेल्या भूखंडावरील इमारती अनुज्ञेय ४ वर्षाच्या कालावधीत पूर्ण न केल्यामूळे मेसर्स रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड यांचेकडून दि.३०/११/२०१७ पर्यंत रु.४४१.०८ कोटींची थकबाकी बाकी आहे.

सदर अधिमूल्याचा भरणा मेसर्स रिलायन्स कंपनीने न केल्यामुळे मुंबई महानगर प्रदश विकास प्राधिकरणाने दिनांक १२/०९/२०१७ रोजी त्यांना भूखंड परत घेण्याची (रिझंप्शनची) नोटीस दिली. सदर नोटीस विरोधात मेसर्स रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांनी मा. उच्च न्यायालयात दावा क्र. WP (L) २६५४/२०१७ दाखल केला आहे. सदर दाव्यामधील मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १२.१२.२०१७ व दिनांक १७.०१.२०१८ रोजीच्या अंतरीम आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या कंपनीच्या उर्वरीत परवानग्यांबाबत (जसे की बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व इमारतीतील प्रिमायसेस असाईन्मेटन्ट करीता ना हरकत दाखले) उर्वरीत थकबाकी अधिमुल्य वसूलीचा आग्रह न धरता कार्यवाही करावी, असे आदेश दिले. सबब, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने मा. न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

मुंबईत घरे बांधण्याच्या नावाखाली ३ हजार ६५० हेक्टर भूखंड विकासकांना खुला करण्यात येणार असल्याबाबत

(६२) * १२२३८५ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मोकळ्या खाजणाच्या तीनशे हेक्टर जमिनीसह साडेतीन हजार हेक्टर ना-विकास क्षेत्राखालील भूखंड १० लाख परवडणाऱ्या घरांकरिता विकासकासाठी खुला करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या विकासकांनी मुंबईत बांधलेली दिड लाख घरे रिकामी असून याशिवाय मा.पंतप्रधान यांच्या घोषणेनुसार राज्यात २०२२ पर्यंत सर्वांना घरे या संकल्पनेत २२ लाख घरे बांधण्यात येणार असून, यातील सुमारे ९ लाख घरे मुंबईत बांधली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईच्या बहूचर्चीत विकास आराखड्यात परवडणारी १० लाख घरे बांधण्याच्या नावाखाली सुमारे ३६५० हेक्टर ना-विकास क्षेत्राखालील भूखंड विकासकांसाठी खुला करण्याच्या निर्णयातून विकासकास आर्थिक लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पंतप्रधान आवास योजनेत राज्यात २२ लाख व मुंबई प्रादेशिक विभागात १९ लाख घरे बांधण्याचा संकल्प चार वर्षापूर्वी करण्यात आला, त्यापैकी फक्त १६ हजार घरांचे बांधकाम सुरु असून नव्याने खुल्या झालेल्या भूखंडावर १० लाख घरांसाठी विलंब होणार असल्याची भिती अर्बन डिझाईन रिसर्च इंस्टिस्ट्यूटने व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच परवडणाऱ्या घरांची किंमत किती असणार आहे व ती किती कालावधीत सदर कामे पूर्ण होणार आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अशी बाब नाही.

बृहन्मुंबई विकास आराखडा २०३४ वरील अहवालानुसार वने, खारफूटी, जंगले, जलाशय तसेच किनारपट्टी (सीआरझेड-१) मधील सर्व क्षेत्रे यासारख्या पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील जमिनी नैसर्गिक क्षेत्र म्हणून रेखांकित केल्या आहेत. जेथे कोणत्याही प्रकारच्या बांधकामाची परवानगी नाही. विकास आराखडा २०३४ वरील अहवालानुसार ना-विकास क्षेत्रामधील एकूण ३३५५ हेक्टर जमिनीपैकी २१०० हेक्टर जमिन ही परवडणाऱ्या घरांसाठी गृहीत धरली

आहे. सदर ना-विकास क्षेत्रांचे रुपांतर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ नुसार विशेष विकास क्षेत्रामध्ये केले आहे. सदर जमिनीचा विकास हा उक्त नियमावलीतील विनियम ३३(८) नुसार करता येऊ शकेल. त्यानुसार विशेष विकास क्षेत्रामधील किमान २ हेक्टर वा त्यापेक्षा अधिक जमिन विकसित केल्यास ३०% क्षेत्र परवडणाऱ्या घरांकरिता उपलब्ध होऊ शकेल.

(२) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत २०२२ पर्यंत राज्यामध्ये १९.४० लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये ४,७६,२८१ घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट आहे.

(३) प्रश्न क्र. १ चे उत्तर पाहता अशी बाब नाही.

(४) व (५) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत २०२२ पर्यंत राज्यामध्ये १९.४० लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये ४,७६,२८१ घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत जून २०१८ पर्यंत राज्यातील १९३ प्रकल्पातील ४,५१,९८९ EWS (आर्थिकदृष्टया दुर्बल घटक) घरकुलांचा समावेश असलेल्या प्रकल्पांना केंद्रिय मान्यता व संनियंत्रण समितीने मंजूरी दिली आहे. यामध्ये केंद्राच्या ३५ व्या बैठकित तत्वत: मंजूरी प्राप्त झालेल्या, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई च्या प्रकल्पातील २००३१० घरकुलांचा समावेश आहे. मंजूर १९ प्रकल्पातील २९,५८९ EWS (एकूण ४४,४३१ घरकुले) घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

पोलीसात तक्रारी नोंदविण्यास गेलेल्या व्यक्तीला पोलीसांनी केलेल्या मारहाणीचे दृष्य पाहून गोखलेनगर (पुणे) येथील तक्रारदाराच्या वडीलाचा झालेला मृत्यु

(६३) * १२४७०५ श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील श्री.मोरेश्वर काळूराम मेंगडे, रा.गोखलेनगर या वयोवृध्द गृहस्थाचा मृत्यु झाल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मृत व्यक्तीचा मुलगा कुटूंबियासमवेत गावी जात असतांना युवकाने त्यांच्या अंगावर मोटार घालण्याचा प्रयत्न केला त्यातून झालेल्या वादाची तक्रार नोंदविण्याकरिता कु.अमोल पोलीस स्थानकात गेला असता पोलीस उपनिरीक्षक यांनी चौकशीला बोलावुन कु.अमोलला पट्ट्याने मारहाण करण्यास सुरुवात केली हे दृश्य पाहून श्री.मोरेश्वर मेंगडे यांचा मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

श्री. मेंगडे यांचा दिनांक ६.५.२०१८ रोजी मृत्यू झाला आहे.

(२) व (३) अमोल मेंगडे याचेविरूद्ध फिर्यादीने मारहाणीची केलेल्या तक्रारीस अनुसरून चौकशीसाठी दिनांक ६.५.२०१८ रोजी चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे बोलावले असताना आणि त्याची चौकशी चालू असताना अमोल मेंगडे याचे वडील श्री. मोरेश्वर मेंगडे तेथे आले तथापि कु.अमोल मेंगडे याची चौकशी चालू असल्यामुळे त्यांना तेथून बाहेर जाण्यास सांगितले. श्री. मोरेश्वर मेंगडे पोलीस स्टेशनमधून बाहेर गेले असताना ते चक्कर येऊन खाली पडले नंतर त्यांना उपचारासाठी रूग्णालयात नेले आणि त्यांचावर उपचार चालू असताना त्यांचा मृत्यू झाला सदर मृत्यू वैद्यकीय अधिकारी यांचे अंतीम अहवालानुसार हृदयविकारामुळे झाल्याचे नमुद केले आहे.सदर प्रकरणी चतुश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे येथे अकस्मात मयत रजिस्टर नं. ९९/२०१८ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे अकस्मात मयत दाखल करण्यात आले.

सदर प्रकरणी सहायक पोलीस आयुक्त, चतुश्रृंगी विभाग, पुणे शहर यांचेकडून चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीमध्ये अमोल मेंगडे यास पोलीस उपनिरीक्षकाने कोणतीही मारहाण केली नसल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौंड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील खाडीत मोठ्या प्रमाणावर साचलेला गाळ काढण्याबाबत

(६४) * १२२११३ श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौंड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील खाडीत मोठ्या प्रमाणावर साचलेल्या गाळामुळे ओहोटीच्या वेळी एकमेव होडी (तर) सेवेतून प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना अनेक वर्षापासून अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे सदरहू खाडीतील गाळ काढण्यासाठी तेथील ग्रामस्थांनी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजीपासून अद्यापपर्यंत सातत्याने मा.बंदरे मंत्री, पालक मंत्री सिंधुदुर्ग जिल्हा, पतन अभियंता, सिंधुदुर्ग पतन विभाग, पतन उपभियांता, पतन उपविभाग देवगड आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौंड खाडीतील गाळ काढण्याबाबत दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास ग्रामसभेत ठराव मंजूर करून सर्व संबंधित अधिका-यांना तसेच बंदर मंत्री, पालक मंत्री सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठरावाच्या अनुषांगाने शासनाने मौंड खाडीतील गाळ काढण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) मोंड ता. देवगड, (जि. सिंधुदुर्ग) येथील पावसाळी हंगामानंतर खाडीत साचलेल्या गाळ काढण्याकरीता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत जलसर्व्हेक्षण करुन गाळाचे प्रमाण निश्चित करुन अंदाजपत्रक तयार करावे आणि निधीच्या उपलब्धतेनुसार गाळ काढण्याची कार्यवाही करावी असे निर्देश शासनाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा असल्याबाबत

(६५) * ११६७९८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम, नायर व सायन या महानगरपालिकेच्या तीन मोठ्या रुग्णालयात गत काही दिवसांपासून रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्तपेढ्यांमध्ये दिवसाला २५० ते ३०० बाटल्यांची गरज असतानाही सध्या फक्त २५ ते ४० बाटल्या रक्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रक्त तुटवड्यामुळे रुग्णालयांकडून काही महत्वाच्या शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चोकशीनुसार गरीब व गरजू रुग्ण उपचार घेत असलेल्या महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये रक्ताचा पुरवठा वाढविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम., नायर व सायन या तीन रुग्णालयांमध्ये प्रतिदिन सरासरी १७० ते २०० रक्त पिशव्यांची आवश्यकता असते.

तथापि, माहे एप्रिल, २०१८ मध्ये प्रतिदिन सरासरी १८० ते १९० रक्त पिशव्या उपलब्ध होत्या. त्यामुळे रक्ताचा तुटवडा निर्माण झाला ही बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) रक्त तुटवड्यामुळे महत्वाच्या शस्त्रक्रिया रुग्णालयाकडून पुढे ढकलण्यात आली असल्याची बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) रुग्णांना रक्त पुरवठा करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत खालील उपाययोजना करण्यात येतात :-

• दरमहा सुमारे १० ते १५ रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

• रक्ताची कमतरता भासल्यास राज्य रक्त संक्रमण परिषद व शासकीय धोरणानुसार, शासकीय व निमशासकीय रक्तपेढ्यांमध्ये योग्य तो सुसंवाद साधुन अतिरिक्त/अपुरा/दुर्मिळ रक्ताची विनामुल्य देवाणघेवाण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील टँकरमाफियांकडून महानगरपालिकेच्या जलकेंद्रातून व साठवणूक टाक्यांमधून पाण्याची चोरी होत असल्याबाबत

(६६) * ११६६४५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील टँकरमाफियांकडून महानगरपालिकेच्या जलकेंद्रातून तसेच साठवणूक टाक्यांमधूनही दररोज लाखो लिटर पाण्याची चोरी होत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडगांव शेरी येथील साठवणूक टाकीची मुख्य जलवाहिनी फोडून टँकरमाफियांकडून पाणी चोरी करण्यात येत असल्याची गंभीर बाब उघडकीस आली असून जलकेंद्रापुरती मर्यादित असलेली पाणी चोरी आता टाक्यांतूनही होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वडगांवशेरी परिसरात महानगरपालिकेच्या सुमारे १ लाख २५ हजार लीटर क्षमता असलेल्या या साठवणूक टाकीची जलवाहिनीच

टँकरमाफियाकंडून फोडण्यात आली असून त्याद्वारे टँकर भरले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) • पुणे महानगरपालिकेच्या साठवणूक टाक्यांच्या दाबनलिका फोडून पाणी चोरी होत असल्याबाबत मे २०१८ मध्ये दै.हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात बातमी आलेली होती हे खरे आहे.

• तथापि, सदर वृत्तपत्रात छापून आलेल्या छायाचित्रामध्ये वडगांवशेरी येथील पाण्याच्या टाक्या व लगतच्या खाजगी मिळकतीवरील टँकर पाईंटवर पाण्याचे टँकर एकत्रित दिसत असल्यामुळे सदर टँकर हे पुणे महानगरपालिकेच्या टाक्या असलेल्या मिळकतीत उभे आहेत असा भास निर्माण होते, परंतू अशी वस्तुस्थिती नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) • हे खरे नाही. वडगांवशेरी येथील चंदननगरच्या तीन टाक्यांमधून त्या विभागात पाणी पुरवठा करण्यात येतो.

• सदर टाक्यांना पुणे महानगरपालिकेच्या लष्कर जलकेंद्रातून आलेल्या मुख्य दाब नलिकेव्दारे पाणी पुरविले जाते.

• हे जलकुंभ ज्या मिळकतीवर आहेत, ती मिळकत पुणे महानगरपालिकेची असून सदर जलकुंभावर कोणत्याही प्रकारचे टँकर भरणा केंद्र नाही.

• तसेच वडगांवशेरी येथील चंदननगर तीन टाकी परिसरात लष्कर जलकेंद्रातून पाणीपुरवठा करणारी दाब नलिका ३०० मि.मी. व्यासाची (कास्ट आयर्न) व १००० मी.मी. व्यासाची (पोलादी) लाईन असून सदर दाब नलिकेस सुमारे २२ तास पाणी येत असल्याने सदर लाईन तोडणे बाबतचा प्रश्न उद्भवत नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• पुणे महानगरपालिकेने तपासणीत वृत्तपत्रातील बातमीत उल्लेखीत मिळकत ही खाजगी मिळकत असून तेथील टँकर पॉईंटजवळ पाण्याचे टँकर भरले जातात व सदर खाजगी टँकर पाईंटवर पुणे महानगरपालिकेचे नियंत्रण नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तसेच सदर खाजगी टँकर पाईंटजवळ महानगरपालिकेची कोणतीही जलवाहिनी नसून सदर मिळकतीस पाणी पुरवठा विभागामार्फत कोणतेही पाण्याचे कनेक्शन दिलेले नाही.

• तसेच या ठिकाणी भरले जाणारे पाणी पुणे महानगरपालिकेचे नाही हे पुणे महानगरपालिकेच्या जलकेंद्रातील प्रयोगशाळेमध्ये केलेल्या चाचणी अहवालातही निदर्शनास आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्यातील ९५ गावातील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत

(६७) * १२०२३१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको प्राधिकरणाने विविध विकासकामांच्या नावाखाली पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्यातील ९५ गावातील जमिनी संपादित करून जवळपास ४० वर्षे होऊनसुध्दा प्रकल्पग्रस्त शेतक-यांना पुनर्वसनाबाबत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता अद्यापपर्यंत न केल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसनाचा एक भाग म्हणून प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणारे साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप वेळेत न केल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याचे धोरणही शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने समुह विकास योजनेची (क्लस्टर योजना) अधिसूचना अद्यापही न काढल्यामुळे मुळ गावठाणाचा सर्वे होत नसल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांचा प्रश्न अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी दि. ३१/१२/२०१२ पूर्वी गावठाणालगत गरजेपोटी केलेल्या बांधकामाचे समुह विकास योजनेंतर्गत नियमितीकरण व पुनर्विकासाबाबत नवी मुंबईमधील सिडको नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नविन विनियम ३५ अंतर्भूत करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये फेरबदलाची सूचना शासनाने दि. ४/०३/२०१४ रोजी निर्गमित केली. त्यावर हरकती/ सूचना मागवून वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका विचारात घेता आघात मुल्यांकन अहवाल घेण्यात आला असून मा.उच्च न्यायालयाने आता सदर जनहित याचिका निकाली काढली आहे. त्यानुसार फेरबदलावर अंतिम निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(२) व (३) १२.५ टक्के योजने अंतर्गत भूधारकांना एकूण वाटप करावयाचे एकूण क्षेत्र ८७८.२० हे. आर. एवढे आहे. त्यापैकी आजपर्यंत ७३१.३२ हे. आर. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. ७६.११ हे. आर. क्षेत्राचे भूखंड इरादित असून भूखंड वाटपाची कार्यवाही सुरु आहे. सद्य:स्थितीत भूखंड वाटपासाठी ७०.७७ हे. आर. क्षेत्र शिल्लक असून भूधारकांनी आवश्यक दस्तावेज सादर केले नंतर भूखंड वाटपाची कार्यवाही करणेत येईल. १२.५% योजने अंतर्गत भूखंड वाटपासाठी विलंब झालेला नाही. त्यामुळे गरजेपोटीचा प्रश्न १२.५ % च्या वाटपातील विलंबामुळे निर्माण झाला आहे, अशी बाब नाही.
(४) व (५) नवी मुंबईतील गावठाणे व विस्तारीत गावठाणांतील घरे व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नाबाबत मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१६/०३/२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने दि. १६/०३/२०१७ च्या शासन पत्रान्वये निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधिता समवेत दि. ३०/०३/२०१७ रोजी बैठक घेऊन सर्वेक्षणाची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी पार पाडावी व त्याकरीता सिडकोकडून सर्वतोपरी सहाय्य देण्यात येईल असे स्पष्ट केले.

तद्नंतर शासनाकडून दि.१६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सिडकोस निर्देशित केलेल्या पत्रानुसार प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामांचे नियमितीकरण करण्यासाठी प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या मागणीनुसार त्यांनी धारण केलेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण हे जिल्हाधिकारी ठाणे व रायगड यांनी करावयाचे असून त्यामध्ये सुसुत्रता व सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सिडकोकडे सोपविली आहे.

सर्व्हेक्षणाबाबत जिल्हाधिकारी ठाणे व रायगड यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे. सर्वेक्षण झाल्यानंतर शासनाच्या अंतिम अधिसूचनेनुसार पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेली फुरसुंगी सह ११ गावे मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

(६८) * ११६६५८ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये फुरसुंगीसह ११ गावे समाविष्ट झाल्यापासून रस्ते दुरुस्ती वगळता विकासकामे व मुलभूत सुविधांपासून फुरसुंगी गाव गत ४ महिन्यांपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरिक रस्त्यावरील खड्डे, दुषित पाणी, कचरा व्यवस्थापन, पथ दिवे, विविध प्रकारचे दाखले आदि छोट्यामोठ्या समस्यांना सामोरे जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंबधी महानगरपालिका प्रशासनास वारंवार मागणी करूनही निधीची तरतूद नसल्याचे कारण देत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) • दि.४.१०.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे पुणे महानगरपालिकेत नव्याने फुरूसुंगीसह ११ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे.
• सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या संबंधीत ११ गावांसाठी सदर आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध नसल्याने मोठी विकासकामे हाती घेता आली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.
• तथापि, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी पुणे महानगरपालिकेने नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी वर्गीकरणाव्दारे रु. २१.७३ कोटी इतका निधी उपलब्ध केला. त्यामधून या गावातील देखभाल दुरूस्ती, विद्युत देयके अदायगी अशी कामे करण्यात आली आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
• तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रू.१०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
• सदर निधीतून रस्ते, पायाभूत सुविधा, घनकचरा व्यवस्थापन, जलशुध्दीकरण यंत्रणा, सांडपाणी व्यवस्थापन विषयक कामे, आरोग्य व इतर अनुषंगीक विकास कामे करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील माजी नगरसेवकाच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामध्ये करण्यात आलेल्या तक्रारीबाबत

(६९) * ११६९३९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माजी नगरसेवक श्री.मोहसीन हैदर यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामध्ये तक्रार करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तपासामध्ये दिरंगाई होत असून माजी नगरसेवक श्री.मोहसीन हैदर यांचावर बेहिशोबी मालमत्ता असल्याचे अनेक पुरावे असूनही सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न काही अधिकारी करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुराव्यांच्या आधारे माजी नगरसेवक श्री.मोहसीन हैदर यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे एफआयआर दाखल करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार माजी नगरसेवक श्री.मोहसीन हैदर यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे माजी नगरसेवक मोहसीन हैदर यांनी बेहिशोबी मालमत्ता संपादीत केल्याबाबत दिनांक २७.०६.२०१२ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला असून त्यानुषंगाने दिनांक ०१.११.२०१२ रोजी याबाबतची उघड चौकशी सुरू करण्यात आली आहे.
(२) सदर उघड चौकशीमध्ये मोहसीन हैदर यांच्या मालमत्तांची सखोल चौकशी करण्यात येत असून सदरचे प्रकरण अंतिम टप्यात आहे.
(३), (४) व (५) माजी नगरसेवक मोहसीन हैदर यांच्या संपत्तीची उघड चौकशी अंतिम टप्यात असल्याने उघड चौकशीअंती प्रचलित कार्यपध्दतीनूसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मालाड (मुंबई) मधील मालवणीत एव्हरशाईन नगरमध्ये भूमाफियांकडून खाडी व नाल्यालगत झोपड्या उभारण्यात येत असल्याबाबत

(७०) * १२०९३६ श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) मधील मालवणीत एव्हरशाईन नगरामध्ये भूमाफियांकडून खाडी व नाल्यालगत असलेले कांदळवन तोडून मोठ्या प्रमाणात झोपड्या उभारण्यात येत असल्याचे दिनांक ३० एप्रिल २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने भूमाफिया कांदळवन तोडून बेकायदा झोपड्या उभारून त्या झोपड्या सहा ते सात लाख रुपयांना विकत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूमाफिया, झोपडपट्टी गुंड तसेच संबंधित विभागाच्या भ्रष्ट अधिकारांच्या संगनमताने नाल्यालगत बांधण्यात आलेल्या झोपड्यांमध्ये राहणाऱ्यांच्या जीवाला पावसाळ्यात धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) मालाड येथील मालवणीमधील एव्हरशाईन नगरामध्ये भुमाफियांकडून खाडी व नाल्यालगत असलेले कांदळवन तोडून मोठ्या प्रमाणात झोपड्या उभारल्या जात असल्याबाबतचे वृत्त स्थानिक साप्ताहिक नागरिक वार्ता मध्ये दिनांक ३०.४.२०१८ रोजी प्रसिद्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) एव्हरशाईन नगर मधील खाडीलगतचे क्षेत्र हे मौजे वळणई येथील सर्व्हे क्र. ३०७/१४६ मधील आहे. प्रश्नांकित क्षेत्र हे खाजगी क्षेत्र असून “वने” म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे. परंतू सदर क्षेत्राचा ताबा अद्याप महसूल विभागाकडे आहे.

एव्हरशाईन नगरातील खाडी व नाल्याजवळ कांदळवन नष्ट करुन उभारण्यात आलेल्या ६८ अनधिकृत झोपड्या तहसिलदार (अतिक्रमण/ निष्कासन), मालाड, मुंबई महानगरपालिका आणि वन विभाग यांच्या दिनांक ६.०७.२०१८ रोजीच्या संयुक्त कारवाईत निष्कासित करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

दिवा (जि.ठाणे) येथील स्मशानभूमीतील सुविधांबाबत

(७१) * १२१३८९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिवा (जि.ठाणे) येथील स्मशानभूमीसाठी सन २०१४ मध्ये रूपये १३ लाख १२ हजार ११० एवढी रक्कम मंजूर करण्यात आली असून या स्मशानभूमीचे काम कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून कंत्राटदाराला पूर्ण रक्कम अदा केली असतानाही मात्र स्मशानभूमीमध्ये सुविधा अद्याप करण्यात आल्या नसल्यामुळे सदरहू स्मशानभूमीच्या कामाची चौकशी करण्यात यावी म्हणून तेथील नागरीकांनी आयुक्त, ठाणे नगरपालिका, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, मा.मुख्यमंत्री आदींकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तक्रारीनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) ठाणे महानगरपालिकेने दिवा पश्चिम येथील पाटील स्मशानभूमीच्या नुतनीकरणासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

* उपरोक्त स्मशनाभूमीच्या नुतनीकरणासाठी अंदाजे रुपये १३,१२,०००/- इतक्या रक्कमेचा व खालील कामांचा अंतर्भाव असलेला कार्यादेश दिनांक ०८.०५.२०१३ रोजी देण्यात आला.

• संरक्षक भिंत बांधणे व भरणी करणे.

• बर्निंग स्टॅण्ड (२ नग)

• शेड उभारणे

* उक्त कामांपैकी सदर ठिकाणी रुपये १०,४३,००० इतक्या रकमेची संरक्षक भिंत बांधण्यात आली.

* तथापि, स्थानिक नागरीक, स्थानिक लोकप्रतिनिधीं यांच्या विरोधामुळे या ठिकाणी विकत घेण्यात आलेले बर्निंग स्टँण्ड (रुपये २,४०,०००) व शेड (रुपये २५,०००) जवळील स्मशानभूमीकरीता वापरण्यात आले.

* या प्रकारे एकूण मंजुर रक्कमेपैकी रुपये १०,४३,००० चा निधी मंजुर ठिकाणी तर रुपये २,६५,००० इतक्या रकमेची कामे अन्य ठिकाणी करण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) दिनांक ०८.०६.२०१८ च्या शासन परिपत्रकातील अटीचे उल्लघंन झाले असल्याने या प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

बुलढाणा (जि.बुलढाणा) शहराला नियमित व सुरळीत पाणी पुरवठा होत नसल्याबाबत

(७२) * ११९२६४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) शहराला पाणी पुरवठा करणा-या येळगांव धरणामध्ये मुबलक पाणी साठा असतांनासुध्दा नगरपरिषद प्रशासनाच्या नियोजनाअभावी व हलगर्जीपणामुळे शहरवासीयांना नियमित व सुरळीत पाणी

पुरवठा होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा शहरास नियमित पाणी पुरवठा करणेबाबत स्थानिक रहिवाशांनी दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास नगरपरिषद प्रशासनास दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार बुलढाणा शहरास नियमित व सुरळीत पाणी पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बुलढाणा शहराला येळगाव धरणावरील जलशुद्धीकरण केंद्रातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. जलशुद्धीकरण केंद्रातील शुद्ध पाण्याचा उपसा करणाऱ्या २ पंपापैकी १ पंप दिनांक १२/४/२०१८ रोजी नादुरुस्त झाल्याने नियमित होणाऱ्या पाणीपुरवठ्यात व्यत्यय आला होता, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे. सदर निवेदनात, उपसा करणारे पंप वारंवार नादुरुस्त होत असल्याने त्यांच्या दुरुस्तीवर खर्च करण्यापेक्षा नियमित पाणीपुरवठ्यासाठी नवीन पंप खरेदी करण्याचे सुचविण्यात आले होते.

(३) • बुलढाणा शहरातील जनतेला शहरापासून अंदाजे ५ कि.मी. अंतरावरील येळगाव धरणावरील जलशुद्धीकरण केंद्रातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

• सदर जलशुद्धीकरण केंद्रातील शुद्ध पाण्याचा उपसा करणाऱ्या २ पंपापैकी १ पंप दिनांक १२/४/२०१८ रोजी नादुरुस्त झाला. सबब, पाणी पुरवठ्यात काहीसा व्यत्यय आला होता. तात्पुरता पर्यायी पंप दुसऱ्याच दिवशी उपलब्ध करुन घेऊन बसविण्यात आला व पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला. सदर पर्यायी पंप दिनांक ३०/४/२०१८ रोजी बंद पडला. दरम्यान नगरपरिषदेचा पंप दुरुस्त होऊन उपलब्ध करुन घेण्यात आला व दिनांक २/५/२०१८ रोजी तो बसवून पाणी पुरवठा पुनश्च: सुरळीत करण्यात आला.

• सदर जलशुद्धीकरण केंद्राची उभारणी १४ ते १५ वर्ष पूर्वीची असल्याने यंत्रसामुग्री जुनी आहे. सदर जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती व अद्ययावतीकरण प्रस्तावित असून त्यात अशुद्ध पाण्याचा उपसा करणारे ३ पंप व शुद्ध पाण्याचा उपसा करणारे ३ पंप असे एकूण ६ पंप नव्याने खरेदी करुन बसविण्याचे प्रस्तावित आहे.

• बुलढाणा शहराला खडकपूर्णा धरणाच्या कायमस्वरुपी उद्भव स्त्रोतावरुन पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत मंजूर करण्यात आली असून उद्भव स्त्रोतावरुन अशुद्ध पाण्याची उचल करुन अस्तित्वातील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहचविण्याचे ७५% काम पूर्ण झाले आहे. सदर योजनेत एकूण ९१ कि.मी. अंतर्गत वितरण जलवाहिनी व शहरातील १३ लक्ष लिटर व १० लक्ष लिटर क्षमतेच्या २ उंच पाण्याच्या टाक्यांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम, नवकिरण मार्ग, चार बंगला येथील कामगार नगर को. ऑप. सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

(७३) * १२०३२२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम, नवकिरण मार्ग, चार बंगला येथील कामगार नगर को. ऑप.सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकासकाने कामगारांना तात्पुरत्या स्वरुपात राहण्यास दिलेल्या भूखंडावरील अतिक्रमण काढून उद्यान बांधणे तसेच नवकिरण रोड ते न्यू लिंक रोड रस्त्याचे बांधकाम करण्याचे कराराद्वारे मान्य करुनही अद्याप याबाबत विकासकाने कोणतीच कार्यवाही न केल्याने यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी व सोसायटीच्या अध्यक्षांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासन तथा प्राधिकरणाने अतिक्रमण काढून उद्यान बांधणे व रस्त्याचे बांधकाम न करता कराराचे उल्लंघन केल्या

प्रकरणी विकासकाविरुध्द अद्याप कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत प्राधिकरणाने विकासकास तात्काळ करारातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याच्या दृष्टीने कोणते निर्देश दिले आहेत व त्यानुसार विकासकातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) होय, हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधींचे दि.०५.०४.२०१८ रोजीचे पत्र पुढील कार्यवाहीस्तव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई कार्यालयास शासनाच्या दि. १६.०५.२०१८ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले असून याबाबत संबंधित मा.लोकप्रतिनिधी यांना दि.२५.०५.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच संबंधित गृहनिर्माण संस्थेचे दि.३१.०१.२०१८ चे पत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) योजनेमध्ये विकास नियंत्रण नियमावली १९९१ नुसार करमणूकीच्या मैदानाचे आरक्षण असून त्याचे क्षेत्रफळ २०७५.०० चौ.मी. इतके आहे. सदर मैदानाच्या आरक्षित भूखंडावर इमारतीच्या बांधकामाकरीता लागणाऱ्या मजूरांकरीता तात्पुरत्या स्वरुपात निवारा उपलब्ध करुन देण्यात आला आहे. विक्री घटक इमारत विंग सी च्या भोगवटा प्रमाणपत्र मंजूर करण्याच्या अगोदर सदर आरक्षित भूखंड मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करुन देण्यात येईल, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

तसेच योजनेमध्ये समाविष्ट ९.१५ मी रुंद रस्त्यावरील झोपड्यांच्या पात्रतेविषयी सहाय्यक महानगरपालिका आयुक्त, के/प विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. १३.०३.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर सदर रस्त्यावरील झोपड्यांबाबत पुढील कार्यवाही करण्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावली (जि.चंद्रपूर) येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यतेसह निधी मिळण्याबाबत

(७४) * १२२९१६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सावली येथे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेता नगरपंचायत सावली यांनी नगरोत्थान योजनेंतर्गत सावली शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजनेचा रुपये १२ कोटींचा प्रस्ताव अंतिम मंजूरी मिळण्यासाठी प्रधान सचिव, नगरविकास मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने प्रशासकीय मान्यतेसह निधी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, नगरोत्थान योजनेंतर्गत सावली येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी रुपये १२ कोटी निधीची आवश्यकता असल्याने सदर निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत सावली नगरपंचायतीच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव फेब्रुवारी, २०१८ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सावली नगरपंचायत वाढीव पाणी पुरवठा प्रकल्पास शासनाने मान्यता दिली असून प्रथम हप्त्याचा निधी लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सच्या धर्तीवर कल्याण-डोंबिवली येथे कल्याण विकास केंद्र उभारण्याबाबत

(७५) * ११८२९९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि परिसरातील उपनगरांत रोजगार आणी विकासाला गती देण्यासाठी मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सच्या धर्तीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळलेल्या २७ गावांपैकी १० गावांच्या सहयोगाने “कल्याण विकास केंद्र” (कल्याण ग्रोथ सेंटर) उभारण्याचा निर्णय दिनांक २० एप्रिल,२०१८ रोजी वा त्या सुमारास घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातून किती नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत व या प्रकल्पासाठी लागणाऱ्या भु-संपादनाबाबत किती टक्के मोबदला व त्यांच्या पुनर्वसनाची हमी देण्यात आली आहे,

(३) असल्यास, ठाणे येथील कळवा विभागातील शासकीय जमिनीवरही वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सच्या धर्तीवर विकास करण्याचा यापूर्वी निर्णय घेतलेला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांपैकी १० गावांमधील सुमारे १०८९ हे. आर. क्षेत्र ग्रोथ सेंटरसाठी ठेवून तसेच या क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विशेष नियोजन प्राधिकरण

म्हणून कायम ठेऊन उर्वरित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून असलेली नेमणुक शासनाने दि.३०/४/२०१६ च्या अधिसुचनेन्वये रद्द केली आहे. सर्वपक्षीय युवा मोर्चा, कल्याण तसेच सर्वपक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समिती यांच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे दि.२०/४/२०१८ रोजी बैठक झाली असुन, या बैठकीमध्ये गावक-यांच्या मागण्याबाबत चर्चा झाली.

(२) सदर ग्रोथ सेंटरचे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार नगर रचना परियोजनेच्या माध्यमातून विकसित करण्याचे प्रस्तावित असुन, यामध्ये भूसंपादनाचा समावेश होत नसुन जमिन मालकास योग्य आकाराचा पुनर्रचना केलेला विकसित भूखंड देण्याची तरतुद आहे. सद्यस्थितीत परियोजनेचा मसुदा तयार करण्याचे काम नियोजन टप्प्यावर सुरु असल्याने रोजगार निर्मितीबाबतचा अंदाज नगर रचना योजनेचा अंतिम आराखडा तयार केल्यानंतर करता येईल.

(३) व (४) मौजे कळवा, ता. जि. ठाणे येथील शासकीय जमिनीवर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे मदतीने सेंट्रल बिझनेस डिस्ट्रीक्टचा बृहत आराखडा तयार करुन घेण्यास, दि.३०/१/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये तत्वता मान्यता देण्यात आली होती. यासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त झाला असुन, त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चेंदवली (ता.वाडा, जि.पालघर) गावात १६ जणांना दूषित पाण्याची बाधा होऊन एका वृध्द महिलेचा झालेला मृत्यु

(७६) * ११७२४८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील

(उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंदवली (ता.वाडा, जि.पालघर) गावात दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास झालेल्या हळदी समारंभाच्यावेळी १६ जणांना दूषित पाण्याची बाधा झाली असून एका वृध्द महिलेचा मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे. मौजे चेंदवली या ठिकाणी दि.०३.०५.२०१८ रोजी दूषित पाणी पिल्यामुळे ग्रामस्थांना उलटी व संडासची लागण झाली होती, तथापि सदर महिला ही दिनांक ०२ मे, २०१८ रोजी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आली होती. सदर महिलेचा मृत्यु हा दूषित पाण्यामुळे झाला नसून हृदयविकार व श्वसनाच्या आजाराने झाला आहे.

(२) ग्रामस्थांना उलटी व संडासची लागण झाल्याचे कळताच साथ नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात येऊन संडास व उलट्या होणा-या रुग्णांवर प्राथमिक उपचार केले त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याचे पाणवठे योग्य प्रतीची टीसीएल पावडर टाकुन नियमित शुध्दीकरण करुन पिण्याचे पाणी शुध्द केले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या संगणकीय कारभारात सॅप प्रणाली पुरवणाऱ्या कंत्राटदाराचे संपुष्टात आलेले कंत्राट वाढवून दिल्याबाबत

(७७) * १२१३२७ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या संगणकीय कारभारात सॅप प्रणालीचा वापर करण्यात येतो त्यासाठी सहाय्य सेवा पुरविणा-या कंत्राटदांचे कंत्राट संपुष्टात येण्यापूर्वीच तांत्रिक कारण पुढे करत पुन्हा १ वर्षासाठी याच कंत्राटदाराला कंत्राट कालावधी वाढवून देण्यात आला असुन त्याकरिता रुपये ३२ कोटी देण्यात आल्याचे दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सॅप प्रणालीच्या अंमलबजावणीनंतर विविध खात्यातील कामकाजाकरीता आवश्यक सहाय्य सेवा मे.एबीएम नॉलेजवेअर लि. या कंत्राटदार कंपनीकडून घेतली जात असुन याच कंपनीला स्थायी समितीच्या मंजुरीविना रुपये २ कोटीचे कंत्राटकाम पुढील वर्षभराकरिता परस्पर वाढवून दिल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) सन २०१४-१७ या कालावधीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सॅप प्रणालीवर सहाय्य सेवा पुरविण्याकरीता निविदा प्रक्रियेद्वारे मे. एबीएम नॉलेजवेअर लि. यांना कंत्राट देण्यात आले होते.

सदर कंत्राटदारास स्थायी समितीच्या मंजूरीने जुलै, २०१७ ते जून, २०१८ या एका वर्षाच्या वाढीव कालावधीचे एकूण रु. ३१.७१ कोटी इतक्या रकमेचे कंत्राट देण्यात आले आहे.

निविदेतील मूळ कंत्राट कालावधी संपल्यानंतर नवीन निविदा काढणे आवश्यक असताना, कंत्राट कालावधीत वाढ का करण्यात आली याबाबतचा अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे शहरातील (जि.धुळे) वरखेडी रोडवरील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाबाबत

(७८) * ११७९८२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील (जि.धुळे) वरखेडी रस्त्यावरील दुरवस्था होऊन बंद असलेला ५० वर्षापूर्वीचा सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान महानगरपालिकेने कार्यान्वित केला होता परंतु व्यवस्थापनाअभावी हा प्रकल्प तीन महिन्यातच बंद पडला असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्प स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत माहे जानेवारी, २०१८ मध्ये गुणानुक्रम वाढविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनावर भर देण्यात आल्यामुळे या ठिकाणी १२ फूट खोल दोन तळी व काही उंचीवर एक तळे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तळे व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याऐवजी हा प्रकल्प अपूर्णावस्थेत बंद ठेवण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

• सन १९६३ मधील भुयारी गटार योजनेतील जमिनीत गाडल्या गेलेल्या सेटलिंग टँकच्या टाक्या स्वच्छता अभियानाच्या वेळेस मोकळ्या करण्यात आल्या आहेत.

• सदरचा सेटलिंग टँक आजमितीस कार्यान्वित केला आहे.

(२) हे खरे नाही.

• सदर ठिकाणी तळे नसून, सन १९६३ मध्ये व त्यानंतर जुन्या तंत्रज्ञानानुसार राबविलेल्या भुयारी गटार योजनेच्या ऑक्सिडेशन पाँडकडे सांडपाणी वाहून नेण्यासाठीच्या सेटलिंग टँकच्या टाक्या आहेत.

• ही कामे सन १९६३ मध्ये तत्कालीन पाणी पुरवठा व स्वच्छता मंडळाने केलेली आहेत.

• अत्यंत जुना प्रकल्प असल्याने, तो पुर्णपणे सुरू नाही. त्यामुळे केवळ उपलब्ध सुविधा स्वच्छता अभियानात दाखविल्या आहेत.

(३) • सदर सेटलिंग टँक आजमितीस कार्यान्वित आहे.

• तथापि, ही अत्यंत जुनी योजना असल्याने व योजना पुर्ण कार्यान्वित नसल्याने, खुल्या नाल्याचे पाणी या टाक्यामध्ये सोडून ऑक्सिडेशन पाँडकडे जोडले आहे.

(४) • सद्यस्थितीत धुळे शहरासाठी अमृत योजनेंतर्गत सुमारे ४०० कोटी रुपयांचा प्रकल्प तयार करण्यात आला असून, योजनेच्या प्रथम टप्प्यात रु.१४२ कोटीच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

• जुना प्रकल्प कालबाह्य झाला असल्याने, या ठिकाणी शुध्द नळ प्रकल्प (STP) प्रस्तावित आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार, सदर प्रकल्पाचे व सांडपाणी व्यवस्थापनाचे काम करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दहिसर (मुंबई) येथील शांतीनगर झोपडपट्टी पूनर्वसनाचे काम अपूर्ण असल्याबाबत

(७९) * ११८१८७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (मुंबई) येथील शांतीनगर झोपडपट्टी पूनर्वसनाचे काम गत १० वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असून विकासकाने झोपडीधारक लाभार्थ्यांना अद्‌याप घरे दिली नाहीत व झोपडीधारकांना भाडे दिले नाही ही बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५० झोपडीधारकांना घरे देण्यात यावीत तसेच पुनर्वसन योजनेत नियमबाहय कामे विकासकाने केली असल्याने या सर्व प्रकल्पाची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) हे खरे नाही.

सदर योजनेत पुनर्वसन घटकात एकूण २२३८ पुनर्वसन सदनिका समाविष्ट असलेल्या ४ पुनर्वसन इमारती असून आतापर्यंत ११५७ पुनर्वसन सदनिकांचे (११०४ निवासी, २४ अनिवासी, २९ निवासी व अनिवासी) काम पूर्ण होऊन पात्र झोपडीधारकास वाटप झालेले आहे.

(२) सदर योजनेच्या विकासकाने, ५० अपात्र झोपडीधारकांचे म्हणणे एेकून त्यांना घरे देण्यात यावीत असे सन्माननीय लोकप्रतिनिधींचे दि.२१.०२.२०१८ चे निवेदन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पाप्त झालेले आहे.

(३) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सद्‌यस्थितीमध्ये कोणतेही नियमबाह्य बांधकाम आढळून आलेले नाही, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सागंली जिल्हयात पोलीस भरतीसाठी सराव करताना एका युवतीचा झालेला मृत्यु

(८०) * ११७९४५ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागंली जिल्हयातील विटा खानापूर रस्त्यावर असणाऱ्या बळवंत महाविद्यालय येथे दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास पहाटे पावणेपाच वाजता पोलीस भरतीचा सराव सुरू असतांना कु.कोमल दतात्रय पवार वय २० रा. रेवनागर विटा (जि.सांगली) या विद्यार्थीनीचा मृत्यू झाला असल्याची दुर्देवी घटना माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी विटा पोलीस ठाण्यात मृत्युची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दि. १३/०४/२०१८ रोजी १६.१५ वा ते १६.३० चे दरम्यान बळवंत कॉलेज विटा येथील मैदानावर कु.कोमल दत्तात्रय पवार वय २० वर्षे, रा. रेवानगर (सुळेवाडी), ता. खानापूर ही पोलीस अधीक्षक, सांगली यांच्या स्तरावर पोलीस भरतीचा सराव करतांना तिस अचानक चक्कर आल्याने तिस उपचारा करीता यशश्री हॉस्पीटल विटा येथे घेवुन आले असता ती उपचारास दाखल करण्यापुर्वीच मयत झाली आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) यातील मयताचे वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रूग्णालय विटा यांनी पी.एम.करण्यात आले असुन त्यांनी यातील मयतास मरण हे हृदयविकाराच्या झटक्याने आले असलेबाबत मत दिले आहे. . तसेच मयताचे नातेवाईकांकडे चौकशी करता त्यांची कु. कोमलच्या मयेतबाबत काही एक तक्रार नसल्याने मृत्युची चौकशी पुर्ण करून कु. कोमल पवार हीचा मृत्यु हृदयविकाराचे झटक्याने मयत अशी समरी मंजुर होऊन मिळणेबाबत उपविभागीय दंडाधिकारी, विटा यांना दि. २८/०४/२०१८ रोजी पोलीस अधिक्षक, सांगली यांनी चौकशीचे सर्व कागदपत्रे पाठविलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौ.कुरार (मालाड, मुंबई) येथील भू.क्र.४०३ ते ४४१ या भूखंडावरील एसआरए अंतर्गत पुनर्विकास करण्याबाबत

(८१) * १२५७०६ श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.कुरार (मालाड, मुंबई) येथील भू.क्र.४०३ ते ४४१ या भूखंडावरील एसआरए अंतर्गत पुनर्विकासाबाबतचे काम माऊली साई डेव्हलपर्स प्रा.लि. यांचे बरोबर सन २०११ मध्ये करार झाल्यानंतर सोपविण्यात आले व करारानंतर विकासकाने रहिवाशांची घरे पाडल्यापासून सन २०१६ पर्यंत घर भाडे दिले तसेच कराराप्रमाणे सदरहू मूळ रहिवाशांना १८ महिन्यात पुनर्विकास केलेल्या घरांचा ताबा देणे बंधनकारक असतानाही आजमितीस पुनर्विकासाचे काम पूर्ण झालेले नसून गत दीड वर्षापासून रहिवाशांना घरभाडे देणे थांबविले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ७ वर्षापासून एसआरए योजनेतून घरे बांधून देतो असे सांगून दिशाभूल करणाऱ्या माऊली साई डेव्हलपर्स प्रा.लि. यांच्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू झोपडीधारकांना विनाविलंब भाड्याचे पैसे व पुनर्विकसित घरांचा ताबा विनाविलंब मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) प्रश्नांकित संस्थेची किंवा झोपडीधारकांना भाडे न मिळाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

दक्षिण मुंबई क्षेत्रातील पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या ६६ इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत

(८२) * ११६९२० श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबई क्षेत्रात पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या ६६ इमारती असून या इमारतीच्या पुनर्बांधणीकरिता वि.नि.नि. ३३(९) व ३३(७) मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने मा.लोकप्रतिनिधींची समिती देखील गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदरहू अहवालात काय नमूद आहे आणि अहवालातील कोणत्या शिफारशी शासनाकडून स्वीकारण्यात आल्या आहेत,
(४) असल्यास, सदर शिफारशींची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) समितीमधील सदस्यांनी शासनास शिफारशी सादर केलेल्या असून, त्यानुसार समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे.

कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) येथील रिंगरूटच्या कामाबाबत

(८३) * १२१८७१ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) रिंगरूटकरिता १२८ एकर जमिनी भूसंपादन करण्याचे आवाहन महानगरपालिकेपुढे असून ३२ किलोमीटर अंतराचा हा प्रकल्प २७ गावांमधील काही गावे व कल्याण पश्चिमेकडील काही भाग अशा ठिकाणाहून जाणार आहे सदर कामासाठी एमएमएआरडीएकडून रुपये ८०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवलीतील भूसंपादनाची प्रक्रिया नकाशा अभावी रखडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १२ गावांतील भूसंपादन करण्यासाठी भूमिअभिलेख व नगररचना विभागाकडून विलंब होत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन उक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर व सदर विभागावर कोणती कारवाई करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार ३०.३० कि.मी. लांबीचा कल्याण-डोंबिवली बाह्यवळण रस्ता असून सदर रस्ता महानगरपालिकेच्या २६ गावांच्या हद्दीमधून जात आहे.

• बाह्यवळण रस्त्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येत आहे.

• बाह्यवळण रस्त्याच्या बांधकामासाठी आवश्यक १०४.४१ हेक्टर इतक्या बाधित क्षेत्रापैकी २९.७४ हेक्टर इतके क्षेत्र कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास उपलब्ध करून दिले आहे.

• सदर बाह्यवळण रस्त्याच्या रू. ५७८ कोटी इतक्या रक्कमेच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विस्तारीत मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांतर्गत प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२), (३) व (४) • सदर बाह्यवळण रस्त्याने बाधीत २६ गावांमधील डोंबिवली विभागातील १४ गावांपैकी ७ गावांचे संयुक्त मोजणी नकाशे प्राप्त झालेले आहेत तर कल्याण विभागातील १२ गावांपैकी ११ गावांचे संयुक्त मोजणी नकाशे प्राप्त झालेले आहेत.

• महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या संयुक्त मोजणी नकाशांच्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील भुयारी गटार योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

(८४) * ११७६२७ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील भुयारी गटार योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून निविदेत ठरवून दिलेल्या वेळेत काम केले नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीअंती काय निदशर्नास आले व तद्नुसार अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील भुयारी गटार योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर व सदर कंपनीला पाठीशी घालणाऱ्या संबंधित नगरपरिषद प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) • केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत अंबरनाथ नगरपरिषदेचा भुयारी गटार प्रकल्प ऑक्टोबर, २०११ मध्ये मंजूर करण्यात आला होता.

• सदर प्रकल्पाचे कार्यादेश नोव्हेंबर, २०१३ मध्ये देण्यात आले असून मे, २०१७ पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करावयाचे होते. सदर प्रकल्प मार्च, २०१७ मध्ये कार्यान्वित झाला आहे.

• सदर प्रकल्पातील कामे ही निकृष्ट प्रकारची झालेली नसल्याबाबत अहवाल मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांनी शासनास सादर केला आहे.

• याव्यतिरिक्त अमृत अभियानांतर्गत अंबरनाथ नगरपरिषदेच्या विस्तारीत, विकसीत तसेच झोपडपट्टी क्षेत्रासाठी मलनिस्सारण प्रकल्प सप्टेंबर, २०१७ मध्ये मंजूर करण्यात आला आहे.

• सदर प्रकल्पाचे ३% काम पूर्ण झालेले असून योजनेंतर्गत वापरलेल्या पाईप्सची त्रयस्थ तांत्रिक संस्थेने केलेल्या तपासणीअंती पाईप्सचा पुरवठा केलेला असून सदर योजनेचे काम निकृष्ट नसल्याबाबत अहवाल अंबरनाथ नगरपरिषदेने सादर केला आहे.

मालाड (मुंबई शहर) येथे एका राजकिय पक्षाशी संबंधित व्यक्तीची झालेली हत्या

(८५) * ११६९१२ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील मालाडमधील शिवसेनेचे माजी उप शाखाप्रमुख श्री.सचिन सावंत यांची दिनांक २२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास रात्री भररस्त्यात हत्या करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कुरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी कुरार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २४९/२०१८ कलम ३०२, ३०७, १२० (ब), ३४ भा.दं.वि. सह कलम ३, २५, २७ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल-उरण (जि.रायगड) येथील २३ गावांच्या नैना प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत

(८६) * ११६५९३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल-उरण (जि.रायगड) तालुक्यातील २३ गावांचा नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र) मध्ये समावेश असून नैनाची अधिसूचना जाहिर होऊन ७ वर्षाचा कालावधी उलटूनही सिडकोने या क्षेत्राच्या विकासाबाबत कोणताही निर्णय न घेतल्यामुळे सिडकोकडून होणाऱ्या विलंबाबाबत विचारविनिमय करण्यासाठी नैनाबाधित शेतकऱ्यांच्या उत्कर्ष समितीची बैठक दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या शंकाचे सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून निरसन न झाल्याने सिडको प्रशासनाबरोबर शेतकऱ्यांच्या झालेल्या सर्व बैठका निष्फळ ठरल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) नैना बाधित शेतकऱ्यांच्या उत्कर्ष समितीने दि.३०.०४.२०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीबाबत सिडको महामंडळास अवगत करण्यात आलेले नव्हते. तथापि नैना अधिसुचित क्षेत्रातील २३ गावांच्या अंतिम विकास आराखड्यास शासनाने दि.२७.०४.२०१७ रोजी मान्यता दिली आहे. अंतिम विकास आराखड्यातील प्रस्तावांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार नगर रचना योजना तयार करण्याची तरतुद आहे. त्यानुसार अंतिम विकास आराखड्याची अंमलबजावणी नगर रचना योजनेच्या माध्यमातून करण्याची कार्यवाही सिडकोच्या स्तरावरून सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथे प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमी व दफनभूमीच्या नोंदी विकासकाच्या फायद्यासाठी नष्ट केल्याबाबत

(८७) * ११९७९३ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथे प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमी व दफनभूमीची नोंद जुन्या माजिवाडा ग्रामपंचायतीच्या दस्ताऐवजामध्ये असतांना काही विकासकांना फायदा करून देण्यासाठी जाणीवपूर्वक ग्रामपंचायतीच्या दस्ताऐवजातील नोंदी नष्ट केल्या असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार दस्ताऐवजातील नोंदी नष्ट करणा-या व स्मशानभूमी व दफनभूमी म्हणून नोंद असलेल्या जागेवर इमारत बांधण्याची परवानगी देणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) स्थानिक लोक प्रतिनिधीचे दिनांक १८.०५.२०१८ चे पत्र प्राप्त झाले असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने खालील बाबी निदर्शनास येतात:-

- मौजे माजिवडे ता.ठाणे येथील सर्वे नं. ४०६/३/ब, क्षेत्र ०-१३-० हे. आर. या जागेच्या ७/१२ वर कब्जेदार सदरी "स्मशान महार लोकांचे" अशी नोंद आहे. सदर जागेत सन १९८० पूर्वी पासून झोपडपट्टी असून दिनांक ०३.०८.२००५ रोजी महसुल विभागाने सदर जागेवर झोपडपट्टी पूनर्विकास योजना राबविण्यास मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीत येथे झोपडपट्टी पूनर्विकास योजनेअंतर्गत इमारतीचे बांधकाम सुरु आहे.
- भारत फर्टीलायझर, माजिवडेच्या मागे स्मशानभूमी अस्तित्वात असून सदर जमीनीस सर्वे नं. चा उल्लेख नसल्याचे निदर्शनास आले.

(३) तसेच ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक २४.०१.२०१४ रोजीच्या ठरावान्वये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभुमीचे नियोजित असणारी जागा प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठीची म्हणून ३७ जागा घोषित करण्यात आल्या असून यापैकी माजिवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील ११ स्मशानभुमीचा समावेश आहे.

आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या स्थानिक लोकप्रतिनिधींच्या पत्रामध्ये दस्ताऐवजातील नोंदी नष्ट झालेल्या स्मशानभूमी अथवा दफनभूमीसंदर्भात सविस्तर माहिती नसल्याने याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना या प्रकरणी त्यांचे स्तरावर अधिक चौकशी करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातून २५ मुली बेपत्ता झाल्याबाबत

(८८) * १२३२२३ श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातून २१ दिवसांत सुमारे २५ मुली बेपत्ता झाल्याची गंभीर बाब दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे हे काय,

(२) असल्यास, एकाच वेळी मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने पालक वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे व तद्‌नुसार बेपत्ता मुलींचा शोध घेण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) नाशिक शहरात दि.०१/०४/२०१८ ते दि.२५/०४/२०१८ या कालावधीत एकुण २५ मुली बेपत्ता झाल्या होत्या, त्यापैकी २२ मुलींचा शोध घेण्यात आला आहे. तसेच नाशिक ग्रामीण जिल्ह्यात एप्रिल, २०१८ मध्ये २१ मुली बेपत्ता झाल्या होत्या, त्यापैकी १० मुली मिळून आल्या असून ११ मुलींचा शोध चालू आहे.

सदर घटनांच्या चौकशीमध्ये जास्तीत-जास्त मुली या १५ ते १८ वयोगटातील असून त्यापैकी जास्त प्रमाण हे प्रेमसंबंधातून पळून गेल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी भा.दं.वि.कलम ३६३ अन्वये गुन्हे दाखल करुन मिळून आलेल्या मुलींचे समुपदेशन करुन त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

(३) हरवलेल्या/पळविलेल्या मुलांचा/मुलींचा शोध घेण्याकरीता पोलीस आयुक्तालय, नाशिक स्तरावर महिला सुरक्षा विशेष शाखे अंतर्गत शाळा, कॉलेज, मुली व मुलांचे वसतीगृह अशा ठिकाणी समुपदेशन व संरक्षणाचे कार्यक्रम घेण्यात येतात. या प्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.१५/११/२०१४ रोजी ज्ञापन निर्गमित केले असून त्यातील SOP अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही केली जाते. तसेच प्रत्येक हरवलेल्या/अपहरण झालेल्यांची माहिती CCTNS प्रणालीमध्ये ‘ खोया बचपन’ व ‘ ट्रॅक दि मिसींग चाईल्ड’ या वेब पोर्टल वर भरली जाते. तसेच ऑपरेशन मुस्कान १, २, ३ ऑपरेशन स्माईल अशा प्रकारच्या शोध मोहिमा राबवून हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यात येतो. या करिता नाशिक शहरात सर्व पोलीस स्टेशनमध्ये मिसींग कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

विलेपार्ले पूर्व (मुंबई) येथील साईप्रसाद एस.आर.ए. प्रकल्पातील इमारतीची दूरवस्था झाल्याबाबत

(८९) * ११६८७३ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले पूर्व (मुंबई) येथील साईप्रसाद एस.आर.ए च्या हरिओम कंस्ट्रक्शन या विकासकाने इमारतीच्या बांधकामामध्ये वापरलेल्या निकृष्ट बांधकाम साहित्यामुळे अवघ्या काही वर्षात सदर इमारतीची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने उद्वाहकाचे व अग्निशमन दलाचे सुरक्षा प्रमाणपत्र अद्याप उपलब्ध करून दिलेले नसून इमारत बांधत असताना वापरलेल्या निकृष्ट दर्जाच्या पाईपमुळे पाणी गळती सुरु असून इमारतीला धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पातील २० सदनिका पी. ए. पी. साठी राखीव ठेवलेल्या असतानाही त्या सदनिका विकासकाने व्यावसायिक वापरासाठी परस्पर दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) व (२) हे खरे नाही. विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम Appendix-VIII मधील तक्ता क्रमांक २४ नुसार २४.०० मि.पर्यंत इमारतीला अग्निशमन व्यवस्था लावण्याची आवश्यकता नसल्यामुळे या इमारतीला अग्निशमन दलाची परवानगी घेतलेली नाही. तसेच, उद्वाहकाचे ना-हरकत प्रमाणपत्र विकासकाने घेतलेले नाही. इमारतीला दि.१४.२.२०१२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. इमारतीच्या बांधकामाबाबत तक्रार आल्यावर पाहणी दरम्यान पाईपच्या गळतीमुळे इमारतीला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(३) प्रकल्पामधील २० पैकी १० पी.ए.पी. सदनिका बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेल्या असून, उर्वरित १० पी.ए.पी. सदनिका ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) उर्वरित पी.ए.पी. सदनिका मिळकत व्यवस्थापक झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे हस्तांतरीत करण्याबाबत विकासकाला नोटीस देण्यात आलेली आहे. विकासकाने विहित कालावधीत पी.ए.पी. सदनिका हस्तांतरीत न केल्यास विक्री घटकातील काम थांबविण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुळशी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील सहारा अँबी व्हॅलीतील अनधिकृत बांधकामांबाबत

(९०) * ११६७५२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील सहारा अँबी व्हॅलीतील अनधिकृत बांधकाम झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहारा अँबी व्हॅलीच्या जागेचा लिलाव प्रक्रिया सुरु असतांना या जागेतील वन विभाग, इनाम अथवा वतन जमिनी तसेच अनधिकृत बांधकामे व रेस्टॉरंट याबाबत अद्यापही धोरण निश्चित झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त प्रकरणी धोरण निश्चीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, मौजे आंबवणे व इतर गावांमधील (ता. मुळशी) येथे चालू असलेल्या गिरिस्थान विकास (Hill Station) अंतर्गत अँबी व्हॅली प्रकल्पाबाबतचा सुधारित बांधकाम प्रस्ताव मंजूरीसाठी दि. २९/०३/२०१७ रोजी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दाखल असून त्याचे छाननी दरम्यान अँबी व्हॅली मध्ये खालील प्रमाणे ५ बांधकामे परवानगी न घेता बांधली असल्याचे निदर्शनास आले आहे.

१) अँबी इंटरनॅशनल स्कूल- १५१९१.०० चौ.मी.
२) नमक हॉटेल -६९४.९८ चौ.मी.
३) स्पा -३८१.१६ चौ.मी.
४) बिलीकिया व्हिला - ५८२३.०० चौ.मी.
५) कल्चर सेंटर - ११७७.९१ चौ.मी.

उपरोक्त बांधकामे दंड भरून नियमित करणेचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर असून अद्याप प्राधिकरणाने त्यास मंजूरी दिलेली नाही.
(२) वन विभागाच्या जमिनी सदर प्रस्तावामधून वगळण्यात आलेल्या असून वन जमिनींचा समावेश सदर प्रकल्पामध्ये नाही. तसेच सदर प्रस्तावाला जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि. ०३/०२/२००७ रोजीचे आदेशानुसार २२६१.२४ हेक्टर क्षेत्राकरिता बांधकाम परवानगी दिलेली असून तेवढ्याच क्षेत्राचे

अकृषिक आदेश पारित केलेले आहेत. त्यामुळे सदर क्षेत्रामधील इनाम व वतन जमिनीबाबत महसुल विभागाकडून छाननी झाली आहे. आता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये २६१६.९२ हेक्टर क्षेत्र समाविष्ट आहे. सुधारीत प्रस्तावामधील वाढीव क्षेत्राचे इनाम व वतन छाननी करणेसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. १९/०८/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयास कळविले असून त्याबाबत जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. रेस्टॉरन्टचा वापर अँबी व्हॅली मध्ये अनुज्ञेय आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील अनधिकृत गोडाऊनवर कारवाई करण्याबाबत

(९१) * १२०२९७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील अनधिकृत भंगार गोडाऊनमुळे गुन्हेगारी व आगी लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून नागरिकांच्या व कामगारांच्या जिवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील खान कंपाऊड या गोदामाला आग लागून ८ बसेस जळून खाक झाल्या असून सदर घटनेची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम परवानगी व इतर नियमांचे पालन न करता उभारण्यात आलेल्या भंगार गोडाऊनच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष केल्यामुळेच आगी लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून गुन्हेगारीच्या प्रकरणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून तळोजा औद्योगिक वसाहतीतील अनधिकृत उभारलेल्या भंगार गोडाऊनवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील तळोजा परीसरात गोडाऊनला आग लागण्याचा एक गुन्हा तळोजा पोलीस ठाणे येथे दाखल आहे. या बाबत तळोजा पोलीस ठाणे येथे गोडाऊन मालकाविरुध्द गुन्हा रजि क्र. १५/२०१८ भादवि कलम ३३६, २८५, सह महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम १९४९ कलम ३७६ महाराष्ट्र आग जिवसुरक्षा अधिनियम कलम ३ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. त्यात जिवीतहानी झालेली नाही.

याव्यतीरिक्त गोडाऊन अथवा अवैध भंगारच्या गोडाऊन ला आग लागल्याची कोणतीही घटना दाखल नाही.

तळोजा पोलीस ठाणे हद्दीत नावडे, फेज, तसेच तळोजा फेज १,२ हे नव्याने वसाहती तयार होत आहेत. त्यामुळे तळोजा पोलीस ठाणे हद्दीतील लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. त्यामुळे तळोजा पोलीस ठाणे येथे मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी दाखल गुन्हयांची संख्येमध्ये किरकोळ वाढ झाली आहे.

(२) तळोजा पोलीस ठाणे खान कंम्पाउंड या गोदामाला आग लागुन ८ बसेस जळुन खाक झाल्याबाबत तळोजा पोलीस ठाणेत गुन्हा, अक्समात जळीत, अथवा इतर नोंद आढळून येत नाही.

(३) व (४) पनवेल महानगरपालिका ही दि.१.१०.२०१६ रोजी स्थापन झालेली असून तळोजे एम.आय.डी.सी. कार्यक्षेत्रात महानगरपालिका अस्तित्वात येण्यापुर्वी विविध भंगार गोडाऊन अस्ताव्यस्तपणे उभारण्यात आलेली आहेत. यामुळे येथे आगी लागण्याचे प्रकार घडतात. प्राप्त परिस्थितीत अग्निशमन विभागातील उपलब्ध असलेले मनुष्यबळ, सिडको अग्निशमन सेवा, तळोजा एम. आय. डी. सी. अग्निशमन सेवा, यांच्या मदतीने आगी विझविण्याचे कामे करण्यात येतात.

पनवेल महानगरपालिका/ सिडको/ एम.आय.डी.सी. /यांच्या परिक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यासाठी त्यांच्या मागणीनुसार वेळोवेळी पुरेसा पोलीस बंदोबस्त पुरवण्यात आला आहे. तसेच यापुढे देखील आवश्यकतेनुसार त्यांना पोलीस बंदोबस्त पुरवण्यात येईल.
(५) विलंब झालेला नाही.

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील औषध खरेदीत झालेला गैरव्यवहार

(९२) * १२०३८७ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने कॅगच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करुन खोटी माहिती दिल्याने औषध खरेदी प्रकरणात रुपये ९ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने सन २०१३ ते २०१५ या २ वर्षात खरेदी केलेल्या रुपये ९ कोटींच्या औषध खरेदी नंतर त्याबाबतची तपासणी व साठा आरोग्य विभागाच्या अंतर्गत लेखा परीक्षकांनी तपासला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
• तथापि, प्रधान महालेखापाल कार्यालयाने पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाबाबत जून २०१६ मध्ये लेखापरिक्षण केलेले असून पुणे महानगरपालिकेच्या मेडिकल स्टोअर्स मधील सुमारे रू.९ कोटी किंमतीच्या सर्जिकल व नॉन सर्जिकल वस्तूंच्या नोंदी व फिजिकल व्हेरिफिकेशन करण्यात आलेले नाही असा आक्षेप लेखापरिक्षकांनी काढलेला आहे.

(२) व (३) • सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीत रूपये ९ कोटी एवढी सर्जिकल व नॉन सर्जिकल वस्तुंची खरेदी पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर आक्षेपामध्ये तथ्य नसल्याचे पुणे महानगरपालिकेचे म्हणणे आहे.

• अशा प्रकरणी पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत लेखापरिक्षकांकडून नियमित तपासणी करण्यात येते.

• पुणे महानगरपालिकेमार्फत महालेखापालांच्या आक्षेपाबाबतचा खुलासा केला आहे. तसेच महानगरपालिकेने केलेल्या खुलाश्यावर प्रधान महालेखापाल (कॅग) यांच्याकडून समितीमार्फत फेर तपासणी ही करण्यात आलेली आहे.

• तसेच कॅगच्या आाक्षेपाच्या पूर्ततेच्या अनुषंगाने फिजीकल व्हेरीफिकेशन बुक ठेवण्यास सुरूवात केली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार सन २०१९ पर्यंत मुंबईत २ लाख ८४ हजार वाहनांच्या पार्किंगसाठी जागा आवश्यक असल्याबाबत

(९३) * ११७०१३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार सन २०१९ पर्यंत मुंबईत २ लाख ८४ हजार वाहनाच्या पार्किंगसाठी जागा आवश्यक असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ पर्यंत केवळ ७० हजार वाहनांसाठीच अर्थात २५ टक्केच जागा उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात वाहनांची वाढती संख्या पाहता भविष्यात वाहनतळाच्या मोठ्या प्रश्नाला मुंबईकरांना सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील वाहनतळासाठी स्वतंत्र प्राधिकरण असावे अशी शिफारस आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी विकास आराखड्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासन स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करणार आहे काय, तसेच वाहनतळाचा प्रश्न मार्गी लावण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महापालिकेचे सल्लागाराने मे, २०१६ मध्ये महापालिकेस सादर केलेल्या सर्व समावेशक चलनशिलता अंतिम आराखड्यामधील सर्वेक्षणानुसार सन २०१९ पर्यंत मुंबईत २ लाख ८४ हजार वाहनांच्या पार्किंगसाठी जागा आवश्यक असल्याचे आंदाजित केले आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे. वाहनतळांची क्षमता वाढविण्याची उपाययोजना करण्यात येत असून विनियम ३३(२४) अन्वये सार्वजनिक वाहनतळे, रस्त्यावरील सशुल्क वाहनतळे तसेच रस्त्याबाहेरील सुविधा वाहनतळे यामध्ये वाहनक्षमता वाढविण्याचे उपाय करण्यात येत आहेत. त्याद्वारे एक लाख पेक्षा जास्त वाहनांसाठी वाहनतळे उपलब्ध होणार आहेत. तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली-२०३४ च्या विनियम ५३ मध्ये खेळाचे मैदान, बगीचा/ पार्क व खुली जागा याखाली (ओव्हल मैदान, क्रॉस मैदान, आझाद मैदान व शिवाजी पार्क वगळता) वाहनतळाचे बांधकाम अनुज्ञेय आहे. सदर मैदानांखाली वाढीव वाहनतळाची सोय उपलब्ध होवू शकेल.
(४) होय. बृहन्मुंबईतील सार्वजनिक वाहनतळ यांचे नियोजन, व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्यासाठी पार्किंग प्राधिकरण गठीत करण्याची तरतूद बृहन्मुंबईचे विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ५१ मध्ये केली आहे.
(५) अशी बाब नाही. विनियम ५१ नुसार महापालिकेने शासनाशी सल्लामसलत करुन महापालिकेने त्यांचे स्तरावर पार्कींग प्राधिकरणाचे गठण करावयाचे आहे.

वाहनतळाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी वर अनु क्र. (२) व (३) मध्ये नमूद उपाययोजना करण्यात येत आहेत.
(६) लागू नाही

ठाणे बेलापूर औद्योगिक परीसरातील खैरणे एमआयडीसीतील अलना केमिकल्स कंपनीमध्ये लागलेल्या भीषण आगीबाबत

(९४) * १२४१६९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे बेलापूर औद्योगिक परीसरातील खैरणे एमआयडीसीतील अलना केमिकल्स कंपनीमध्ये दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास पहाटे अडीच वाजताच्या सुमारास लागलेल्या आगीत ३ कामगार होरपळले असून त्यातील २ कामगार ९० टक्के भाजले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत आजुबाजुच्या इतर ५ कंपन्याही भक्षस्थानी पडल्याने कोट्यवधी रूपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे, या आगीत आजुबाजुच्या इतर ४ कंपन्यांचे कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

(३) याबाबत करण्यात आलेल्या चौकशीत असे निदर्शनास आले की, या कारखान्यामध्ये टोलीन व इथाईल ॲसिटेट ही अतिज्वालाग्राही रसायने वापरुन उत्पादन प्रक्रिया चालू असतांना विजेच्या शॉर्टसर्किटमुळे आग लागली व ती आजूबाजूला पसरली. महाराष्ट्र कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ अ (२) (क) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम ४ (४), नियम ४ (१) (अ, ब, क) चे भंग झाल्याचे आढळून आल्यामुळे कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द न्यायालयात २ खटले दाखल करण्यात आले आहेत.

तुर्भे, नवी मुंबई पोलीसांकडुन सदर कारखान्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथील न्यायालयाच्या नविन इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यतेसह निधी मिळण्याबाबत

(९५) * १२२९१८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाची स्वतंत्र इमारत नसल्यामुळे नविन इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीकरीता पाठविला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, ब्रम्हपूरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या स्वतंत्र इमारतीचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक रुपये १२ कोटी निधीची पुर्तता करून सदर इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

मा.प्रबंधक (निरीक्षणे-२),मा.उच्च न्यायालय, मुंबई, यांचे दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाची नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आला असता, सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.९९२.३१ लक्ष इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे. सदर प्रस्ताव पुढे नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला असता, दोन्ही विभागांनी विधि व न्याय विभागास आर्थिक वर्षात प्राप्त झालेला

निधी लक्षात घेऊन न्यायालयीन इमारती व न्यायाधिश निवासस्थानांच्या चालू व नवीन बांधकामाचा प्राथम्यक्रम ठरवून सर्वसमावेशक असा कृति आराखडा सादर करणेबाबत कळविले आहे. तसेच इतरही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यानुसार न्यायालयीन इमारती व न्यायाधिश निवासस्थाने यांच्या बांधकामाचा कृति आराखडा मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून मागविण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाची किंमत रु.५.०० कोटीपेक्षा अधिक असल्याने, सदर प्रस्ताव सचिव समितीसमोर सादर करणे आवश्यक होते, परंतु आता नियोजन विभागाने शासन परिपत्रक दिनांक ११ जुन २०१८ अन्वये सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करावयाच्या प्रस्तावांची वित्तीय मर्यादा रु.५.०० कोटीवरुन रु.१५.०० कोटी इतकी केली आहे. सबब, ब्रम्हपूरी येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाकरीता नवीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबतच्या प्रस्तावास विभागस्तरावर मान्यता देता येणार आहे. परंतु नियोजन व वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करणे आवश्यक असल्याने, सदर मुद्यांची पूर्तता करुन प्रस्तुत प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(३) सदर प्रस्तावाची प्रशासकीय मान्यतेची किंमत रु.९९२.३१ लक्ष इतकी आहे. सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर आवश्यक तो निधी न्यायालयीन इमारतींच्या बांधकामाकरीता अर्थसंकल्पीत केलेल्या निधीतून सदर कामास निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेट्रो-३ बांधणीदरम्यान निर्माण होणारा डेब्रिज वडाळा (मुंबई) येथील खाडीभागात टाकण्यात येत असल्याबाबत

(९६) * १२३७३० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो-३ बांधणीदरम्यान निर्माण होणारा डेब्रिज वडाळा (मुंबई) येथील खाडी भागात टाकण्यासाठी एमएमआरसीएल ला जमीन उपलब्ध करून

देण्यात आली असल्याचे माहे मे, वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन खाडीच्या किनारी असल्यामुळे या भागात डेब्रिज टाकणे हे सीआरझेड नियमांचे उल्लंघन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाडीकिनारी अशा प्रकारे भराव टाकणे पर्यावरण दृष्ट्या हानिकारक असून त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा येऊन निकटच्या सखल भागात पाणी साचण्याचा धोका स्थानिक नागरिकांनी निदर्शनास आणून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डेब्रिज टाकण्यासाठी एमएमआरसीएलला जमीन देताना कोणत्याही प्रकारच्या पर्यावरणीय मान्यता घेण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच कायद्याचे उल्लंघन करून खाडी भागात बेकायदेशीरपणे डेब्रिज टाकणाऱ्या एमएमआरसीएलवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी हजरत सुफी जमाल शह कादरी, अध्यक्ष दर्गा ट्रस्ट व स्थानिक नगर सेवक यांचेकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(४), (५) व (६) मेट्रो ३ च्या कामावर परिणाम होऊ नये व कफ परेड मधील टीबीएम शाफ्टचे काम वेळेवर पूर्ण व्हावे यासाठी वडाळा येथील सर्व्हे क्र.२२९अ ही जागा तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटदारास उपरोक्त कामासाठी विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात आली आहे. यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मुंबई महानगरपालिका यांचेकडून घेण्यात आल्या आहेत.

या प्रकल्पासाठी उपलब्ध करुन दिलेली जागा सीआरझेड अंतर्गत येत नाही, याबाबतची खात्री करुनच देण्यात आली आहे. यामुळे मेट्रो-३ च्या कामामध्ये गती येऊन काम त्वरेने पूर्ण होण्यास मदत होणार आहे. उक्त निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

म्हाडाच्या संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाश्यांचे तीन श्रेणीत करण्यात आलेले वर्गीकरण

(९७) * १२३९५९ श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सद्यस्थितीत म्हाडाच्या संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाश्यांचे तीन श्रेणीत वर्गीकरण केले असून पहिल्या श्रेणीत ज्या रहिवाश्यांच्या प्रकल्पाचे काम सुरु असेल त्यांना तिथेच मालकीची घरे देण्याचा, दुसऱ्या श्रेणीत जे सदनिका विकत घेवून राहत असतील त्यांच्याकडून प्रधानमंत्री आवास योजनेप्रमाणे शुल्क आकारून गाळा देण्याचा आणि तिसऱ्या श्रेणीत जे घुसखोरी करून वास्तव्यास असतील त्यांचे अन्यत्र पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावांवर शासनाकडून अद्यापपर्यंत कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

संक्रमण शिबीरातील अनधिकृत/घुसखोर रहिवाशांची खालीलप्रमाणे तीन वर्गवारी करण्यात आलेली आहे:-

वर्ग-१) मूळ रहिवाशी ज्यांना संक्रमण शिबीरामध्ये स्थानांतरण करण्यात आले आहे,

वर्ग-२) अशा प्रकारचे रहिवाशी ज्यांनी कुलमुखत्यारपत्र किंवा तत्सम प्राधिकार पत्राद्वारे मूळ रहिवाशांकडून संक्रमण शिबीरातील गाळ्यांचा हक्क घेतला आहे,

वर्ग-३) अशाप्रकारचे घुसखोर रहिवाशी ज्यांनी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळ्यांचा ताबा अनधिकृत घेतला आहे.

(२) व (३) याबाबतचे धोरण सध्या शासनाच्या विचाराधीन आहे.

कल्याण (जि.ठाणे) शहरातील दुर्गाडी पुलाचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

(९८) * १२१८७४ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दुर्गाडी खाडीवर उभारण्यात येणाऱ्या पुलाचे काम निधी अभावी रखडले असून गोविंदवाडी बायपास आणि राष्ट्रीय महामार्ग २२२ वरून येणारी वाहतूक दुर्गाडी बॉटल नेकवर अडकून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुर्गाडी खाडीवर ६ पदरी पूल बांधण्याचे काम रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून मंजूर झाल्यानंतर महानगरपालिकेने दुर्गाडी गणेश घाटावरील जागा एमएसआरडीसीकडे हस्तांतरित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामासाठी रुपये ७६ कोटींचा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजूर झाला असतानाही कंत्राटदाराला केलेल्या कामाचा मोबदला मिळाला नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून दुर्गाडी खाडीवरील पुलाच्या कामास निधी उपलब्ध करून पुलाचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दुर्गाडी किल्ल्याजवळील व उल्हास खाडीवरील प्रस्तावित नवीन सहा पदरी पुलाच्या बांधकामासाठीचे कार्यादेश दि. ११/०३/२०१६ रोजी देण्यात आलेले असून आजमितीस २०% काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे. तथापि, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या दि. ०९/०५/२०१७ रोजीच्या सुधारीत ना हरकत प्रमाणपत्रानुसार नौकावहन गाळ्यांची लांबी वाढवावी लागल्यामुळे प्रस्तावित

पूलाच्या संरचनेमध्ये बदल करावा लागला व पुलाचे नकाशे नव्याने मंजूर करावे लागले. पर्यायाने काम पूर्ण होण्यास अतिरिक्त कालावधी लागणे अपेक्षित आहे.

(२) दुर्गाडी खाडीवर ६ पदरी पूल उभारण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून मंजूर झालेले असून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत या पूलाच्या कल्याण बाजूकडील जोडरस्त्यासाठी गणेश घाटालगतची जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) सदर काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीमधुन करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सदर पूलाच्या केलेल्या बांधकामाची देयके वेळोवेळी कंत्राटदारास अदा करण्यात आलेली आहेत. कंत्राटदाराने केलेल्या प्रत्यक्ष कामाचे कोणतेही देयक प्राधिकरणाकडे प्रलंबित नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून निधी उपलब्ध करण्यात येत असल्यामुळे शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात क्षय रोगाचा वाढता प्रादुर्भाव

(९९) * ११६९१६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मोठ्या प्रमाणावर क्षय रोग पसरत असून क्षय रोगाच्या रुग्णांची संख्या ४५ हजारावर पोहचली असून सन २०१७ मध्ये काही औषधांना दाद न देणाऱ्या (एमडीआर) क्षयरोगाचे ४८९१ नविन रुग्ण आढळले तसेच त्याचा पुढचा टप्पा म्हणजे बहुतांश औषधांना दाद न देणाऱ्या (एक्स जी आर) क्षयरोगाचे ६७० रुग्ण आढळल्याचे दिनांक २४ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास क्षयरोग दिनाच्या निमित्ताने महानगरपालिकेने मुंबईतील क्षयरोगाची सद्यस्थिती यामध्ये नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, क्षयरोगाचे रुग्ण वाढण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, क्षय रोगाला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत मुंबईत ४५,००० क्षयरुग्णांची नोंद झाली आहे.

सन २०१७ मध्ये काही औषधांना दाद न देणाऱ्या एम.डी.आर. (Multi Drug Resistant) क्षयरोगाचे ४८९१ रुग्ण व त्याचा पुढचा टप्पा असलेले एक्स.डी.आर. क्षयरोगाचे ६७० रुग्ण आढळून आले आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) क्षयरोग हा हवेमार्फत पसरत असल्याने, मुंबई शहरातील वाढती लोकसंख्या, गर्दी, दाट वस्ती आणि घरामधील खेळत्या हवेचा अभाव इत्यादींमुळे क्षयरुग्णांची वाढ झाली आहे.

औषधोपचारांना रुग्णाकडून मिळणारा प्रतिसाद, रुग्णाची प्रतिकार शक्ती, त्याच्या पौष्टिक आहाराचा दर्जा व औषधे नियमित व वेळेवर घेणे यावर देखील क्षयरोगाची वाढ अवलंबून असते.

एम.डी.आर. निदान केंद्रांमध्ये वाढ झाल्यामुळे जास्तीत जास्त एम.डी.आर. रुग्णांचे वेळेवर निदान शक्य झाले आहे.

सन २०१७ मध्ये, सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (RNTCP) अंतर्गत तसेच, खाजगी रुग्ण्यालयातील ४८९१ क्षयरुग्णांची नोंदणी करुन त्यांना योग्य व अद्ययावत उपचार प्रणालीद्वारे उपचार देण्यात येत आहेत.

केंद्र शासनामार्फत प्रत्येक जिल्हा व शहराचे एमडीआर स्थितीचा वारंवार आढावा घेऊन नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतात व त्यानुसार मुंबईमध्ये खालील सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्यात येते:-

- युनिव्हर्सल डीएसटी (Drug Sensitivity Test)
- नवीन औषधे (बीडाक्युलीन)
- डीएसटी मार्गदर्शक उपचार पध्दती

• अल्पकालीन उपचार पध्दती (Short Regimen MDR Treatment)

उपरोक्त सर्व अद्ययावत एमडीआर उपचार तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार देण्यात येत आहेत.

क्षयरोगावर नियंत्रण आणण्यासाठी व क्षयरोगग्रस्तांना रोगमुक्त करण्यासाठी मागील ३ वर्षांत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील सुविधा राबविल्या जात आहेत:-

• निदान सुविधा
• उपचार, एम.डी.आर. (Multi Drug Resistant) उपचार
• समुपदेशन व आहार
• प्रसार प्रतिबंधक उपाययोजना
• जनजागृती

सदर सुविधांमुळे जास्तीत जास्त क्षयरुग्णांना लवकरात लवकर शोधून त्यांच्यावर उपचार करणे हे क्षयरोग नियंत्रणाचे पहिले उद्दिष्ट शक्य झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **डॉ. अनंत कळसे**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.